सविनय सादर

विषय :- शिक्षक बँके कडे प्रलंबित असलेल्या मुदतठेव रकमेचा धनादेश शिक्षण विभागाच्या प्रा.फंड खात्यावर जमा करणे बाबत

उपरोक्त विषयान्वये, सन १९८९ ते १९९५ दरम्यान वेळोवेळी तत्कालीन शिक्षण मंडळाने मनपा शिक्षण विभागाचे प्राथमिक शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी वर्गणी एकूण रक्कम रु.३,९१,४९,१२८/- मुदत ठेव म्हणुन दि.प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि.नाशिक येथे ठेवण्यात आली होती.सदरच्या मुदतठेवी देय झाल्यांनतरही शिक्षक बँकेने मुदत ठेवीची रक्कम अदा केली नाही. त्यामुळे शिक्षण मंडळाने दि.०८/०५/१९९८ रोजी शिक्षक बँकेच्या मिळकती शिक्षण मंडळा कडे गहानखतान्दारे गहाण ठेवुन घेतल्या.व त्यानंतर शिक्षक बँके विरुध्द नाशिक येथील दिवाणी न्यायालयात दावा क्र.३४३ /१९९९ दाखल केला होता. त्याचा निकाल दि.०३/०८/२००० रोजी शिक्षण विभागाच्या बाजुने होवुन सदर मुदत ठेवी रकमेवर द.सा.द.शे.१५ टक्के व्याजदराने देण्याचा आदेश देण्यात आला. त्याप्रमाणे मा.न्यायालयाने दिनांक १०/०८/२००० रोजी र.रु.४,५७,३५,०८८/- ( अक्षरी रक्कम रुपये चार कोटी सत्तावण्ण लक्ष पस्तीस हजार अठठयांशी मात्र ) शिक्षण विभागास अदा करणचे आदेश दिले. परंतु सदर बँक डबघाईस गेल्याने बँकेचा बँकिंग परवाना दि.२५/०९/२००० रोजी रदद झाला. व मे.ग्राहक तक्रार निवारण मंच नाशिक यांनी सदर बँकेस त्यांचे ठेवीदारांना त्यांची मुददल रक्कम देणे बाबत आदेशित केले होते.त्यामुळे त्यावेळी पतसंस्था रक्कम देऊ शकली नाही.त्यामुळे फायनल डिक्री क्र.१/२००१ दाखल करुन बँकेच्या मिळकती जप्त करण्यात आल्या.व जप्त केलेल्या मिळकतींवर शिक्षण विभागाचा बोजा चढविण्यात आला. जप्त केलेल्या मिळकती शिक्षण विभागातर्फे लिलावास काढण्यास मा.न्यायालयाने दि.०६/१०/२००५ रोजी परवानगी दिली.

त्यानुसार आदेशाच्या अंमलबजावणी कामी दरखास्त न.३९/२००७ दाखल करुन खालील मिळकतींच्या लिलाव प्रक्रिया करणेस परवानगी मागीतली.

१) तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी मौजे नाशिक बोहोरपटटी येथिल सीटी सर्व्हे न.१२८० म्युन्सिपल घर न.९०४ यासी क्षेत्र १६८.०० चौ.मी. त्यावरील एकुण ४ मजले बांधीव मिळकत इमारत यासी सर्व बांधिव क्षेत्र १३५१.४२ चौ.फु. म्हणजेच १२५.५५ चौ.मी.त्यात एक भाडेकरु यास दरमहा रु.२४०/- प्रतीमाह भाडयाने दिलेल्या तळमजल्यावर एक दुकानाचे भाडेकरु आहेत.

२) तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका येवला पैकी मौजे येवला येथील सिटी सर्व्हे न.४६१२ यासी क्षेत्र ५५.५० चौ.मी. ५९७.४० चौ फुट

३) तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नांदगाव पैकी मौजे नांदगाव येथील सीटी सर्व्हे न.२ /अ सीटी सर्व्हे नं.३१७२

(२)

४) तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका चांदवड येथील सीटी सर्व्हे न.४२६/ब यासी ग्रामपंचायत घर ना.११७ यासी क्षेत्र ९६.०० चौ मी.

त्या अनुषंगाने मा.न्यायालयाच्या परवानगीने अनुक्रमे दिनांक २८०४/२०१४ व दिनांक १७०६/२०१६ रोजी लिलाव करुन रक्कम वसुल करण्याबाबत प्रयत्न केले होते. परंतु लिलाव प्रक्रियेस कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही. त्या मुळे सदर मिळकतीची भविष्यात विक्री होण्याची शक्यता फार कमी आहे.त्यामुळे शिक्षण विभागा तर्फे सदर दाव्याचे कामकाज पहाणारे ॲड.श्री. व्हि.के.सानप यांचे दिनांक २४/११/२०१६ रोजी अभिप्राय मागविला असता न्यायालयाने दिनांक १०/०८/२००० रोजी दिलेला निर्णय योग्य असुन र.रु.४,५७,३५,०८८/- ( अक्षरी रक्कम रुपये चार कोटी सत्तावण्ण लक्ष पस्तीस हजार अठ्ठयांशी मात्र ) शिक्षण विभागाने स्विकारावी.त्यात तडजोड करु नये असा अभिप्राय दिला.तसेच दिनांक १३/०४/२०१७ रोजी मनपाचे मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड.जे.शेखर यांचाही अभिप्राय मागविला असता त्यानीही सदर निर्णय योग्य असल्याबाबत कळविले आहे.

त्यानुसार नुसार रक्कम शिक्षण विभागास देणे बाबत पत्र सदर पतसंस्थेने शिक्षण विभागास दिले होते.पतसंस्थेने दिनांक ०२/०६/२०१७ ते १५/१२/२०१७ या कालावधीतील र.रु. ४,५७,३५,०८८/- चे धनादेश शिक्षण विभागास आदा केले होते.परंतु सदर धनादेश बँकेची आर्थिक परीस्थिती चांगली नसल्याने वटलेले नाहीत.तरी आज दिनांक ३१/०८/२०१८ रोजी वरील रकमेचा धनादेश क्र. १०८१२६ दिनांक ३१/०८/२०१८ सादर केलेला आहे. सदर धनादेश शिक्षण विभागाच्या प्रा.फंड खाती जमा करणेस परवानगी मिळणेस्तव सविनय सादर. व रक्कम शिक्षण विभागचे खात्यावर जमा झाले नंतर शिक्षण विभागाकडे गहाण असलेल्या पतसंस्थेच्या मिळकती वरील ताबा पतसंस्थेस दयावा लागेल. करीता सविनय सादर सोबत पतसंस्थेने दिलेला धनादेश जोडलेला आहे.

[illegible] 03/09/2018
([illegible], लिपिक)

मा. [illegible] [illegible] 03/09/18
([illegible])

मा. [illegible]
([illegible]) [illegible]

① १९८८ ते १९९५ कालावधीत [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]

रु ३,०९,००९२५/- (तीन कोटी (नऊ लाख [illegible] (नऊशे पंचवीस) ठेव म्हणुन गुंतवले होते.

(२) सदर ठेवी परत मिळविण्याकरीता पाठपुरावा करणेसाठी व मिळविण्याकरीता विभागाने बँकांविरुद्ध मा. दिवाणी न्यायालयात दिवाणी दावा क्र. २९०/८८ दाखल केला.

(३) सदर दावा दाखल केल्याने प्राथ. शिखर बँकांनी सदर मुदतठेवी परत करणेसाठी (१०) action plan तयार करणेसाठी मुदत मागुन घेतली व सदर पाठपुराव्यानुसार बँकेच्या मालकीचे संबंधित कोल्हार पट्टी संबंधित इमारत, संगमनेर/पांगडे व नांदगाव संबंधित इमारती दि. ०८/०४/१९९८ रोजी गहाणखताद्वारे गहाण करुन दिल्या.

(४) सदर ठेवींवर व्याज देऊन मा. न्यायालयात रु. ४,५७,३५,०८८ (व्याज रक्कम) मागितली आहे.

(५) सदर दाव्याचा निकाल दि. ०६/१०/२००४ रोजी लागुन सदर मिळकती शिखर विभागाने सध्या करणेत मालकत्व मिळाली आहे.

(६) रिझर्व्ह बँकेच्या आदेशान्वये दि. २५/८/२००० रोजी शिखर बँकेचा परवाना रद्द होऊन तसेच अवसायनात गेली.

(७) बँकेची कोल्हार पट्टी संबंधित इमारत लिलाव करणेकामी ठेवली, वर्तमानपत्रात जाहिर नोटीस देऊन रु. १.२५ कोटी

(४)

विभाग निरीक्षण करुन दि. २८/०४/१७ व १७/०६/२०१६ रोजी निवाडा करण्याचा प्रयत्न करताना प्रतिसाद मिळालेला नाही. सदर इमारत पडकी असून त्यात (१) जुना भाडेकरु असून त्यांच्याशी पूर्णत: दुर्लक्षित वारसांचा भाग आहे. त्यामुळे त्यास प्रतिसाद मिळाला नाही.

उर्वरित रिकाम्या इमारती रिकाम असून त्यास प्रतिसाद मिळण्याची रूप आशा नाही.

(८) सदर कॉलनी हस्तांतरित तसा इच्छुक एक अर्जदार हॉटेल मालक व्यावसायिक यांना कॉलनी विकसित करण्यास इच्छुक असता मा. सभापती शिक्षण मंडळ यांनी त्यास आक्षेप घेतला होता.

(९) कॉलनीतून सदरची रक्कम वसूल होणे आवश्यक असल्याने शिक्षण विभागाने सदरला पाठपुरावा सुरु केला असून कॉलनी त्यांनी स्वतःची विकसकामार्फत कोर्टात मदार आणली असता त्यास त्यांनी सुनावणीत व दिलासा दिला होता मात्र सदर दिलासा निर्णय अद्यापही वसूल नाही.

(१०) कॉलनी कुठे रक्कम आदि व्याज भागीदार असता कॉलनी कॉलनी

पत्रसंस्करण रूपांतर करणेत व विभागात
तेथील कुणबीकरण व फेरफार शासन
निर्णयानुसार पुढे पुढील + व्याज असे
४,५७,३५०८८/ देणेस प्रस्ताव दिला होता

(११) सदर प्रकरण दावा चालविणारे
अपिलार्थी वकील अॅड. स्वामी साहेब व
मा. उच्च न्यायालयातील वकील अॅड. शेरकर
साहेब यांनी स्वतंत्र अभिप्राय दिलेला
आहे

"शिक्षण विभागाने कॉलेजला ज्या
फेलोशिप मिळाल्या त्या निर्णय होऊ शकत
नाही व त्यानुसार भरणा शिक्षण विभागाने
पैसे देण्याबाबत वसूल होण्याची शक्यता
नाही

कॉलेजची आर्थिक स्थिती पाहता त्यांचेकडून
पैसे वसूल होण्याची शक्यता नाही.

ज्याअर्थी हेही शक्य ही न्यायालयाची
असल्याने मा. न्यायालयाने रिट पि. नं. ३९/२००६
दि. १३/०२/२००९ रोजीच्या निर्णयानुसार
रक्कमेची शिक्षण वसूल करणे संभाव्य नाही
असा हुकुम मा. न्यायालयाने दिलेला आहे."

(१२) सदरहू प्रकरणी कॉलेज (फेलोशिप) दिल्याने
रु. ४,५७,३५,०८८/- ची दिलेली असून
मा. कॉलेजने स्वतः मिळाले निधी
परत करणेचे आदेश आहे करणेत

(६)

प्रस्ताव [illegible] [illegible]

(१३) [illegible] [illegible] [illegible]
सभा [illegible] [illegible] [illegible] [illegible]

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. ........ दि. ........
जा.क्र. २५९८ दि. ३/१०/१८

[illegible] ०३/०४

मा. [illegible]

नाशिक महानगरपालिका
लेखा विभाग
जावक क्र. ३२
दिनांक- ०४/०१/२०१८
स्वाक्षरी- [illegible]

सादर,

मनपा शिक्षण विभागाचे प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे भ.नि.नि. निधी [illegible] [illegible] खाते क्र. ३८१४८१२८८। [illegible] मधून "दि प्राथमिक शिक्षण सहकारी बँकेत गुंतवणूक [illegible] [illegible] होती.

सदर बँक [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] सदर [illegible] [illegible] बँकेत [illegible] [illegible] आहे. सदर गुंतवणूकीची बँकेने [illegible] [illegible] [illegible] शिक्षण विभागाकडे [illegible] [illegible] दिलेला नाही. त्यानंतर सदर बँकेविरुद्ध न्यायालयीन प्रक्रिया सुरु करावी लागली आहे.

मा. न्यायालयाच्या निकालानंतर शिक्षण विभागाच्या बाजूने [illegible] रु. ४५८३५०८८। - शिक्षण विभागाकडे देण्याचे मा. न्यायालयाने आदेशित केले आहे. परंतु सदर बँक [illegible] [illegible] बँकेकडे सदर रक्कम देण्यास [illegible] नाही. [illegible] [illegible] सदर बँकेला [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] सदर बँक रक्कम देऊ न शकल्याने शिक्षण विभागाकडे [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] न्यायालयीन प्रक्रिया

सदर इमारत तडजोड न्यायालयाने ताबा मिळालेवर (७)
शिक्षण विभागाच्या ताब्यात घेऊन सदर मिळकतीच्या
विकास करणेबाबत नगररचना विभाग येथील टेंडर केवळ
निविदा प्रक्रिया अद्याप निविदाकार कुठल्याही प्रतिसाद
मिळाला नाही.

सदर ठरावाने शिक्षण विभागाचे कामकाज
पाहणारे वकील ॲड. श्री. के. साळवे यांना अभिप्राय
मागविला असता मा. न्यायालयाने दिलेला निकाल
योग्य असून रु. ४५६३५०८८/- निविदाधारक रक्कम
नाही असा अभिप्राय दिला आहे. तसेच अभिप्राय
मुंबई उच्च न्यायालयाचे वकील ॲड. श्री. ...
यांनी सुद्धा ... अभिप्राय दिला आहे.

वरील अभिप्रायानुसार सदर प्रकरणी
त्यांच्या ताब्यात घेतलेल्या इमारत मिळकती परत
करणेच्या अटीवर धनादेश क्र. ९०८९२५ दि. ३१/८/२०१८
रु. ४५६३५०८८/- शिक्षण विभागास सादर केला
आहे. सदर धनादेश शिक्षण विभागाच्या खात्यात
जमा करणे किंवा परत करणे याबाबत निर्णय झालेला
नाही.

उपशिक्षणाधिकारी - [signature] 6/9/18

अधीक्षक - [signature] 6/9/18

~~मा. मुख्यलेखा व वित्त अधिकारी~~

- मनपाचे येणे रक्कम रु. ४.५६ कोटी असलेने, धनादेश जमा करून घेणेस हरकत वाटत नाही. तथापि, सदर प्रकरणी न्यायालयीन दावे, बँकेच्या मिळकती विषयी सद्यस्थिती यासंदर्भात विभागाची जबाबदारी राहील.
[signature] 10/9

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. 2354 दि. 14/9/18

(८)

सविनय सादर

दिनांक २९/०९/२०१८ रोजी मा. वित्त व मुख्यलेखाधिकारी यांचेशी समक्ष झालेल्या चर्चेनुसार शिक्षक पतसंस्थेच्या शिक्षण विभागाने जप्त केलेल्या मिळकती लिलाव प्रक्रियेस कुठलाही प्रतिसाद मिळत नसल्याने व मनपा पॅनल वरील मुंबई उच्च न्यायालयाचे वकिल अँड.जे.शेखर यांच्या दिनांक १३/०४/२०१७ चा अभिप्राय व शिक्षण विभागातर्फे सदर दाव्याचे कामकाज बघणारे अँड.श्री व्हि.के.सानप यांनी दिनांक २४/११/२०१६ च्या अभिप्रायानुसार व मा.न्यायालयाने दि.३०/०८/२००० रोजी दिलेल्या निकालानुसार र.रु.४,५७,३५,०८८/( अक्षरी रक्कम रुपये चार कोटी सत्तावण्ण लक्ष पस्तीस हजार अठठ्यांशी मात्र) शिक्षण विभागास अदा करावी असे शिक्षक पतसंस्थेस आदेशित केले होते. व शिक्षक पतसंस्थेने दिनांक ३१/०८/२०१८ रोजी शिक्षण विभागास सादर केलेल्या प्रस्तावा नुसार पतसंस्था वरील रकमेचा धनादेश देण्यास तयार आहे.व शिक्षक पतसंस्थेच्या जप्त मिळकती धनादेश शिक्षण विभागाच्या खात्यावर जमा झाल्यानंतर जप्त मिळकती पतसंस्थेस परत देणेत याव्या, असा प्रस्ताव शिक्षण विभागाकडे ठेवण्यात आला आहे.तरी सदर धनादेश स्विकारण्यास व धनादेश मनपा शिक्षण विभागाच्या प्रा.फंड खात्यात जमा करणेस परवानगी स्तव सविनय सादर

२९/९/18
क. लिपिक
(विजय नेरकर)

मा. अधिक्षक सो. — २९/९/18
(चंद्रकांत थोरात)

मा. शि. अ. —
(निर्मल उपाध्याय)

(१) स्वाक्षरीसाठी
(२) आदेश ...
२९/९

सादर.

मनपा शिक्षण विभागाच्या दि. प्राथमिक शिक्षक पतसंस्थे कडे प्रलंबित मुदतठेव र.रु. 4,57,35,088/- शिक्षण विभागास परत मिळणे कामी आपली दि. 10/09/2018 च्या मंजुर टिपणी नुसार सोबत पत्र प्रारूप व आदेश जोडला असुन स्वाक्षरी होणेस सविनय सादर.

[signature]

~~मा. शि. अ.~~ – प्रारूप ~~पाठवलेले~~ ५/१०

[signature] 4/10

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. ........ दि. ........
जा.क्र. २०८३ दि. ०९/१०/०१८

मा. मु.ले.अ.

नाशिक महानगरपालिका
लेखा विभाग
जावक क्र. २५९
दिनांक- ०४/१०/२०१८
स्वाक्षरी- [signature]

सादर,

दि. प्राथमिक शिक्षक पतसंस्थामध्ये प्रलंबित असलेली मुदतठेव रु. ४५७३५०८८/- चा परतावा जमा करून घेणेबाबत पृष्ठ क्र. ८ वरील मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे मंजुरीनुसार शिक्षण विभागाचे सदर परताव्याची जमा करून घेणेसाठी व शिक्षण विभागाकडे मागणी करणेबाबत शिक्षण पतसंस्थेच्या लाभार्थीसाठी – व्यवस्थापक दि. प्राथमिक शिक्षक पतसंस्था नाशिक यांना पत्र देणे कामी शिक्षण विभागाचे लोकल पत्र तयार करणे त्यांचे अवलोकन होऊन मान्यता होणेस हरकत नाही.

उपलेखापाल - [signature] 6/10/18

उपमुख्यलेखा -

(१०) सादर,

मा. मुख्यलेखा व वित्तअधिकारी सो. यांचेकडील प्रथम चर्चा यादीनुसार सदर धनादेश जमा करून घेणे व शिक्षण विभागाच्या लाभार्थी असलेल्या कि गणवेश निवडलेल्या पालकांच्या लाभार्थी होणेबाबत कार्यवाही शिक्षण विभागाने करावी.

सबब सदर नस्ती पुढील कार्यवाहीकरिता शिक्षण विभागाकडे पाठविणेकामी सादर.

उपलेखापाल - [signature] 11/10/18

उपमुलेअ - [signature] 11/10/18

शिक्षण विभाग

नाशिक महानगरपालिका
लेखा विभाग
जावक क्र. २५८
दिनांक- ११/१०/२०१८
स्वाक्षरी- [signature]

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. २६०८ दि. ११/१०/१८
जा.क्र. ........ दि. ........

(११)

फेरसादर -

उपरोक्त पृष्ठ २ व ६ वरील अभिप्राय अवलोकन व्हावे.

सदर पार्सलांचे दिनांकाला अनावधानाने अनुषंगाने गटकार्यकारणी परत करण्यात खरेदीस रु. ४,५५,३५,०८८/- चा धनादेश स्विकारणेबाबत प्रस्ताव असून सदर बाबत समक्ष मा. ॲड. मान्य तथा ॲड. श्री. शेरवक यांचे अभिप्राय घेण्यात आहेत.

मा. मुख्य विधि यांनी धनादेश स्विकारणेबाबत सिद्धांतांचा मान्यतेबाबत मा. आयुक्त यांनी मान्यता देणे योग्य

मान्यतेस सादर.

(sign) ../१०

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र.......... दि..........
जा.क्र. २८६५ दि.२५/१०/१८

मा.कार्य.आयुक्त सो.

दि. २०/१०/२०१८ रोजी सदर नस्ती मा. आ. आयुक्त सो. यांचेकडे सादर केली होती, परंतु शिक्षण विभागाचे काम त्यांचेकडे नसल्यामुळे त्यांनी सदरची नस्ती शिक्षण विभागास उद्र- रवाना पत्र पाठविले आहे.

(sign) २०/१०/१८

मा. शि. अ. —

त्वरीत फेरसादर करावे.
(sign) /१०/१८

सादर.

सदर पत्रासोबत दिलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने गहाण इमारती परत करण्याच्या अटीवर रु. 4,57,35,088/- चा धनादेश स्विकारणे बाबत प्रस्ताव असून, संचिके सोबत शिक्षण विभागा मार्फत सदर दाव्याचे कामकाज पहाणारे ॲड. श्री. व्ही. के. सातपुते व मुंबई उच्च न्यायालयातील वकिल ॲड. श्री. जे. शेरवर यांचा अभिप्राय जोडला आहे.

तरी सदर प्रकरण मा. आयुक्त सो. यांच्या अभिप्रायास्तव सविनय सादर.

तसेच मा. ~~नगरसेवक~~ नगरसेवक श्री. गहाळन शेलार यांनीही सदर प्रकरणाची दखल घ्यावी असे तसेच नियमोचित कार्यवाही करणे कामी दि. 17/1/2019 रोजी पत्र दिलेले आहे. सोबत पत्र जोडले आहे. तरी उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.

[signature] 24/01/2019

मा. प्रशासन अधिकारी सो.

१) सन १९८९ ते १९९५ या कालावधीतील GPF ची रक्कम (शिक्षकांची) ३,९१,४९,१२८/- कि ... मुदतठेव म्हणून दि प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि. (तात्कालिन) ठेवली होती.

२). मुदत संपूनही ठेवीची रक्कम बँकेने अदा केली नाही त्यामुळे बँकेने उपरोक्त मुदतठेव घेतांना दि. 8.5.1998 रोजी मा. मुख्य निबंधक यांचे कडेस गहाण खत चेअरमन, व्हा. चेअरमन, व्यवस्थापक यांनी लिहून दिले आहे व.

P.T.O (page 13)

श्री दत्तात्रय वरेरकर, सिन्नर, श्री साहेबराव पवार, येवला, व स्वतः करिता व आचार्य दोंदे विद्यार्थी भुवन न्यास, नाशिक या विश्वस्त संस्थेचे विश्वस्त म्हणून यांनी संमती व जामिनदार म्हणून करून दिले आहे. यात त्यांनी गहाण मिळकतींमधुन थे रक्कम वसुल होत नसल्यास न्यासाची मिळकत जप्त करून ~~व~~ विक्री करून रक्कम वसूल करणेस व त्यासाठीच्या आवश्यक परवानग्या हे जामिनदार आणून देणे बाबत लिहून दिले आहे.

३) दावा क्र. ३४३/१९९९ चा दि. ३०/८/२००० च्या निकालानुसार (शिक्षण विभागाचे बाजुने लागला आहे) रु ४५७०३५०८८/- द.सा.द.शे १५ टक्के व्याजदराने रक्कम मिळेपर्यंत देणेचे आदेश आहेत. बँकेने रक्कम न दिलेने व बँक अवसायनात गेलेने त्यामुळे पारायनल डिक्री क्र. ४●/२००१ दाखल करून त्याचा निकाल दि. 6.10.2005 रोजी लागला त्यात ज्या मिळकती गहाण खतात आहेत त्यांना लिलावात काढणेस परवानगी मिळाली.

४) दरखास्त क्र. 39/2007 पुन्हा दाखल करून गहाण खतातील मिळकतींचा लिलाव व जामिनदार यांनी दोंदे विद्यार्थी भुवन न्यास, नाशिक यांची ही मिळकतीस जप्तीची परवानगी मागितली होती. दि. 16.4.2009 च्या निकाला नुसार गहाण खतातील अ, ब, क व ड साठी परवानगी मिळाली मात्र दोंदे विद्यार्थी भुवन या मिळकतीस केवळ तांत्रिक बाब पुढील प्रमाणेची - कार्यवाहीत केलं पाहिजे नाही व गहाण खतातील अ, ब, क, ड मिळकती मधुन रक्कम वसूल होवू शकते या मुळेच दोंदे भवन मिळकती ~~जप्ती~~ स जप्तीस परवानगी मिळालेली नाही.

५) विभागाने गहाण खतातील अ, ब, क, ड मिळकतींचा दि 28/4/14 व 12/6/16 रोजी लिलाव करून रक्कम वसुलीचा प्रयत्न केला मात्र प्रतिसाद मिळाला नाही व रक्कम आजची द.सा.द.शे. 15% ने बरीच वाढलेली आहे.

६) उपरोक्त ५ मधील बाब पाहता मा. न्यायालयात दावा दाखल करून त्यात दोंडे बंधू यांना ही प्रतिवादी करून त्यांची मिळकतही जप्ती साठीची कार्यवाही करावी लागेल असे मत आहे. यापूर्वी टिपणी मध्ये रु 45735088/- चीच मागणी करणे उचित होणार नाही. कारण आपणास दावा क्र. 39/2007 मध्ये Sept 2007 पावेतो रक्कम 108720834/- होत असलेचे नमूद केले आहे व हि रक्कमही आज द.सा.द.शे 15% व्याजाने वाढणार आहे. या दराने आजची रक्कम पुढील प्रमाणे होईल.

रु. 45735088/- ला 1.8.99 पासून द.सा.द.शे. 15% व्याज

1 महिनेचे व्याज = 571688 रु.

दि. 1.8.99 ते आज पर्यंतचे महिने 233

एकुण 233 महिनेचे व्याज = 133203304/-

मुद्दल रक्कम (1.8.99 ला) = 45735088
+
233 महिनेचे आज पर्यंतचे व्याज = 133203304

एकुण देय आजचे 178938392 रु.

७) बँक रु 45735088/- ही मुद्दल रक्कमही देत नाही व गहाण खतातील अ ब क ड मिळकतींचा लिलाव करून ही रक्कम परत येत नसलेने उपरोक्त ६ मधील रक्कम मिळणेसाठी दोंडे बंधू यांचे मिळकत जप्तीसाठी दावा दाखल करणे योग्य वाटते.

P.T.O.
(Page 15)

(१५)

उपरोक्त १ ते ६ नुसार ५ च्या कार्यवाहीस्तव सादर

३०।१।१९

मा. अतिरिक्त आयुक्त साहेब — अ फ्लॅग नं.१४

वरील अ प्रमाणे मंजूरीस हरकत नाही तरीही मंजूरी व आदेशास्तव स. सादर

३०।१

मा. आयुक्त महोदय

तात्काळ कार्यवाही करावी.

३१.१.१९

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. — दि. —
जा.क्र. ७ ६५ दि. ३०।०१।०१९

e2
30/1/19

महत्वाचे
श्री आरोत.
श्री डुंगळे यांचेकडून
तात्काळ पुढील
कार्यवाही व्हावी
होवो.
३१।१।१९

EDU/2018/340
30/01/2019
31/01/2019

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. 300 दि. 1/2/19
जा.क्र. — दि. —

सविनय सादर,

मा.आयुक्त सो यांनी दिलेल्या आदेशा अन्वये सदर प्रकरणी शिक्षण विभागा तर्फे न्यायालयीन कामकाज करणारे ॲड. श्री. व्हि.के.सानप यांना आचार्य दोंदे भवन ,टिळक वाडी नाशिक ही मिळकत जप्तीसाठी दावा दाखल करणेची कार्यवही करण्याबाबत दिनांक ११/०२/२०१९ रोजी कळविले होते.व त्यानंतर पुन्हा दिनांक १३/०६/२०१९ रोजी दावा दाखल केला किंवा नाही. या बाबत विचारणा केली असता त्यांनी शिक्षण विभागास कळविले आहे की आचार्य दोंदे भवन,टिळक वाडी,नाशिक ही मिळकत शिक्षण विभागाकडे रजिष्ठर गहाण खताने तारण नाही.

त्याच प्रमाणे नाशिक येथिल दिवाणी न्यायाधिश,वरीष्ठ स्तर नाशिक यांचे कोर्टात आपले शिक्षण विभागाची शिक्षक पतसंस्थे विरुध्द रक्कम वसुल करणे बाबत स्पे.द.न. ३९/२००७ दाखल असुन त्याचे कामकाज अद्यापपावेतो चालु आहे. सदरच्या दरखास्तीमध्ये मे.दिवाणी न्यायाधिश,वरीष्ठ स्तर नाशिक यांचे कोर्टात दि.१३/०२/२००९ रोजी आचार्य दोंदे विदयार्थी वस्ती गृह ही मिळकत जप्त करुन मागितली होती. व सदरच्या अर्जावर मे.दिवाणी न्यायाधिश,वरीष्ठ स्तर यांनी दि.१६/०४/२००९ रोजी हुकुम करुन सदरचे मिळकतीचे शिक्षण विभागाकडे रजिष्ठर गहाणखत करुन दिलेले नसल्यामुळे मिळकत जप्त करुन मागता येणार नाही.असा हुकुम केलेला आहे. त्यामुळे सदरची मिळकत जप्त करणे कामी स्वतंत्र दावा दिवाणी न्यायालयात होवु शकत नाही. असे शिक्षण विभागास कळविले आहे.तसेच शिक्षण विभागाची रक्कम मिळणे कामी सदर शिक्षक पतसंस्थे सोबत समझोता करणेस कुठल्याही प्रकारची हरकत नाही. असे अभिप्रायार्थ कळविले आहे.

तसेच भारतीय रिजर्व बँकेने दि.प्राथमिक शिक्षक बँकेचा दिनांक २८/०९/२००० रोजी बँक डबघाईसे गेल्याने परवाना रदद केलेला आहे.व त्यानंतर बँकेचे रुपांतर पतसंस्थेत झाले आहे.

तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे अँड.श्री.जे.शेखर यांनीही दिनांक १३/०४/२०१७ रोजी मे.कोर्टाच्या निकाला नुसार र.रु.४,५७,३५,०८८/- स्विकारणेस हरकत नाही.असा अभिप्राय शिक्षण विभागास दिलेला होता.त्यानुसार रक्कम स्विकारुन शिक्षक पतसंस्थेच्या सर्व मिळकती वरील ताबा सोडुन समझोता करावा किंवा कसे या बाबत निर्णयास्तव सादर

(सही) 11/07/19

मा. लेखापाल (प्र.) — तत्कालीन नगर शिक्षण मंडळाने शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भ.नि.नि.ची रक्कम रु.3,०१,४०,१२८/- मुदतठेव (१९९८ ते २००५ कालावधीत) प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेत ठेवलेली होती. मुदत संपल्यानंतरही मुदतठेव व्याजासह परत न मिळाल्याने →

सदर शिक्षण बँकेविरुद्ध शिक्षण मंडळाने दावा क्र.३४३/१९९९ दाखल केला होता. त्याचा निकाल ३/५/२००० रोजी शिक्षण मंडळाच्या बाजूने लागून मा. न्यायालयाने रु.२,४,५६,३५,०८८/- शिक्षण मंडळास बँकेने अदा करावेत असा आदेश दिलेला आहे.

महाराष्ट्रात कालांतराने शिक्षण बँक डबघाईस आल्याने बँकेच्या त्यावर मालमत्ता शिक्षण मंडळाने जप्त करून त्यांचा लिलाव करण्यास प्रयत्न मा. कोर्टामार्फत केला असता प्रतिसाद मिळालेला नाही. त्यावर मालमत्तेची लिलावाद्वारे शिक्षण मंडळास अपेक्षित किंमत मिळू शकली नाही. तसेच बँकेचे परवाने अवांतर झाल्याने बँकेची आर्थिक स्थिती दयनीय ~~[illegible]~~ झालेली असल्याने मा. कोर्टाच्या निर्णयानुसार रु.२,४,५६,३५,०८८/- इतकी रक्कम शिक्षण बँकेकडून मुदतीत पोटी मिळू शकेल इतकी नाही, असा अभिप्राय मा.न्यायालयाने वकिल ॲड. लागू तसेच मा. उच्च न्यायालयाने ॲड. डोंगरे यांनी अभिप्राय दिलेले आहेत. तसेच आता कोर्ट [illegible] हे न्यायालयात असल्याने मा.न्यायालयाने दि. दा. नं. ३८/२००८ दि. ०३/०२/२००९ चे निर्णयानुसार सदरची रक्कम जमा करता येणार नाही, असे मत मा.न्यायालयाने दिलेले आहे.

तरी मा. उच्च न्यायालयाने ॲड. डोंगरे यांचे अभिप्रायानुसार शिक्षण बँकेकडून मा. कोर्टाच्या आदेशानुसार रु.२,४,५६,३५,०८८/- या रकमेवर [illegible] [illegible] निर्लेखनार्थ मान्यता [illegible] पुढील आदेश होणेस सादर

[signature]
११/७/१९

मा. शि.अ. — दि. ०३/६/१९ रोजी ॲड. शि.के. [illegible]

(१९)

जिल्हा न्यायालय नाशिक यांना आचार्य दोंदे भवन
टिळकवाडी नाशिक ही मिळकत जप्तीसाठी दावा दाखल करणेबाबत
स्मरणपत्र दिले असता त्यांनी दिलेले अभिप्राय पृष्ठ क्र. 111 वर
जोडलेले आहेत कृपया अवलोकन व्हावे.

ॲड. व्ही.के. सानप यांचे अभिप्रायानुसार दिवाणी न्यायाधीश
वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात शिक्षक पतसंस्थेविरुध्द रक्कम वसुल
होऊन मिळणेकामी स्पे.दा.नं. ३९/2007 चालू आहे. त्यामुळे
आचार्य दोंदे भवन ही मिळकत जप्त करुन मिळणेकामी स्वतंत्रपणे
दावा दाखल होऊ शकत नाही. तसेच मे. कोर्टाने दि. १६/४/2009
रोजी हुकुम करुन आचार्य दोंदे भवन ही मिळकत जप्त करता
येत नाही असा आदेश दिलेला आहे. या संदर्भात कुठलाही
दावा दाखल नाही किंवा प्रलंबित नाही. सदरचे मिळकतीबाबत
तसेच शिक्षण मंडळाचे रक्कम वसुलीबाबत समझोता यापूर्वी
पाठविलेल्या पत्रानुसार होत असल्यास हरकत नाही असा अभिप्राय
कळविलेला आहे.

पृष्ठ 18 वर अ ब क प्रमाणे स्थिती विशद करण्यात
आलेली आहे.

तरी मा. उच्च न्यायालयाचे ॲड. शेखर यांचे अभिप्रायानुसार
शिक्षक बँकेकडून मा. कोर्टाच्या आदेशानुसार रु. ४,५७,३५,०८८/-
चा स्विकार करुन समझोता करुन पतसंस्थेच्या मालकीच्या
मिळकतीवरील नावाबाबत पुढील आदेशार्थ सविनय सादर.

(सही) 12.7.19

मा. अतिरिक्त आयुक्त (सेवा) -

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. २९६ दि. १५/७/१९
जा.क्र.

अति. आयुक्त कार्यालय म.न.पा., नाशिक
९२५
१५/७/१९

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. १५५८ दि. १६/७/१९
जा.क्र. दि.

दि.30/11/2019

सविनय सादर...

स्पे. द.न.39/2007 नाशिक येथिल मे. सिव्हिल जज्ज साहेब सिनियर डिव्हीजन नाशिक यांचे कोर्टात दि.प्राथमिक शिक्षक बँक (सध्याची शिक्षक पतसंस्था) यांनी दि.21/11/2019 रोजी शिक्षक बँके कडे मनपा शिक्षण विभागाचे मुदतठेवीची प्रलंबित रक्कम अदा करणे बाबत अर्ज केलेला आहे.सदर अर्जात र.रु.3,00,00,000/- मनपा शिक्षण विभागाने स्विकारणेची विंनंती केलेली आहे व रक्कम अदा झाल्या नंतर शिक्षक बँकेच्या शिक्षण विभागाकडे गहाण असलेल्या मिळकती बँकेस परत देण्याची विनंती केलेली आहे.

मनपा शिक्षण विभागची सन 1989 ते 1995 दरम्यान प्राथमिक शिक्षक बँके कडे मुदतठेवीची मुळ र.रु.3,91,49,128/- प्रलंबित होती. सदर ठेवीची मुदत संपल्यानंतरही शिक्षक बँक शिक्षण विभागाची रक्कम परत देऊ शकली नाही. त्यामुळे दि.08/05/1998 रोजी शिक्षक बँकेच्या मिळकती शिक्षण विभागाकडे गहाणखतांव्दारे गहाण ठेवुन घेतल्या. व त्यानंतर शिक्षक बँके विरुध्द नाशिक येथिल दिवाणी न्ययालयात दावा क्र.343/1999 दाखल केला.त्याचा निकाल दि.03/08/2000 रोजी शिक्षण विभागाच्या बाजुने देवुन न्यायालयाने बँकेस शिक्षण विभागास र.रु.4,57,35,088/- अदा करणेस आदेशित केले.व सदर रक्कम बँक शिक्षण विभागास अदा करु न शकल्याने बँकेच्या मिळकती वर शिक्षण विभागाचा बोजा चढविण्यात आलेल्या मिळकतींची लिलाव प्रक्रिया राबविली असता त्यास कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. व त्यानंतर दिनांक 25/09/2000 रोजी च्या भारतीय रिझर्व्ह बँके च्या आदेशान्व्ये बँकेचा परवानाही रदद करण्यातआला.व त्यामळे बँकेचे रुपांतर पतसंस्थेत झाले आहे.

उपरोक्त अर्जाचा विचार करता बँक डबघाईस गेल्याने संपुर्ण रक्कम व्याजासह परत करु शकत नसल्याने दि.10/08/2000 रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे र.रु.4,57,35,088/- शिक्षण विभागास मिळणे आवश्यक आहे. त्यापेक्षा कमी रक्कम शिक्षण विभागास स्विकारता येणार नाही. तत्कालीन मा. वित्त व मुख्य लेखाधिकारी मनपा नाशिक यांनी दि.10/09/2018 रोजी तत्कालीन प्रस्तावात नमुद रक्कम स्विकारणेस मान्यता दिलेली आहे.तसेच मुंबई हायकोर्टाचे वकील अँड. श्री.जे. शेखर व मनपा शिक्षण विभागा तर्फे सदर दाव्याचे कामकाज पहाणारे अँड.श्री. व्हि.के.सानप यांनीही त्यांच्या अभिप्राया व्दारे रक्कम स्विकारण्यास हरकत नाही असे नमुद केले आहे. तरी वरील सर्व बाबींचा विचार करुन पुढील आदेश होणेस सादर

30/11/2019

**मा. लेखापाल (प्र.)**

सन १९८८ ते १९९५ या कालावधीत तत्कालीन मनपा शिक्षण मंडळाने वेळोवेळी दि प्राथमिक शिक्षक सहकारी बँक, नाशिक यांचेकडे रु. ३,९१,४९,९२८/- रकमेच्या मुदतठेवींच्या रकमा प्रलंबित होत्या. मा. दिवाणी न्यायालय, नाशिक येथे सदर प्रलंबित दावा क्रमांक ३४३/१९९९ या निकाल शिक्षण विभागाच्या बाजूने लागून बँकेस शिक्षण विभागास रु. ४,५७,३५,०८८/- अदा करण्याचा आदेश झालेला आहे. त्यामुळे सदर रकमेपेक्षा कमी रक्कम शिक्षण विभागास स्विकारता येणार नाही.

तरी पुढील आदेशास सादर.

उपलेखापाल

**मा. शि. अ. —**

तत्कालिन मनपा शिक्षण मंडळाच्या रु. ३,९१,४९,९२८/- मूळ रकमेच्या मुदतठेवी प्राथमिक शिक्षक बँकेत ठेवलेल्या होत्या. सदर मुदतठेवींची मुदत संपल्यानंतर व्याजासह त्या शिक्षण मंडळास शिक्षक बँकेने न दिल्याने बँकेविरुद्ध नाशिक येथील दिवाणी न्यायालयात दावा ३४३/१९९९ करण्यात आला होता. सदर दाव्याचा निकाल ३/८/२००० रोजी शिक्षण मंडळाच्या बाजूने लागून रु. ४,५७,३५,०८८/- शिक्षण मंडळास बँकेने अदा करावे, असा आदेश मा. न्यायालयाने दिलेला आहे.

स्पे. द. नं. ३९/२००७ अन्वये मा. सिव्हील जज्ज सो. सिनीयर डिव्हीजन नाशिक यांचे कोर्टात बँकेने (पतसंस्थेने) रु. ३,००,००,०००/- रु. तीन कोटी फक्त) मनपा शिक्षण विभागाने स्विकारावे अशी विनंती केली आहे.

तथापि मा. न्यायालयाने दि. ३/८/२००० रोजी दिलेल्या

निकालात रु. ४,५७,३५,०८८/- शिक्षण विभागास ~~सादर~~ अदा करावी असे आदेश असल्याने सदर रकमेपेक्षा कमी रक्कम बँकेकडून स्विकारणे उचित होणार नाही तरी याबाबत पुढील आदेशास्तव सविनय सादर

[signature] 30.11.19

मा० अतिरिक्त आयुक्त सो/- लेखापरिक्षण विभाग

[signature] 3/12

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. ........ दि. ........
जा.क्र. १७५० दि. 30/11/19

लेखापरिक्षण विभाग
आवक क्र.- १०९६ दि.- 3/12/19
जावक क्र.- दि.- / /

मा. न्यायालयाच्या निर्णया प्रमाणे ~~रक्कम~~ रक्कम स्विकारणे योग्य राहिल.

सह.ले.प.
लेखापरिक्षक [signature] 12.12.19

अति. आयुक्त कार्यालय म.न.पा., नाशिक
९००
दि. 30/11/19
सन २०

मा. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे रक्कम स्विकारणे योग्य राहिल.

[signature] ११/१२/१९

~~उपमुख्य~~
(प्रतिभा मोरे)

~~मा. मुख्य~~
(बी. जे. सोनकांबळे)

~~फेरसादर~~

५।१। क्र ३८३/१९९९ दिनांक

विषय :-

दावा क्र. ३८३/१९९९ दिनांक ३०/०८/२००० रोजीच्या मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार शिक्षक सहकारी बँकेने मनपा शिक्षण-विभागास मुद्दल रु. २१. ४.५७. ३५.०८८/- इतकी दिनांक ०१/०८/१९९९ पासून दर साल दर शेकडा १५% व्याज दराने रक्कम मनपास मिळेपर्यंत देण्याचे आदेश आहे.

अद्याप पावेतो मनपास कोणतीही रक्कम प्राप्त झालेली नाही.

कोर्ट आदेशानुसार आजपावेतो मुद्दल रु. २१ ४.५७.३५.०८८/- यावर २४५ महिन्यांच्या व्याजासह अंदाजे जवळपास रक्कम ९८ कोटी पर्यंत होऊ शकते.

नस्तीस उपलब्ध असलेल्या कागदपत्रावर बँकेच्या मालमत्तेची जप्ती होऊन लिलाव करण्यात आलेले आहे. तथापि त्यास प्रतिसाद मिळत नसल्याचा विभागाने नमूद केले आहे.

बँकेच्या इतर मालमत्तेची जप्ती होऊ शकत नाही. असे विभागाने नेमलेल्या कायदेसल्लागार यांनी अभिप्राय दिलेले आहे. त्याचे दिनांक २१/७/२०१९ चे पत्र नस्तीस जोडलेले आहे.

अशा सर्व पार्श्वभूमीवर मनपाच्या पॅनलवरील जेष्ठ कायदेसल्लागार यांचे अभिप्राय घेण्यात यावे- असे मत आहे.

सह .के.प (किरण धारवाडकर) 13.12.19

उप मु.ले.प (प्रतिभा मोरे) — १३/१२/१९

मा. मु.ले.प (बी.जे. सोनकांबळे) उपरोक्त प्रमाणे आता

प्राप्त होणारी रक्कम अंदाजे 18 ते 19 कोटी आहे. त्याअनुषंगाने जेष्ठ कायदेसल्लागार यांचे अभिप्राय घ्यावे असे मत आहे.

13/12/19

आयुक्त कार्यालय, नाशिक मनपा
नस्ती क्रमांक :- EDU/312
आवक दिनांक :- 16/12/2019
जावक दिनांक :- 17/12/2019

मा. आयुक्त

17-12-19

शिक्षण विभाग – श्री: इंगळे

17.12.19

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. २६६६ दि. १७/१२/१९

सादर
मा. आयुक्त सो. यांच्या दि. 17/12/2019 च्या आदेशान्वये मनपा पॅनलवरील जेष्ठ कायदेसल्लागार यांचे अभिप्राय घेणेस्तव सविनय सादर.

21/12/2019

मा. लेखापाल (प्र) – उपप्रशासनाधिकारी संबंधित
23/12/19

मा. वि. अ. – प्रस्तावित केल्यानुसार जेष्ठ कायदेसल्लागार यांचे अभिप्राय मिळणेस्तव सविनय सादर
24.12.19

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. ...... दि. ......
जा.क्र. ९६६६ दि. २६/१२/१९

विधी विभाग –

विधी विभाग मनपा, नाशिक
आ.क्र. २०३ दिनांक २८/१२/१९
जा.क्र. ........ दिनांक ........

मे सादर.

पृष्ठ क्र २४ वरील टिपणीनुसार व अपेक्षित मुद्याचे पत्रानुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी मनपा पॅनल वकील समीर जोशी यांचे कडून मा जिल्हा न्यायालयातील दावा क्र. ३४३/२०१९ मील आदेशानुसार - शिक्षक सहकारी बँकेबाबतीत अभिप्राय प्राप्त करुन घेणेकामी पुढील आदेशार्थ सादर.

वलि - [signature] २०/१२/२०१९
[प्रसन्नजीत चौरे]

मा. उप आयुक्त [विधी/प्रं.] :- [signature] soln
[श्री एम आर घोडेपाटील]

शिक्षण विभाग श्री. इंगळे

[signature] 1.1.2020

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. २८०८३ दि. ३०/१२/१९
जा.क्र. ........ दि. ........

मा. सविनय सादर,

सदरची नस्ती व त्यासोबतचे पत्र मिळाले त्याप्रमाणे मी माझा अभिप्राय स्वतंत्रपणे दिलेला आहे, त्याचे अवलोकन व्हावे व त्याबाबतचा निर्णय आपले स्तरावर घेण्यात यावा.

दि-20/1/2020

[signature]
ॲड.समीर वि. जोशी
(नाशिक म.न.पा पॅनल ॲडव्होकेट)

सादर -

मा. आयुक्त सो. यांच्या दि. 17/12/2019 च्या आदेशानुसार मनपा पॅनलवरील जेष्ठ कायदेसल्लागार ॲड. श्री. समीर जोशी यांचा अभिप्राय दि. 20/01/2020 रोजी प्राप्त झाला असून, सोबत अभिप्राय जोडला आहे. अवलोकनार्थ सविनय सादर.

[signature]
21/01/2020

मा. लेखापाल (प्र) यथाप्रमाणित.
[signature]
21/01/2020

मा. शि. अ. - टिपणी पृष्ठ क्र. 24 वरील दिलेल्या

निर्देशानुसार मनपा पॅनलवरील ज्येष्ठ कायदेसल्लागार श्री. समीर जोशी यांचे अभिप्राय प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार पुढील आदेशास्तव सविनय सादर

22.1.2020

मा. अतिरिक्त आयुक्त सो -

श्री. जोशी यांचे अभिप्राय टिपणी मध्ये नमूद करावे.

23/1/20

श्री. इंगळे

23.1.2020

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क. —— दि. ——
जा.क. ३१४ दि. 23/1/2020

आयुक्त कार्यालय म.न.पा., नाशिक
२०५
22/1/20

आवक नं. २०६
दि - 23/1/2020

सादर

मा.आयुक्त सो मनपा यांच्या दिनांक 17/12/2019 च्या मंजुर टिपणी नुसार मनपा पॅनलवरील कायदेसल्लागार अँड.श्री. समीर जोशी यांचा अभिप्राय दिनांक 20/01/2020 रोजी प्राप्त झालेला आहे.सदर अभिप्रायात खालील प्रमाणे सल्ला अँड श्री समीर जोशी यांनी दिलेलाआहे.

1) उपस्थित असलेल्या दस्तान्वये असे निदर्शनास येते की, नाशिक महानगरपालिका शिक्षण मडळाने दि.08/05/1999 रोजीच्या गहाणखतातील चार मिळकती जाहीर लिलावाव्दारे ,दवंडी पिटवुन तसेच दैनिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस देवुन विक्री करण्याचे व त्यातुन शिक्षण मंडळाची रक्कम वसुल करण्याचे प्रयत्न केले. परंतु यास सर्व कायदेशिर प्रक्रियेस जनतेकडुन कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे रक्कम वसुल होवु शकली नाही.
2) आचार्य दोंदे भवन विदयार्थी न्यास,नाशिक ही धर्मदाय आयुक्त यांच्या कडे नोदविलेली संस्था असल्या मुळे मा. धर्मदाय आयुक्त यांच्या कायदेशिर पुर्व परवानगी शिवाय ट्रस्ट ची मिळकत गहाण ठेवता येत नाही. त्यामुळे या ट्रस्टच्या मालकीची असलेली सि.टी.स.न.6762 फायनल प्लॉट न.219 यासी क्षेत्र 4801.00 चौ.मी. या मिळकतीतुन नाशिक महानगरपालिका शिक्षण मंडळाची रक्कम मे.कार्टाच्या आदेशाप्रमाणे वसुल होणे शक्य नाही. व असाचअभिप्राय शिक्षण विभागाचे या दाव्या संदर्भात कामकाज पहाणारे वकिल अँड.श्री. व्हि.के.सानप व मुंबई उच्च न्यायालयाचे वकिल अँड.श्री.जे.शेखर यांनी यापुर्वीच दिलेला आहे.त्यामुळे माझ्या मताप्रमाणे मे.कोर्टाने दिलेल्या दि.06/10/2005 रोजीच्या आदेशात नमुद केलेली व तोपर्यंतची व्याजा सहीतची रक्कम रु.4,57,35,088/- ऐवढी अथवा यापेक्षा जास्त रक्कम संबधित पतसंस्था देण्यास तयार असेल तर या रकमेबाबत समझोता करण्याचा विचार आपले स्तरावर करावा.
3) तसेच नाशिक महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असुन यातील पैसा हा जनतेचा पैसा असतो. अशाच प्रकारे यापुर्वी ही नाशिक महानगरपालिकेने त्यांच्या कडील मोठी रक्कम श्रीराम बँक व इतर बँकामध्ये,वित्तीय संस्थामध्ये गुंतविल्या व या संस्था डबघाईला गेल्यामुळे नाशिक मनपाचे आजही मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामळे नस्तीत नमुद नोंदणीकृत गहाण खतातील मिळकती विक्री करुनही 4 कोटी 57 लक्ष एवढी मोठी रक्कम वसुल होणार नाही. की नाही ही बाब विचारात घ्यावी.नस्तीतील लेखापरीक्षण विभागाच्या शे-या प्रमाणे सदरची वसुली रक्कम काही कोटीत असु शकते.परंतु वास्तविक पणे व व्यावहारीकदृष्या प्रस्तावाबाबतचा विचार करणे आवश्यक आहे.
4) या बाबत माझा अभिप्राय असा कि,सदरच्या स्पेशल दरखास्त न.39/2007 मध्ये समझोता करावयाचा असल्यास मुददल व त्यावरील काही काळाचे व्याज म्हणजेच मे.कोर्टाने दि.06/10/2005 रोजी पारीत केलेल्या आदेशा प्रमाणे र.रु.4,57,35,088/- ऐवढया रकमेच्या खाली समझोता करणे योग्य होणार नाही. असे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसत असल्यामुळे वर नमुद केलेली रक्कम अथवा त्यापेक्षा जास्त रक्कम आपसात बैठक घेऊन चर्चा करुन मान्य करावी व मान्य झालेल्या रकमेबाबचा समझोता हा मे.कोर्टातील स्पेशल दरखास्त न.39/2007मध्ये करण्यात यावा.जेणे करुन सर्व कायदेशिर बाबींची पुर्तता पुर्ण होईल. मे.कोर्टात या प्रमाणे सुलेहनामा दाखल झाल्या नंतर व त्याप्रमाणे ठरलेली रक्कम मिळाल्या नंतर संबधित गहाणखतातील मिळकती या गहाणमुक्त करण्यात याव्यात.

तरी सदर अभिप्राय अवलोकनार्थ सविनय सादर

24/01/2020

P.T.O.

मा. लेखापाल(प्र). — प्राथमिक शिक्षक बँकेत
मनपाचे शिक्षण मंडळाच्या आदेशान्वये
केलेल्या [illegible] ३.३४३/१९९९ च्या
निर्णयाप्रमाणे रु. ६४,५४,३५,०८८/-
[illegible] मनपा पॅनलवरील
कायदेशीर सल्लागार ॲड. जोशी
यांनी दिलेला कायदेशीर सल्ला
शासन अवलोकन होऊन पुढील
आदेश होणेस सादर.

[signature] 28/01/2020

मा. शि. अ. — त्रुटी पूर्ततेसह सविनय फेरसादर.

[signature] 24.1.2020

मा० अतिरिक्त आयुक्तसो :

मे. कोर्टाने दि 6/10/2005 रोजी पारित केलेल्या आदेशाप्रमाणे रक्कम ६4,57,35,088 व आतापर्यंतचे व्याज संबंधीत पतसंस्थाकडून घ्यावे असे मत आहे.

[signature] 30/1/20

मा. आयुक्त — चर्चा करावी

[signature] 31.1.2020

चर्चा केली.
[illegible]
[signature]
20/3

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. ५०३ दि. 28/1/2020

अति. आयुक्त कार्यालय म.न.पा., नाशिक
२०e
दि 28/1/2020
सन २०

आयुक्त कार्यालय, नामनपा
आवक क्रमांक :- Edu/312
आवक दिनांक :- 30/01/2020
जावक दिनांक :- 31/01/2020

अति. आयुक्त कार्यालय म.न.पा., नाशिक
२९६
दि 31/1/2020
सन २०

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. ८६६ दि 20/3/2020
जा.क्र. ........ दि. ........

सादर.

नाशिक महानगरपालिका शिक्षण विभाग प्रा. शिक्षकांची सन १९८९ ते १९९५ या कालावधीतील भविष्य निर्वाह निधीची मुद्दल देय शिक्षण विभागाकडे जमा करणे बाबत निविदा घेणे कामी सदरचा प्रस्ताव या स्थायी समितीवर ठेवणे कामी सोबत जोडलेल्या डॉकेटवर मा. आयुक्त सो. मनपा यांची मान्यता घेणे कामी पुढील कार्यवाहीस सविनय सादर.

11/06/2020

मा. लेखापाल (प्र.) — 11/06/2020

मा. शि./अ. (प्र.) — 11.6.2020

मा. अति. आयुक्त (सेवा) 11/6/20

M speak.

मा. आयुक्त सो. 11/06.

आयुक्त कार्यालय, नाशिक मनपा
नस्ती क्रमांक :- B-2065A
आवक दिनांक :- 11/6/2020
जावक दिनांक :- 12/6/2020

सादर

नाशिक महानगरपालिका शिक्षण विभाग प्रा.शिक्षक सन १९८९ ते १९९५ च्या कालावधीतील भविष्य निर्वाह निधी मुदत ठेव शिक्षण विभागाकडे जमा करणे बाबत. निर्णय घेणे कामी सदरचा प्रस्ताव हा स्थायी समितीवर ठेवणे कामी सोबत जोडलेला डॉकेटवर मा.आयुक्त सो. मनपा यांची स्वाक्षरी होणे कामी पुढील कार्यवाहीस सविनय सादर

18/06/2020

मा. लेखापाल (प्र.) – यथाप्रमाणित.

18/06/2020

मा० हि.अ.(प्र.) –

**सविनय सादर**

**विषयः- प्राथमिक शिक्षक पतसंस्थेकडुन मनपा शिक्षण विभाग प्राथमिक शिक्षकांची भविष्य निर्वाह निधीतील मुदतठेव ठेवलेली रक्कम परत मिळणे बाबत..**

संदर्भ :-1) मा.श्री.गणेश बबनराव गिते,सभापती स्थायी समिती, नाशिक महानगरपालिका नाशिक यांचे दिनांक 11/06/2020 चे पत्र

उपरोक्त विषयान्वये, सन 1989 ते 1995 दरम्यान वेळोवेळी तत्कालीन शिक्षण मंडळाने मनपा शिक्षण विभागाचे प्राथमिक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी वर्गणी एकूण रक्कम रु.3,91,49,128/- मुदत ठेव म्हणुन दि.प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि.नाशिक येथे ठेवण्यात आली होती. सदरच्या मुदतठेवी देय झाल्यांनतरही शिक्षक बँकेने मुदत ठेवीची रक्कम अदा केली नाही. त्यामुळे शिक्षण मडळाने दि.08/05/1998 रोजी शिक्षक बँकेच्या नाशिक येथिल बोहोरपटटी,येवला,नादगाव,चांदवड मिळकती शिक्षण मंडळा कडे गहानखताव्दारे गहाण ठेवुन घेतल्या व सन 1999 मध्ये शिक्षक बँके विरुध्द नाशिक येथील दिवाणी न्यायालयात दावा क्र.343/1999 दाखल केला होता. त्याचा निकाल दि.30/08/2000 रोजी शिक्षण विभागाच्या बाजुने होवुन सदर मुदत ठेवी रकमेवर द.सा.द.शे.15 टक्के व्याजदराने देण्याचा आदेश देण्यात आला. त्याप्रमाणे मा.न्यायालयाने दिनांक 06/10/2005 रोजी र.रु.4,57,35,088/- ( अक्षरी रक्कम रुपये चार कोटी सत्तावण्ण लक्ष पस्तीस हजार अठठयांशी मात्र) शिक्षण विभागास अदा करणेचे आदेश दिले.सदर बॅक डबघाईस गेल्याने बँकेचा बॅकिंग परवाना दि.25/09/2000 रोजी रदद झाला व मे.ग्राहक तक्रार निवारण मंच नाशिक यांनी सदर बँकेस त्यांचे ठेवीदारांना त्यांची मुददल रक्कम देणे बाबत आदेशित केले होते त्यामुळे त्यावेळी पतसंस्था रक्कम देऊ शकली नाही. त्यामुळे फायनल डिक्री क्र.1/2001 दाखल करुन बँकेच्या मिळकती जप्त करण्यात आल्या व जप्त केलेल्या मिळकतींवर शिक्षण विभागाचा बोजा चढविण्यात आला. जप्त केलेल्या मिळकती शिक्षण विभागातर्फे लिलावास काढण्यास मा.न्यायालयाने दि.06/10/2005 रोजी परवानगी दिली.त्यानुसार आदेशाच्या अंमलबजावणी कामी दरखास्त न.39/2007 दाखल करुन खालील मिळकतींच्या लिलाव प्रक्रिया करणेस परवानगी मागितली. तसेच बँकेने करुन दिलेल्या गहाणखतास आचार्य दोंदे विदयार्थी भुवन न्यास .नाशिक नोदणी क्र. पी टी आर क्र. ई- 374 नाशिक ता.17.121976 या विश्वस्त संस्थेचे विश्वस्त म्हणुन संमती देणार आहे. तसे आचार्य दोदे भुवन विदयार्थी न्यास नाशिक कार्यकारी मंडळाने सदर रकमेची जबाबदारी साठी संमतीदार राहण्याचे ठरविले होते. संमतीदार या नात्याने या न्यासाची मिळकत म्हणजेच सिटी सर्व्हे न. 6762 फायनल प्लॉट न.219 क्षेत्र 4801.00 चौ. मी. आणि त्यावरील बांधकामाची मिळकत जामीन आहे.

त्या अनुषंगाने मा.न्यायालयाच्या परवानगीने अनुक्रमे दिनांक 2804/2014 व दिनांक 17/06/20166 रोजी नाशिक येथिल बोहोरपटटी येथिल मिळकतीचा लिलाव करुन रक्कम वसुल करण्याबाबत प्रयत्न केले होते. परंतु लिलाव प्रक्रियेस कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही.

नाशिक येथिल बोहोरपटटी तसेच येवला,चांदवड,मनमाड येथिल मिळकतींचे मुल्यांकन काढले असता चारही मिळकतीचे मुल्यांकन फक्त र.रु.1,44,00,000/- असे आहे.

त्यामुळे मे.दिवाणी न्यायाधिश,वरीष्ठ स्तर नाशिक यांचे कोर्टात दि.13/02/2009 रोजी आचार्य दोंदे विदयार्थी वस्ती गृह ही मिळकत जप्त करुन मागितली होती.व सदरच्या अर्जावर मे.दिवाणी न्यायाधिश,वरीष्ठ स्तर यांनी दि.16/04/2009 रोजी हुकुम करुन सदरचे मिळकतीचे शिक्षण विभागाकडे रजिष्ठर गहाणखत करुन दिलेले नसल्यामुळे मिळकत जप्त करुन मागता येणार नाही.असा हुकुम केलेला आहे.

त्यामुळे शिक्षण विभागा तर्फे सदर दाव्याचे कामकाज पहाणारे ॲड.श्री. व्हि.के.सानप यांचे दिनांक 24/11/2016 व अनुक्रमे दि.09/10/2018 रोजी अभिप्राय मागविला असता न्यायालयाने दिनांक 10/08/2000 रोजी दिलेला निर्णय योग्य असुन र.रु.4,57,35,088/-(अक्षरी रक्कम रुपये चार कोटी सत्तावण्ण लक्ष पस्तीस हजार अठठयांशी मात्र ) शिक्षण विभागाने स्विकारावी.त्यात तडजोड करु नये असा अभिप्राय दिला.तसेच पत्र क्र JS&c/MUMBAI/NMC/131 /2017 अन्वये दिनांक 13/04/2017 रोजी ई मेल व्दारे मनपाचे मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड.जे.शेखर यांचाही अभिप्राय प्राप्त झाला. त्यांच्या अभिप्रायात सदर दाव्याचे शिक्षण विभागा मार्फत काम बघणारे ॲड श्री. व्हि.के.सानप यांचा अभिप्राय योग्य असल्याचे कळविले आहे.

तसेच मा. अतिरीक्त आयुक्त सो यानी दिनांक 13/12/2019 रोजी आदेशित केल्यानुसार मनपा पॅनल वरील कायदेतज्ञ ॲड श्री.समिर जोशी यांचा अभिप्राय दि.20/01/2020 रोजी शिक्षण विभागास प्राप्त झाला. सदर अभिप्रायात त्यांनी असे नमुद केले कि, नाशिक महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असुन यातील पैसा हा जनतेचा पैसा असतो. अशाच प्रकारे यापुर्वी ही नाशिक महानगरपालिकेने त्यांच्या कडील मोठी रक्कम श्रीराम बँक व इतर बँकामध्ये,वित्तीय संस्थामध्ये गुंतविल्या व या संस्था डबघाईला गेल्यामुळे नाशिक मनपाचे आजही मोठया प्रमाणत नुकसान झालेले आहे. त्यामळे नस्तीत नमुद नोंदणीकृत गहाण खतातील मिळकती विक्री करुनही 4 कोटी 57 लक्ष एवढी मोठी रक्कम वसुल होणार की नाही ही बाब विचारात घ्यावी.नस्तीतील लेखापरीक्षण विभागाच्या शे-या प्रमाणे सदरची वसुली रक्कम काही कोटीत असु शकते.परंतु वास्तविक पणे व व्यावहारीकदृष्या प्रस्तावाबाबतचा विचार करणे आवश्यक आहे.सदरच्या स्पेशल दरखास्त न.39/2007 मध्ये समझोता करावयाचा असल्यास मुददल व त्यावरील काही काळाचे व्याज म्हणजेच मे.कोर्टाने दि.06/10/2005 रोजी पारीत केलेल्या आदेशा प्रमाणे र.रु.4,57,35,088/- ऐवढया रकमेच्या खाली समझोता करणे योग्य होणार नाही. असे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसत असल्यामुळे वर नमुद केलेली रक्कम अथवा त्यापेक्षा जास्त रक्कम आपसात बैठक घेऊन चर्चा करुन मान्य करावी व मान्य झालेल्या रकमेबाबचा समझोता हा मे.कोर्टातील स्पेशल दरखास्त न.39/2007मध्ये करण्यात यावा जेणे करुन सर्व कायदेशिर बाबींची पुर्तता पुर्ण होईल. मे.कोर्टात या प्रमाणे सुलेहनामा दाखल झाल्या नंतर व त्याप्रमाणे ठरलेली रक्कम मिळाल्या नंतर संबधित गहाणखतातील मिळकती या गहाणमुक्त करण्यात याव्यात असे नमुद करण्यात आले आहे.

तथापी निकाल लागल्याच्या दि.30/08/2000 पासुन निकालात नमुद र.रु.4,57,35,088/- या रकमेवरील दि.31/05/2020 रोजी पर्यंत व्याजाची परीगणणा केली असता र.रु. 18,11,75,122 /-इतकी होते.त्याअनुषंगाने र.रु.18,11,75,122/- इतकी रक्कम स्विकारावी असे विभागाचे मत आहे.तरी रक्कम 'अ' रु.18,11,75,122/- स्विकारावी किंवा र.रु.4,57,35,088/- स्विकारावी हा निर्णय होणे कामी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती वर ठेवणे कामी सोबत जोडलेल्या डॉकेट वर मा. आयुक्त सो.मनपा यांची स्वाक्षरी होणे कामी पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर

19/06/2020

मा. लेखापाल (प्र.) — अवलोकनार्थ.

19/06/2020

मा. वि./अ. (प्र.) — प्रस्तावित 'अ' प्रमाणे.

23.6.2020

मा. अति. आयुक्त (सेवा) — 'अ' प्रमाणे

24/6/20

मा. आयुक्त सो.

विभाजक

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## कार्यवाही - अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल (क) | दिनांक | पा.न.(का) |
|---|---|---|---|
| 1 | गोषवारा | . | 1 |
| 2 | स्पे. दरखास्त नं. 343/99 दावा दाखल | | 3 |
| 3 | फायनल डिक्री अ.नं. 4/2001 दरखास्त करून आक्टोबर 2005 चा निकाल | 06/10/2005 | 51 |
| 4 | गाळा मिळकती जप्त करून मिळणे बाबत मे. सिव्हील जज्ज सा.सि. डि. नाशिक यांचे कडे अर्ज | 13/02/2009 | 57 |
| 5 | स्पे. दरखास्त नं. 39/2007 बाबत आदेश | 16/04/2009 | 59 |
| 6 | रिझर्व बँक ॲक्ट 1949 | | 63 |
| 7 | मुदत ठेवींवर व्याजाबाबत रिजर्व बँकेचा आदेश | 19/04/2001 | 65 |
| 8 | बँकेचा परवाना रद्द आदेश | 26/09/2000 | 73 |
| 9 | ॲड. श्री.के. सानप यांचा अभिप्राय | 24/11/2016 | 79 |
| 10 | मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड. श्री. जे. शेखर यांचा अभिप्राय | 13/04/2017 | 83 |
| 11 | दि. प्राथमिक शिक्षक बँके कडून समझोता प्रस्ताव | 31/08/2018 | 87 |
| 12 | बँकेने शिक्षण विभागास दिलेला इरादापत्र | | 94 |
| 13 | सुलेहनाम्या बाबत ॲड. श्री. सानप यांचा अभिप्राय मिळणे बाबत पत्र | 11/10/2018 | 95 |
| 14 | ॲड. श्री. सानप यांचा अभिप्राय | 12/10/2018 | 97 |
| 15 | ॲड. श्री. सानप यांचा अभिप्राय | 09/10/2018 | 99 |
| 16 | आचार्य दोंदे भवन जागेसाठी दावा दाखल करणे कामी वकीलांना पत्र | 11/02/2019 | 108 |
| 17 | ॲड. श्री. व्ही. के. सानप यांचे पत्र | 02/07/2019 | 111 |
| 18 | जप्त मिळकतींचे मूल्यांकन | | 113 ते 125 |
| 19 | नाशिक मे. सिव्हील जज्ज साहेब सिनियर डि. यांचे कडे बँकेचा सुलेहनामा अर्ज | 15/11/2019 | 127 |
| 20 | मनपा कायदे सल्लागार श्री. ॲड. जोशी यांना अभिप्राय देणे बाबत पत्र | 27/12/2019 | 131 |
| 21 | ॲड. श्री. जोशी यांचा अभिप्राय | 20/01/2020 | 132 |
| 22 | सभापती स्थायी समिती यांचे पत्र. | 11/06/2020 | 137 |
| 23 | शिक्षण निरीक्षक यांचा दि. 10/05/13 चा आ. | 10/05/2013 | 148 |
| 24 | शिक्षण विभागाने केलेले अपील | 27/10/16 | 156 |
| 25 | शिक्षण निरीक्षक आदेश | 09/04/2017 | 170 |
| 26 | शिक्षण विभागाने केलेले अपील | 13/04/17 | 176 |
| 27 | स्थायी वर ठेवणे टीप | 26/06/20 | 185 |
| 28 | स्थायी समिती ठराव | 04/07/2020 | 188 |

17 (3)

पावती क्र. रु 2,00,000 / ज्ञापक 230/A / प्रमाणक / ८९२९

नोंदणी ३९ म
Regn. 39 m.

दस्तऐवजाचा/अर्जाचा अनुक्रमांक

दिनांक ८/५ सन १९ ९८

दस्तऐवजाचा प्रकार— गहाण ३,०९,४९,९२८

सादर करणाराचे नांव— श्रीमती मंगलताई पोपट मोरे

खालीलप्रमाणे फी मिळाली— द्वा - चेअरमन

| | |
|---|---|
| नोंदणी फी | २०,०००— |
| नक्कल फी (फोलिओ ) | |
| पृष्ठांकनाची नक्कल फी | ६०— |
| टपालखर्च | |
| नकला किंवा ज्ञापने (कलम ६४ ते ६७) | २५ |
| शोध किंवा निरीक्षण | २५ |
| दंड—कलम २५ अन्वये | ९२५ |
| कलम ३४ अन्वये | ३०— |
| प्रमाणित नकला (कलम ५७) (फोलिओ ) | |
| इतर फी (मागील पानावरील) बाब क्र. | |
| एकूण | २०,९९६— |

द्वा चेअरमन
प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., नासिक
[illegible], नासिक–४२२ ००१

भारतीय स्टेट बँक ट्रेझरी शाखा
नाशिक येथे चलन क्र. ३० व ३९
दिनांक / /१९९ ने जमा केली.
८/५/९८

दस्तऐवज / नक्कल ......... रोजी तयार होईल व नोंदणीकृत डाकेने पाठवली जाईल. / या कार्यालयात देण्यात येईल.

दुय्यम निबंधक
दुय्यम निबंधक, नाशिक-२

दस्तऐवज खाली नांव दिलेल्या व्यक्तीच्या नावे नोंदणीकृत डाकेने पाठवावा. / हवाली करावा.

सादरकर्ता

ATTESTED

Administrative Officer,
Municipal Corporation School Board,
Nashik.

2

दस्तऐवज प्रकार : } १) ______
लिहून घेणार : } २) ______

लिहून देणार : } १) ______
२) ______

१. मूल्यांकन शेरा

दस्तऐवजाचे पृष्ठांवर किंवा शेवटच्या शेऱ्याच्या आधी नोंदणी अधिकाऱ्या खालील स्वरूपाचा शेरा मारणे बंधनकारक आहे.

मिळकतीचे स्वरूप : बिगरशेती प्लॉट / रहिवासी सदनिका / बंगला / जुने घर / वाणिज्य गाळे / ऑफिस / शेत जमिनी/जिरायती/हंगामी बागायत/ बागायत

क्षेत्र :

लावलेला दर :

बाजारमुल्य दर तक्त्यातील मूल्य विभाग/उपविभाग क्रमांक :

रकाना क्रमांक :

इतर आदेशांचा संदर्भ घेतला असल्यास त्याचा क्रमांक :

दुय्यम निबंधक ______

ATTESTED

Administrative Officer,
Municipal Corporation School Board
Nashik.

(e)

OFFICE OF THE
JOINT DISTRICT REGISTRAR
NASIK, MAHARASHTRA
MAH/CCRA/DIST/006

भारत STAMP DUTY महाराष्ट्र
SPECIAL ADHESIVE
Rs.≈0200000 -8.5.98
281989 00043
INDIA MAHARASHTRA
# 11086673027

Sub-Registrar
(Valuation) Nasik

अनुक्रमांक 8229
सन १९९ 8चे मे चे
8 दिनांकास 8 ते 8-5-98चे
दरम्यान दुय्यम निबंधक, नाशिक-१.
यांचे कार्यालयात हजर केला.

| फी घेतली ती रू. | पैसे |
|---|---|
| नोंदणी | 20,000/- |
| फोटो पाने (98) | 100/- |
| शेरा | २- |
| रूजवात | २- |
| फायलिंग | १२- |
| टपाल | ३०- |
| एकूण | 20,996/- |

चेअरमन
नाशिक डिस्ट्रि. इंडस्ट्रि. को-ऑप. बँक लि., नाशिक.
१०४, बाहरपट्टा, नाशिक-४२२ ००१

दुय्यम निबंधक, नाशिक-१

दुय्यम निबंधक, नाशिक-२

| नाशिक |
|---|
| 8229 / 9-92 |
| 9339 |

"श्री"

# :: गहाणखत ::

गहाणखत आज तारीख ८ माहे मे इसवी सन 1998 रोज शुक्रवारी दिवशी नाशिक मुक्कामी –

ATTESTED

Administrative Officer,
Municipal Corporation School Board
Nashik.

| | | |
|---|---|---|
| नाशिक महानगरपालिका शिक्षण मंडळ, | : | |
| नाशिक महानगरपालिका,नाशिक तर्फे | : | लिहून घेणार |
| —यांसी— | | |
| दि प्राथमिक शिक्षक सहकारी बॅंक लि. | : | |
| 904, बोहोरपटट्री नाशिक. 422 001 | : | |
| नोंदणी कमांक – 7944 दि.14.8.1939 | : | |
| यांचे तर्फे चेअरमन – दि प्राथमिक शिक्षक | : | लिहून देण |
| सहकारी बॅंक लिमिटेड, नाशिक. | : | |
| 1. श्री. बाबासाहेब किसन पवार | : | |
| वय 49 धंदा– नोकरी, | : | |
| चेअरमन, प्राथमिक शिक्षक सह.बॅंक लि. | : | |
| मु.पो.ता. येवला जि. नाशिक. | : | |
| 2. श्रीमती मंगलाताई पोपट गोजरे, | : | |
| वय 48, व्हॉईस चेअरमन – प्राथमिक | : | |
| शिक्षक सहकारी बॅंक लि. नाशिक.5 | : | |
| धंदा– नोकरी रा. जेलरोड, पाण्याच्या | : | |
| टाकीजवळ, नाशिकरोड,नाशिक | : | |
| 3. श्री.रणजीत रघुनाथ दुबे, | : | |
| व्यवस्थापक,–प्राथमिक शिक्षक सह.बॅंक | : | |
| वय 47 धदा– नोकरी | : | |
| रा. 2401, बुधवार पेठ, नाशिक.1 | : | |
| —यांसी— | | |
| 1. श्री. दत्तात्रय मुरलीधर वरंदळ, | : | |
| वय 42 धंदा– नोकरी, | : | |
| रा.मु.पो.ता.सिन्नर जि. नाशिक | : | संमती देणार. |
| 2. श्री.साहेबराव भगवान पवार, | : | व जामीनदार |
| वय 40 धंदा– नोकरी | : | |
| रा.मुपो.ता. येवला जि. नाशिक. | : | |

**ATTESTED**

Administrative Officer,
Municipal Corporation School Board
Nashik.

(११) -24-

दस्त क्र.
६२२१/२-९३
१९९३



स्वतः करीता व आचार्य दोंदे विद्यार्थी :
भुवन न्यास, नाशिक. : संमती देणा
नोंदणी क. पी.टी.आर.क.ई–374, : व जामीनदार
नाशिक ता. 17.12.1976. या विश्वस्त :
संस्थेचे विश्वस्त म्हणून. :

कारणे आम्ही गहाणखत लिहून देतो ऐसा जे की. :

1. **मिळकतीचे वर्णन :**

अ. तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिकपैकी, म नाशिक येथील सिटी सर्व्हे नं. 1280 ,म्युनिसिपल घर नं. 90 यांसी क्षेत्र 168.00 चौ.मी. त्यावरील एकूण 4 मजले बांधीव मिळकत इमारत यांसी सर्व बांधीव क्षेत्र 1351.42 चौ.फु. म्हणजेच 125.55 चौ.मी. त्यात एक भाडेकरू यास रू. 240/- प्रतिमहा भाडयाने दिलेल्या तळमजल्यावर एक दुकानांचे भाडेकरू आहेत. त्या क्षेत्रासह बाकी सर्व क्षेत्र बॅंकेचे ताब्यात आहे यांसी चतुःसिमा येणेप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | घर नं. 905 लक्ष्मी क्लॉथ स्टोअर्स. |
| दक्षिणेस | : | एम.एफ.हसन यांचे दुकान |
| पश्चिमेस | : | घर नं. 903 कांती टी.डेपो. |
| उत्तरेस | : | श्री. कुलकर्णी यांचे घर. |

येणेप्रमाणे दरोबस्त मिळकत.

ब. तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका येवला पैकी मौ येवला येथील सिटी सर्व्हे नं. 4612 यांसी क्षेत्र 55.50 चौ.मी. 597.40 चौ.फु. त्यावर असलेले बांधीव क्षेत्र एकूण 2 मजले यांसी क्षेत्र 500 चौ.फु. म्हणजे. 46.45 चौ.मी. यांसी चतुःसिमा येणेप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | परदेशपुरा ,तालीमरोड |
| दक्षिणेस | : | नगरपालिका रस्ता. |
| पश्चिमेस | : | सि.स.नं. 4611 ,पावटेकर यांची बखळ. |

SEAL OF THE SUB REGISTRAR ... NASHIK 1.

ATTESTED

Administrative Officer,
Municipal Corporation School Board
Nashik.

92

नासक
१२२९ / ४ 3
२०१८



उत्तरेस : सि.स.नं. 4613 ,पावटेकर यांचे घर.

येणेप्रमाणे दरोबस्त मिळकत्.

क. तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नांदगांव मौजे नांदगांव येथील सर्व्हे नं. 2/अ सिटी सर्व्हे नं. 3172 यांसी प्लॉट नं. 19 वरील आर.सी.सी. फ्रेम बॅक बेसमेंट अधिक दोन मजले वर अपूर्ण बांधकाम यांसी बांधीव क्षेत्र 73.50 चौ.मी. यांसी चतु:सिमा येणेप्रमाणे. –

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | स्टेट बॅक ऑफ इंडीया शाखा नांदगांव. |
| दक्षिणेस | : | नांदगांव–मालेगांव रस्ता. |
| पश्चिमेस | : | श्री. पहाडी यांची रिकामी जागा. |
| उत्तरेस | : | श्री. पहाडी यांचे घर |

येणेप्रमाणे चतु:सिमेतील दरोबस्त मिळकत.

ड. तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका चांदवड पैकी मौजे चांदवड येथील सिटी सर्व्हे नं. 426/ब यांसी ग्रामपंचायत घर नं.117 यांसी क्षेत्र 96.00 चौ.मी. त्यावरील बांधीव क्षेत्र एकूण दोन मजले आर.सी.सी. फ्रेम वर्क यांसी एकूण बांधीव क्षेत्र 727.42 चौ.मी. यांसी चतु:सिमा येणेप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | किराणा दुकान |
| दक्षिणेस | : | अहिल्यादेवी रंगमहाल. |
| पश्चिमेस | : | ग्रामपंचायत रस्ता. |
| उत्तरेस | : | श्री. परदेशी यांचे घर. |

येणेप्रमाणे चतु:सिमेतील दरोबस्त मिळकत.

येणेप्रमाणे एकूण चार स्थावर मिळकती हया लिहून देणार यांचे मालकीच्या असून त्या पूर्णपणे निर्वेध व बिनबोजाच्या आहेत. सदर

SEAL OF THE SUB REGISTRAR
NA

ATTESTED
Administrative Officer,
Municipal Corporation School Board
Nashik.

(१५) २३

कासार
४२२८/५ ९३
१९९८



मिळकतीपैकी नाशिक येथील अनुकमे "अ" मध्ये नमुद के ी मिळकत तळमजल्यावरील दुकानात एक फजलअली हे भा असून त्या व्यतिरिक्त या मिळकतीतील संपूर्ण जागा व कबज व उपभोगात आहे. तसेच वर नमुद केलेल्या अन्य मिळकती अनु मे येवला, नांदगांव, चांदवड येथील आहेत. त्या पूर्णपणे लिहून दे र संस्थेच्या ताब्यात आहेत. या मिळकती पूर्णपणे निर्वेध व बिनबोजा ा असून त्या कोठेही गहाण, दान, करार, लिन,लिज, तारण, अगर अन्य कोणत्याही प्रकारे जडजोखमांत अडकविलेली नाहीत. या मिळकती संपूर्णपणे लिहूनदेणार या संस्थेच्या मालकीच्या असूनत्याबाबत कोणताही व्यवहार करण्यास लिहून देणार या संस्थेस पूर्णपणे हक्क व अधिकार आहेत. या मिळकती बाबत कोणत्याही कोर्टात काहीही वाद चालू नाहीत. या मिळकतीमध्ये लिहून देणार बॅकेचे फर्निचर असून त्याची किंमत अंदाजे रक्कम रू. 2,50,000/— अक्षरी ो दोन लाख पन्नास हजार मात्र इतकी असून त्याची अलाहिदा करण्यांत आली असून ती परिशिष्ट "अ" म्हणून या गहाणखतास त जोडण्यांत आली आहे. तसेच या मिळकतीमध्ये लिहून देणार व बॅकेचे फिटींग व इतर मटेरिअल असून त्याची किंमत रू. 54,451 - अक्षरी रूपये चोपन्न हजार चारशे एक्कावन्न मात्र इतकी आहे. त्याची स्वतंत्र यादी परिशिष्ट " ब" म्हणून या गहाणखतासोबत जोडण्यांत आली आहे. येणेप्रमाणे वर नमुद केलेल्या मिळकती त्यातील फिटींग व फर्निचरसह या गहाणखताने तुम्हांस गहाण देत आहोत.

SEAL OF THE SUB REGISTRAR
N. 1.

2. लिहून घेणार यांनी लिहून देणार बॅकेकडे दि. 1 1994 ते 20.3.1995 या मुदतीत वेगवेगळया कायम मदुतीच्या ठेवल्या असून त्या येणेप्रमाणे आहेत. दि. 28.2.98 र व्याजासहीत रक्कम.

ATTESTED
Administrative Officer,
Municipal Corporation School Board
Nashik.

(१६)

| अ.नं. | पावती. नंबर | ठेवीची रक्कम | ठेव स्विकार –ल्याची तारीख | मुदत संपल्या ची तारीख | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 919 | 4,00,000 | 18.12.89 | 27.2.96 | 9,97,118 |
| 2. | 368 | 8,00,000 | 27.1.95 | 26.1.97 | 11,49,957 |
| 3. | 926 | 10,00,000 | 30.1.90 | 29.1.97 | 24,66,[illegible] |
| 4. | 1725 | 10,00,000 | 4.12.95 | 4.12.96 | 13,42,[illegible] |
| 5. | 918 | 7,00,000 | 11.12.89 | 10.12.96 | 17,54,[illegible] |
| 6. | 219 | 15,44,200 | 20.5.94 | 19.5.97 | 23.52,[illegible]5 |
| 7. | 514 | 12,83,850 | 13.5.95 | 12.5.97 | 18,37,[illegible]3 |
| 8. | 515 | 5,16,150 | 3.5.95 | 2.5.97 | 7,41,4[illegible]1 |
| 9. | 917 | 26,00,000 | 23.11.89 | 22.11.96 | 15,20,596 |
| 10. | 388 | 8,11,800 | 20.3.95 | 19.3.97 | 11,61,429 |
| 11. | 1723 | 21,67,320 | 10.10.95 | 10.10.96 | 29,76,132 |
| 12. | 1724 | 18,00,000 | 17.10.95 | 17.10.96 | 24,66,072 |
| 13. | 1722 | 90,30,449 | 15.10.95 | 15.10.96 | 1,23,80,195 |
| 14. | 911 | 6,00,000 | 9.11.89 | 8.11.96 | 15,43,0[illegible]5 |
| 15. | 765 | 20,00,000 | 12.2.94 | 12.2.97 | 31,64,[illegible] |
| 16. | 377 | 10,00,000 | 21.2.95 | 20.2.97 | 12,9[illegible] |

अक्षरी रूपये तीन कोटी एक्याण्णव लाख एकोणपन्नास हजार एकशे अठ्ठावीस मात्र — 3,91,49,128

| २ | | बांधकाम हे. उगड. विटा, सिमेंट मध्ये असुन ~~छत~~ सुमारे ३० | | | | | | | | | | | |
| ३ | | वर्षे जुने बांधकाम आहे. | | | | | | | | | | | |

**टिप :** सदर मुल्यांकन हे दिनांक **३१/३/२०१७** पर्यन्त लागु राहील. सदरचे मुल्यांकन हे बाजारमुल्य दर तक्त्या नुसार करण्यात आलेले आहे. बाजारमुल्य दर तक्ते हे मुंबई मुद्रांक अधीनियम १९५८ मधील त्या त्या उपविभागातील सर्व साधारण दर आहेत. **सदरचे मुल्यांकन मान्य नसल्यास अथवा सविस्तर मुल्यांकनासाठी प्रकरण मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३१ खाली मा. मुद्रांक जिल्हा अधिकारी नाशिक यांचे कडुन अभिनिर्णीत करुन घेणे उचित राहील.** अर्जासोबत सादर केलेल्या दस्तऐवजाच्या आधारे सदर मुल्यांकन दाखला तयार करण्यात आलेला आहे. त्यात विसंगती आढळुन आल्यास किवा बनावट दस्तऐवज सादर केलेला असल्यास त्यास अर्जदार सर्वस्वी जबाबदार राहतील व मुल्यांकन आपोआप रद्द समजण्यात येईल. ~~अर्जासोबत प्रकल्पाचा / लाभदायक क्षेत्राचा दाखला जोडलेला आहे / नाही~~ त्यावरुन मुल्यांकन तयार करण्यात आलेले आहे.

**मुद्रांक शुल्क भरण्याचे प्रयोजनार्थ मुल्यांकन दाखला दिला.**

अर्ज क्रमांक :- ३०८/१७
पावती क्रमांक :- ६८० अन्वये फी १००/- ने वसुल.
दिनांक : ९ / ३ / २०१७

दुय्यम निबंधक श्रेणी-१, येवला

अर्ज क्रं । १९९ । २०१७ । १२५

# मा.दुय्यम निबंधक श्रेणी १ चांदवड यांचे कार्यालय
## तहसिल कचेरी आवार, चांदवड, ता.चांदवड,जि.नाशिक

E-mail - sro.chandwad@gmail.com

जा.क्र.मुल्यांकन/ / ३७४ /२०१७ दि.०२/०२/२०१७

प्रति,

श्री/श्रीमती चेअरमन, शाखाधिकारी, दि. प्राथमिक शिक्षक सह पतसंस्था लि. नाशिक शाखा चांदवड

रा. चांदवड ता.चांदवड,जि.नाशिक

### विषय - मुल्याकन दाखला

वरील विषयान्वये मोजे चांदवड ता.चांदवड येथील सन २०१७चे बाजारमुल्य दर तक्त्या नुसार प्रमाणे दर आढळुन येतात.

| गांव | झोन नं. | सि.स.नं. / ग.नं./ स.नं. | क्षेत्र आर./ चौ.मी | प्रती आर | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| चांदवड | १.१७ | सि.स.नं ४२६ ग्रो.पं.मि.नं २६८ | ८६ पैकी ८२ बांधकाम | ३४३२७.५ | ३१५८१३०।- |
| | | | | | |

- वरील दर सन २०१७चे बाजारमुल्य दर तक्त्या नुसार दिलेले आहेत.
- सदरचे मुल्यांकन हे मुद्रांक शुल्क व नोंदणी फी वसुली साठी आहेत.

दुय्यम निबंधक श्रेणी-१ चांदवड

दुय्यम निबंधक श्रेणी १ चांदवड

-100-100/- 14318.134/-

स्पे.द.नं.३९/२००७

नाशिक येथील मे.सिव्हील जज्ज साहेब,सिनियर डिव्हीजन,
नाशिक यांचे कोर्टात.

नाशिक महानगरपालिका शिक्षण मंडळ,नाशिक -- वादी

– वि –

दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि. -- प्रतिवादी
नाशिक.(जुने नांव- प्राथमिक शिक्षक
सहकारी बँक लि.नाशिक.)

प्रतिवादी सदर दरखास्तीमध्ये खालीलप्रमाणे अर्ज सादर करीत आहे.

१. वादीने प्रतिवादी विरूध्द स्पे.मु.नं.३४३/१९९९ चा दावा दाखल केला होता,त्या दाव्यामध्ये प्रतिवादी विरूध्द रू. ४,५७,३५,०८८/- चा (अक्षरी रूपये चार कोटी सत्तावन्न लाख पस्तीस हजार अठठ्याऐंशी मात्र) हुकुमनामा झाला होता. त्या हुकुमनाम्यानुसार वादीने हल्लीची दरखास्त रक्कम रू. ९,५९,३१,३६४/-अक्षरी रूपये नउ कोटी एकोणसाठ लाख एकतीस हजार तीनशे चौसष्ट मात्र वसुल होवून मिळणेकामी दाखल केली आहे.

२. सदरच्या दरखास्तीचे काम सुरू असतांना वादीने प्रतिवादीच्या मालकीच्या नांदगांव,येवला,चांदवड व नाशिक येथील मिळकती जप्त करण्याकरीता अर्ज दिला होता.त्याप्रमाणे मे.कोर्टाचे हुकुमाप्रमाणे सदरच्या मिळकती जप्त करण्यांत आल्या आहे. परंतु त्या मिळकती विक्री करण्याबाबत कोणताही हुकुम झालेला नाही.

३. प्रतिवादी संस्था ही पूर्वी सहकारी बॅक होती परंतु सदरच्या बॅकेला तोटा झाल्याने व बॅकेत मोठया प्रमाणांत अपहार व गैरव्यवहार झाल्यामुळे व थकबाकीचे प्रमाणांत वाढ झाल्याने प्रतिवादी बॅकेचा बॅकींग परवाना भारतीय रिझर्व्ह बॅक ऑफ इंडीया यांनी दि.२५.९.२००० चे आदेशाने व दि.२८.९.२००० चे पत्रान्वये रदद् केला आहे.

४. प्रतिवादी संस्था आता मुदतठेवी स्विकारू शकत नाही व त्यांचे नुतनीकरणही करू शकत नाही.

५. प्रतिवादीची रक्कम वादी संस्था व्याजासह देवू शकत नाही. प्रतिवादीच्या सर्व ठेवीदारांनी त्यांच्या मुदत ठेवीच्या मुदद्ल रकमा स्विकारल्या आहेत व व्याजावरील हक्क सोडून दिला आहे.

६. प्रतिवादी संस्थेस दि.३१.०३.२०१९ रोजी रू.७,१९,०३,०३९/- (अक्षरी रूपये सात कोटी एकोणावीस लाख तीन हजार एकोणचाळीस मात्र) इतका तोटा झाल्याने प्रतिवादीच्या शेअर्सचे मुल्य ५० टक्के झाले आहे.

७. प्रतिवादीची वादीकडे प्रतिवादीचे सभासद असलेल्या वादीच्या कर्मचा-यांचे पगारातून कपात केलेली रक्कम रू. ४०,५१,२५८/-(अक्षरी रूपये चाळीस लाख एक्कावन्न हजार दोनशे अठ्ठावन्न मात्र)व त्यावरील प्रचलित व्याज दराचे दिडपट व्याज दराने होणारी रक्कम येणे बाकी आहे.सदर रक्कम वादी प्रतिवादीला देणे लागत आहे.वादीला जी रक्कम प्रतिवादीला देणे आहे त्या रकमेतून ती वळती करून प्रतिवादी देण्यास तयार आहे.

८. प्रतिवादी वादीस सदर दरखास्तीत एक वर्ष मुदतीत

रू.३,००,००,०००/-(अक्षरी रूपये तीन कोटी मात्र)चार समान हप्त्यात भरणा करण्यास तयार आहे.त्या रकमेपेक्षा जास्त रक्कम प्रतिवादी वादीस देवू शकत नाही.

९. सदरची रक्कम रू.३,००,००,०००/-(अक्षरी रूपये तीन कोटी मात्र)मे.कोर्टात भरल्यानंतर मे.कोर्टामार्फत सदरच्या दरखास्तीमध्ये वर नमुद केलेल्या मिळकतींबाबत केलेला जप्तीचा हुकुम रदद् करण्यांत यावा व गहाणाचा बोजा कमी करून त्याबाबत आवश्यक तो गहाणमुक्त करारनामा प्रतिवादीच्या लाभात लिहून व नोंदवून द्यावा.

१०. वादीची जी काही रक्कम रू.४०,५१,२५८/- व प्रचलित व्याज दराचे दिडपट व्याजदराने वसुल करण्याचा मे. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक यांचा आदेश दि.९.२. २०१७ चा झालेला आहे ती रक्कम वादीकडून प्रतिवादी कमी करून देण्यास तयार आहे. समझोत्यात जी रक्कम निश्चित होईल ती रक्कम प्रतिवादी रू.३,००,००,०००/- अक्षरी रूपये तीन कोटी मात्र मधून वळती करण्यास तयार आहे.

वरील प्रमाणे प्रतिवादी रक्कम भरण्यास तयार आहे.बाकी रक्कम सुट मिळावी. तरी येणेप्रमाणे सदर दरखास्तीचे कामी योग्य ते हुकुम व्हावे ही विनंती.हा अर्ज.

नाशिक

ता.१५.११.२०१९

**प्रतिवादी**

व्यवस्थापक

दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि.नाशिक.

## प्रतिज्ञालेख

याकामी मी,श्री.श्रीरंग नाना गीते,व्यवस्थापक दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि. नाशिक सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की वरील सर्व मजकुर हा माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी मी माझी सही या लेखाखाली केली आहे.

नाशिक

ता.१५.११.२०१९

------------------

प्रतिवादी

व्यवस्थापक

दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि.नाशिक.

ॲडव्होकेट.

(सी.डी.कुलकर्णी.)

Typed by

Compared by

NASHIK

Superintendent

21 NOV 2019

# महानगरपालिका शिक्षण विभाग, नाशिक.

राजीव गांधी भवन, शरणपूररोड, नाशिक -422 002
Email : schoolboard_nmc@rediffmail.com, फोन नं. 0253-2571289, फॅक्स नं. 0253-2314500

जा.क्र. दिनांक 26/12/2019

मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. — दि. —
जा.क्र. ९८५५ दि. २६/१२/२०१९

प्रती,
ॲड.श्री.समीर चिंतामण जोशी
मनपा कायदे सल्लागार
नाशिक

विषय :- दावा क्र.343/1999 बाबत दि.प्राथमिक शिक्षक पतसंस्थेने दि.15/11/2019 रोजी केलेल्या अर्जा बाबत अभिप्राय मिळणे बाबत

संदर्भ :- मा. आयुक्त सो यांनी दिनांक 17/12/2019 रोजी टिपणीस दिलेल्या मान्यते नुसार

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये अपेक्षित माहीती खालील प्रमाणे

मनपा शिक्षण मंडळाने सन 1989 ते 1995 दरम्यान दि.प्राथमिक शिक्षक बँक लि. बोहोरपटटी नाशिक येथे रक्कम रु. 3,91,49,128/- (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी एक्कयाण्णव लक्ष एकोणपन्नास हजार एकशे आठठावीस रुपये मात्र) रकमेच्या मुदतठेवी ठेवलेल्या होत्या. परंतु सदर बँकेस वरील रक्कम मुदतीत व्याजासह शिक्षण मंडळास परत करता न आल्याने व बँकेची आर्थिक परीस्थिती चांगली नसल्याने तत्कालीन शिक्षण मंडळाने मंडळाची रक्कम परत मिळवणे कामी दिवानी दावा क्र.343/99 दाखल केला होता.सदर दाव्यामध्ये हुकुम झाल्यानंतर सदर दाव्याची फायनल डिक्री क्र.4/2001 होवुन दिवाणी न्यायालयाने दि.प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि. यांचे विरुध्द दि.30/08/2000 रोजी रक्कम रुपये 4,57,35,088/- देण्याचा हुकुम केलेला होता.परंतु बँकेने रक्कम न दिल्याने सदरचे दरखास्तीचे कामकाज दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे.सदरच्या दरखास्तीमध्ये नाशिक महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे दि.प्राथमिक शिक्षक बँक यांच्या खालील गहाण मिळकती जप्त करुन लिलाव करुन रक्कम वसुल करण्याबाबत बरेचदा प्रयत्न केलेले होते.मनपा शिक्षण मंडळाने रे.द.न. 39/2007 मध्ये दि.प्राथमिक शिक्षक पतसंस्था यांची सि.स.न.1280 बोहोरपटटी नाशिक येथिल चार मजली इमारत बांधिव मिळकत तीन ते चार वेळेस लिलावात काढली, मिळकतीचे लिलावात कोणीही बोली बोलण्यासाठी मे.कोर्टात आलेले नाही. व त्यानंतर दि.25/09/2000 रोजीच्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आदेशान्वये बँकेचा परवाना रदद करुन बँकेचे रुपांतर पतसंस्थेत झाले आहे.

Received copy with Code. 7/1/2020

शिक्षक बँकेच्या मालकीच्या असलेल्या मिळकती, जर बँक सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरली तर खालील शिक्षक बँकेच्या मिळकती विकुन शिक्षण मंडळाची रक्कम व्याजासह वसुल करुन घ्यावी असे गहानखत शिक्षक बँक चेअरमन यांनी दिनांक 05/08/1998 रोजी शिक्षण मंडळास दि. प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि. नाशिक चे संचालक मंडळ सभा दि. 22/06/1997 ठराव क्र. 3 संमत करुन सन 1998 साली लिहुन दिलेले आहे.गहाण खतात लिहुन दिलेल्या मिळकती खालील प्रमाणे आहे.

1) तुकडी जिल्हा नाशिक,पोट तुकडी तालुका नाशिक पैकी,मौजे नाशिक बोहरपटटी येथील सीटी सर्व्हे नं. 1280 म्युनिसिपल घर न. 904 यांसी क्षेत्र 168.00 चौ. मी. त्यावरील एकुण 4 मजले बांधीव मिळकत इमारत यासी सर्व बांधीव क्षेत्र 1351.42 चौ. फु. म्हणजेच 125.55 चौ. मी. त्यात एक भाडेकरु यास रु. 240/- प्रतिमाह भाडयाने दिलेल्या तळमजल्यावर एक दुकानांचे भाडेकरु आहेत. मे. न्यायालयाने सदरच्या मिळकतीचा जाहीर लिलाव करणे कामी प्रक्रिया राबविली असता कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही.

2) तुकडी जिल्हा नाशिक,पोट तुकडी तालुका येवला पैकी मौजे येवला येथील सिटी सर्व्हे न. 4612 यांसी क्षेत्र 55.50 चौ. मी. 597.40 चौ. फु. त्यावर असलेले बांधीव क्षेत्र एकुण 2 मजले यांसी क्षेत्र 500 चौ. फुट

3) तुकडी जिल्हा नाशिक,पोट तुकडी तालुका नांदगाव पैकी मौजे नांदगाव येथील सिटी सर्व्हे न. 2/ अ सिटी सर्व्हे नं. 3172 यांसी प्लॉट न. 19 वरील आर. सी.सी. फ्रेम बेसमेट अधिक दोन मजले वर अपुर्ण बांधकाम

4) तुकडी जिल्हा नाशिक,पोट तुकडी तालुका चांदवड पैकी मौजे चांदवड येथील सिटी सर्व्हे न. 426/ ब यांसी ग्राम पंचायत घर न. 117 यांसी क्षेत्र 96.00 चौ.मी. त्यावरील बांधीव क्षेत्र एकुण दोन मजले आर. सी.सी. फ्रेम वर्क या सर्व मिळकती शिक्षण विभागाने जप्त केलेल्या आहेत.

5) वरील मिळकत शिक्षक बँकेने शिक्षण मंडळास गहाण म्हणुन दिलेली आहे.व सदर गहाण खतास आचार्य दोंदे विदयार्थी भुवन न्यास ,नाशिक नोदणी क्र. पी टी आर क्र. ई- 374 नाशिक ता.17.121976 या विश्वस्त संस्थेचे विश्वस्त म्हणुन संमती देणार आहे. तसे आचार्य दोदे भुवन विदयार्थी न[illegible] नाशिक कार्यकारी मंडळाने सदर रकमेची जबाबदारी साठी संमतीदार राहण्याचे ठरविले होते. संमतीदार [illegible] नात्याने या न्यासाची मिळकत म्हणजेच सिटी सर्व्हे न. 6762 फायनल प्लॉट न.219 क्षेत्र 4801.00 चौ. मी. आणि त्यावरील बांधकामाची मिळकत जामीन आहे.

सदरच्या दरखास्तीमध्ये मे.दिवाणी न्यायाधिश,वरीष्ठ स्तर नाशिक यांचे कोर्टात दि.13/02/2009 रोजी आचार्य दोंदे विदयार्थी वस्ती गृह ही मिळकत जप्त करुन मागितली होती. व सदरच्या अर्जावर मे.दिवाणी न्यायाधिश,वरीष्ठ स्तर यांनी दि.16/04/2009 रोजी हुकुम करुन सदरचे मिळकतीचे शिक्षण विभागाकडे रजिष्ठर गहाणखत करुन दिलेले नसल्यामुळे मिळकत जप्त करुन मागता येणार नाही.असा हुकुम केलेला आहे.

उपरोक्त बाबत दि.प्राथमिक शिक्षक पतसंस्थेने नाशिक येथिल मे. सिव्हील जज्ज साहेब सिनियर डिव्हीजन नाशिक यांचे कोर्टात दि.15/11/2019 रोजी अर्ज दाखल केलेलाआहे.सदर अर्जात र.रु.3,00,00,000/- (अक्षरी र.रु.तीन कोटी मात्र) घेऊन समझोता करावा असे नमुद केलेले आहे.व रक्कम शिक्षण विभागास अदा केले नंतर वरील सर्व मिळकती बाबत केलेला जप्तीचा आदेश रदद करुन सर्व मिळकती गहाणमुक्त करण्यात याव्या अशी मागणी केलेली आहे.

या बाबत शिक्षण विभागाच्या वतीने सदर दाव्याचे काम पहाणारे अँड.श्री.व्हि.के.सानप यांच्या तसेच अँड श्री.जे.शेखर(उच्च न्यायालय,मुंबई) यांच्या अभिप्रायानुसार व दि.30/08/2000 रोजी दिवाणी न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर ठाम राहुन निर्णयात नमुद रक्कम रु.4,57,35,088/- मिळावी असे शिक्षण विभागाचे मत आहे.तरी बँकेच्या दि.15/11/2019 च्या अर्जा बाबत आपला अभिप्राय मिळणेस विनंती.

शिक्षणाधिकारी
मनपा शिक्षण विभाग, नाशिक

132


# श्री. समीर चिं. जोशी

अॅडव्होकेट

मोबा. 9823248335
9881153501
ऑ.फोन : (0253) 2232635
E-mail - joshisameerc@gmail.com

ऑफीस नं. – १०/२, अनंत गौरव चेंबर्स, मेहेर सिग्नल, जिल्हाधिकारी कार्यालया शेजारी, इंडियन बँकेच्या वरती, नाशिक. – २


प्रति,
मा. शिक्षणाधिकारी ,
मनपा शिक्षण विभाग, नाशिक
नाशिक महानगरपालिका.

महानगरपालिका शिक्षण मंडळ, नाशिक
शासकीय/शालेय
20 JAN 2020
आवक क्र. 968
20/1/2020
का.अधि. प्र.शा.
व.स.

संदर्भ :— आपल्याकडील दि.२७/१२/२०१९ रोजीचे जावक क्र १९५५ अन्वयाचे पत्र.

विषय :— नाशिक येथील मे. कोर्टातील दावा क्र.३४३/१९९९ मधील अर्जाबाबत या अभिप्राय मिळण्याबाबत.

महोदय,

आपल्याकडील वर नमुद केलेले पत्र व त्यासोबत नस्ती मिळाली, सदरच्या पत्रात नमुद केलेले कथन तसेच सदरच्या नस्तीतील दस्त अभ्यासले. त्याप्रमाणे याबाबतचा माझा लेखी अभिप्राय मी खालीलप्रमाणे देत आहे.

१) उपलब्ध कागदपत्राअन्वये असे निदर्शनास येते की, प्राथमिक शिक्षक सहकारी बॅक लिमिटेड यांच्याकडे नाशिक म.न.पाच्या नाशिक शिक्षण मंडळाने पुर्वी काही रक्कम मुदत ठेवी म्हणुन ठेवलेली होती, त्यानंतर सदरच्या बॅकेची आर्थिक परिस्थिती खालावली व त्यामुळे सदरच्या बॅकेचा परवाना रिझर्व बॅकेने सन २००० मध्ये रद्द केलेला आहे.

२) त्यापुर्वी संबंधित बॅकेने सन १९९८ मध्ये सदरच्या मनपा शिक्षकांच्या रक्कम ठेवी परत न देता आल्यामुळे बॅकेने त्यांच्या मालकीच्या मौजे नाशिक, मौजे येवला, मौजे नांदगाव, मौजे चांदवड येथील बांधीव मिळकती नोंदणीकृत गहाणखत दस्त नं. ४२२९/१९९८ अन्वये नाशिक महानगरपालिका शिक्षक

मंडळाकडे गहाण ठेवलेल्या आहे व सदरच्या दस्तावर संमतीदार म्हणुन श्री. दत्तात्रय वरंदळ व श्री. साहेबराव पवार हे स्वत: व आचार्य दोंदे विद्यार्थी भुवन न्यास नाशिक तर्फे यांनी या दस्तावर सहया केलेल्या आहे, परंतु सदरच्या न्यासाची मालकीची मिळकत सिटी सर्व्हे नं. ६७६२ यांसी फायनल प्लॉट नं. २१९ ही मिळकती या गहाणखताच्या मिळकतीच्या वर्णनात नमुद केलेला नाही.

३) सदरची मुदत ठेवीची रक्कम वसुल करण्यासाठी शिक्षण मंडळाने बॅंकेच्या विरूध्द नाशिक येथील मे. कोर्टात दावा स्पे.मु.नं. ३४३/९९ दाखल केला व सदरचा दावा हा दि. ३०/०८/२००० रोजी मे. कोर्टाने मान्य केला, परंतु त्यानंतर दि. २५/०९/२००० रोजी भारतीय रिझर्व बॅंकेने या बॅंकेचा परवाना रद्द करून या बॅंकेचे पतसंस्थेत रूपांतर केलेले आहे. सदरची रक्कम वसुलीसाठी शिक्षक मंडळाने फायनल डिक्री अ.नं. ४/२००१ ही नाशिक येथील मे. कोर्टात दाखल करून या फायनल डिक्री चा निकाल दि. ६ ऑक्टोंबर २००५ रोजी लागलेला आहे.

४) त्यानंतर शिक्षक मंडळाने सदरची रक्कम वसुलीसाठी स्पेशल दरखास्त नं. ३९/२००७ ही नाशिक येथील मे. कोर्टात दाखल केलेली असून सदरची स्पेशल दरखास्त आज रोजी मे. कोर्टात प्रलंबित आहे. सदरची दरखास्त नं. ३९/२००७ मधील दरखास्तदार म्हणजेच नाशिक महानगरपालिका शिक्षण मंडळ यांनी दि. १३/१२/२०१९ रोजी नि. १३ अन्वये अर्ज करून ''गहाणखतात नमुद केलेली सि.टी.एस. नं. ६७६२ यांसी फायनल प्लॉट नं. २१९ याचे क्षेत्र ४८०१.०० चौ. मी. हे क्षेत्र म्हणजेच स्थानिक नाव आचार्य दोंदे भुवन विदयार्थी न्यास, नाशिकचा प्लॉट व त्यावरील बांधीव मिळकत जप्त करून मिळविण्याचा हुकूम व्हावा'' यासाठी सदरचा अर्ज केलेला होता. सदरच्या अर्जावर मे. कोर्टाने दि. १६/४/२००९ रोजी आदेश पारित करून सदरचा अर्ज अंशत: मान्य केलेला आहे. या आदेशाप्रमाणे मे. कोर्टाने दि. ८/०५/१९९८ रोजीच्या गहाणखतामध्ये मिळकतीच्या वर्णनात नमुद केलेल्या अ,ब,क,ड मधील मिळकती म्हणजेच नाशिक, येवला, नांदगांव, चांदवड या मिळकतीबाबत जप्तीचे आदेश पारित केलेले असुन जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचे आदेश पारित केलेले आहे. सदरच्या दि. १६/०४/२००९ मधील आदेशामध्ये आचार्य दोंदे भुवन विदयार्थी न्यास, नाशिकची मिळकत जप्त करावी व त्याची विक्री करून पैसे वसूल करावे ही शिक्षण मंडळाची मागणी मे. कोर्टाने फेटाळलेली आहे. आचार्य दोंदे भुवन विदयार्थी न्यास, नाशिक ही मिळकत ट्रस्टची मिळकत असल्यामुळे सदरची मिळकत गहाण देण्यापुर्वी मा.

134

धर्मादाय आयुक्त यांची कायदेशीर लेखी परवानगी घेणे आवश्यक होती व आहे असे आदेशात नमुद केलेले आहे.

५) सदरच्या नस्तीतील दस्त अभ्यासले असता सदरचे निशाणी १३ वरील दि. १६/०४/२००९ चे आदेश आजपर्यंत अस्तित्वात आहे. त्यामुळे नाशिक महानगरपालिका शिक्षण मंडळ अथवा नाशिक महानगरपालिका हे सिटी सर्व्हे नं. ६७६२ यांसी फायनल प्लॉट नं. २१९ बाबत कुठलीही कारवाई करू शकत नाही व त्याआधारे कुठलेही रक्कम वसुल करू शकत नाही असे दिसत आहे.

६) उपस्थित असलेल्या दस्ताअन्वये असे निदर्शनात येते की, नाशिक महानगरपालिका शिक्षण मंडळाने दि. ०८/०५/१९९९ रोजीच्या गहाण खतातील चार मिळकती जाहीर लिलावाद्वारे, दवंडी पिटवून तसेच दैनिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस देऊन विक्री करण्याचे व त्यातून शिक्षण मंडळाची रक्कम वसूल करण्याचे प्रयत्न केले, परंतु यास सर्व कायदेशीर प्रक्रियांना वेगवेगळया कारणास्तव प्रतिसाद मिळालेला नाही, त्यामुळे सदरच्या मिळकतीची विक्री होऊन थकीत रक्कम वसुल होऊ शकली नाही या सर्व बाबी व घटना म.न.पाच्या सर्व संबंधित विभागांना माहित आहेत. या प्रकरणामध्ये या पुर्वी या दरखास्तीत शिक्षण विभागाच्या वतीने कामकाज चालविणारे ॲडव्होकेट व्ही.के.सानप यांचे व नाशिक महानगरपालिकेचे मुंबई येथील उच्च न्यायालयातील वकील श्री. जे. शेखर यांचाही लेखी अभिप्राय घेतलेला आहे. सदरचे दोन्ही अभिप्राय मी वाचले.

७) आपल्या कडील दि. २७/१२/२०१९ रोजीच्या पत्रात नमुद केल्या प्रमाणे प्राथमिक शिक्षण पतसंस्थेने मे. कोर्टात दि. १५/११/२०१९ रोजी अर्ज देवून रक्कम रूपये ३ कोटी घेऊन समझोता करावा व सदरची रक्कम अदा झाल्यानंतर दि. ८/५/१९९८ रोजीच्या गहाण खात्यातील सर्व मिळकती गहाणमुक्त कराव्यात अशी मागणी केलेली आहे व याबाबत माझा अभिप्राय मागितलेला आहे.

अ) माझ्या कायदेशीर अभिप्रायाप्रमाणे गहाण असलेल्या अ,ब,क,ड या मिळकती विक्री करूनही नाशिक शिक्षण मंडळाची मुद्दल रक्कम वसूल होणार नाही असे प्रथम दर्शनी वाटते.

ब) आचार्य दोंदे भुवन विदयार्थी न्यास, नाशिक ही धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदविलेली संस्था असल्यामुळे मा. धर्मादाय आयुक्त यांच्या

कायदेशीर पुर्व परवानगी शिवाय ट्रस्ट ची मिळकत गहाण ठेवता येत नाही, त्यामुळे या ट्रस्टच्या मालकीची असलेली सि.टी. एस नं. ६७६२ यासी फायनल प्लॉट नं. २१९ यांसी क्षेत्र ४८०१.०० चौ.मी या मिळकतीतुन नाशिक शिक्षण मंडळाची रक्कम मे.कोर्टाच्या आदेशाप्रमाणे वसुल होणे शक्य नाही. त्यामुळे माझ्या मताप्रमाणे मे. कोर्टाने दिलेल्या दि. ६/१०/२००५ रोजीच्या आदेशात नमुद केलेली व तोपर्यंतची व्याजा सहीतची रक्कम ४,५७,३५,०८८/– ऐवढी रक्कम अथवा यापेक्षा जास्त रक्कम संबंधित पतसंस्था देण्यास तयार असेल तर या रकमेबाबत समझोता करण्याबाबतचा विचार आपले स्तरावर करण्यात यावा व अशाच प्रकारचे अभिप्राय वर नमुद केलेल्या वकीलांचे आहेत.

क) नाशिक महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असून यातील पैसा हा जनतेचा पैसा असतो. अशाच प्रकारे यापुर्वी ही नाशिक महानगरपालिकेने त्यांच्या कडील मोठी रक्कम श्रीराम बॅक व इतर बॅकांमध्ये, वित्तीय संस्थामध्ये गुंतविल्या व या संस्था डबघाईला गेल्यामुळे नाशिक मनपाचे आजही खुप मोठयाप्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे नस्तीत नमुद केलेल्या नोंदणीकृत गहाण खतातील मिळकती विक्री करूनही ४ कोटी ५७ लाख एवढी रक्कम वसुल होणार नाही की नाही हि बाब विचारात घ्यावी. नस्तीतील लेखा परिक्षण विभागाच्या शे–या प्रमाणे सदरची वसुली रक्कम काही कोटीत असु शकते परंतु वास्तविकपणे आर्थिक व व्यावहारिकदृष्टया प्रस्तावाबाबतचा विचार करणे आवश्यक आहे.

ड) आचार्य दोंदे भुवन विदयार्थी न्यास, नाशिक या धर्मादाय संस्थेचा नोंदणीकृत क्र पी.टी.आर नं. ई–३७४ (नाशिक) असा असुन या बाबत मा. धर्मादाय आयुक्त कार्यालय, नाशिक यांच्याकडे तपास केला असता मा. सह धर्मादाय आयुक्त यांनी सदरची ट्रस्ट ची मिळकत यासी सर्व्हे नं. ६७६३ फायनल प्लॉट नं. २१९ याचे क्षेत्र ४८०१.५६ चौ.मी. हे विकसनास देण्यासाठी दि. २१/१०/२०१४ रोजी आदेश पारित केलेले आहे ही बाब प्रस्तावावर विचार करतांना विचारात घेणे गरजेचे आहे.

८) सबब, याबाबत माझा अभिप्राय असा आहे की, सदरच्या स्पेशल दरखास्त नं ३९/२००७ मध्ये समझोता करायचा असल्यास मुददल व त्यावरील काही काळाचे व्याज म्हणजेच मे. कोर्टाने दि. ६/१०/२००५ रोजी पारित केलेल्या आदेशाप्रमाणे रक्कम रूपये ४,५७,३५,०८८/– ऐवढया रक्कमेच्या खाली समझोता करणे योग्य होणार नाही, असे उपलब्ध कागदपत्रावरून दिसत असल्यामुळे वर नमुद केलेली रक्कम अथवा त्यापेक्षा जास्त रक्कम आपसात

बैठक घेऊन चर्चा करून मान्य करावी व मान्य झालेल्या रक्कमेबाबतचा समझोता हा मे. कोर्टातील स्पेशल दरखास्त नं. ३९/२००७ मध्ये करण्यात यावा, जेणेकरून सर्व कायदेशीर बाबीची पुर्तता पुर्ण होईल. मे. कोर्टात या प्रमाणे सुलेनामा दाखल झाल्यानंतर व त्याप्रमाणे ठरलेली रक्कम मिळाल्यानंतर संबंधीत गहाणखतातील मिळकती या गहाणमुक्त करण्यात याव्यात. या माझ्या अभिप्रायात नमुद केल्याप्रमाणे याबाबतचा पुढील निर्णय आपले स्तरावर घेण्यात यावा.

नाशिक
दि. २०/०१/२०२०

अॅड. समीर चिं. जोशी
(मनपा पॅनल अॅडव्होकेट)

**Sameer C. Joshi**
Advocate

# दिनकर धर्मा पाटील

**स्थायी समिती सदस्य**
नाशिक महानगरपालिका, नाशिक
राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक-२

'सर्वज्ञ', शिवाजीनगर, गंगापूर,
सातपूर, नाशिक. फोन : ०२५३-२२८१५५३.
मोबाईल : ९४२२२४९६५३, ९८२२२३१६५३.

जा.क्र.

दिनांक : 11/06/2020

प्रति,
मा.सभापती सो,
स्थायी समिती,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

विषय-: सदरच्या विषयावर आजच्या सभेत चर्चा करुन सदरची रक्कम लवकरात लवकर मनपाच्या शिक्षण विभागात खात्यात जमा होणेबाबत...

महोदय,

नाशिक महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील प्राथमिक शिक्षकांची सन १९८९ ते १९९५ या कालावधीतील भविष्य निर्वाह निधीची मुदत ठेव म्हणुन र.रु.३,९१,४९,१२८/- इतकी रक्कम प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेमध्ये गुंतविलेली होती.

परंतु तद्नंतर सदरची बँक ही डबघाईत गेल्याने शिक्षण विभागाने बँकेच्या मिळकती गहान ठेवुन घेतल्या. त्यानंतर दिवानी न्यायालयात दावा क्र.३४३/१९९९ हा दाखल केला होता. त्याचा निकाल सन २००० साली मनपा शिक्षण विभागाच्या बाजुने होऊन शिक्षण विभागास व्याजासह सदर बँकेने र.रु.४,५७,३५,०८८/- इतकी रक्कम अदा केल्याचा हुकुम केलेला होता. सदर बँक डबघाईस गेल्याने बँकेचा परवाना २५.०९.२००० रोजी रद्द झाला. त्यानंतर फाईनल डीक्री करुन बँकेच्या मिळकती जप्त करण्यांत येऊन त्यावर शिक्षण विभागाचा बोजा चढविण्यांत यावा, व जप्त केलेल्या मिळकती शिक्षण विभागातर्फे लिलावास काढण्यास मा.न्यायालयाने दि.६.१०.२००५ रोजी परवानगी दिली. सदर मिळकतींचा लिलाव करण्यात आला परंतु सदर लिलावात कोणीही प्रतिसाद दिला नाही.

बँकेने सुलानाम्याचा प्रस्ताव शिक्षण विभागास सादर केलेला असुन बँक निकालात हुकुम झालेल्या प्रमाणे र.रु.४,५७,३५,०८८/- शिक्षण विभागास देण्यास तयार आहे. तरी आजमितीस बँकेची डबघाईची परिस्थिती लक्षात घेता सदरची रक्कम मनपा शिक्षण विभागाकडे जमा करणेबाबत योग्य तो निर्णय घेणेकामीचा निर्णय घेण्यांत यावा हि विनंती.

आपला

( दिनकर धर्माजी पाटील )
सदस्य, नामनपा, नाशिक

# दिनकर धर्मा पाटील

**स्थायी समिती सदस्य**
नाशिक महानगरपालिका, नाशिक
राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक-२

'सर्वज्ञ', शिवाजीनगर, गंगापूर,
सातपूर, नाशिक. फोन : ०२५३-२२८१५५३.
मोबाईल : ९४२२२४९६५३, ९८२२२३१६५३.

जा.क्र.

दिनांक : ११/०६/२०२०

प्रति,
मा.सभापती सो,
स्थायी समिती,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

विषय-: सदरच्या विषयावर आजच्या सभेत चर्चा करुन सदरची रक्कम लवकरात लवकर मनपाच्या शिक्षण विभागात खात्यात जमा होणेबाबत...

महोदय,

नाशिक महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील प्राथमिक शिक्षकांची सन १९८९ ते १९९५ या कालावधीतील भविष्य निर्वाह निधीची मुदत ठेव म्हणुन र.रु.३,९१,४९,१२८/- इतकी रक्कम प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेमध्ये गुंतविलेली होती.

परंतु तद्नंतर सदरची बँक ही डबघाईत गेल्याने शिक्षण विभागाने बँकेच्या मिळकती गहान ठेवुन घेतल्या. त्यानंतर दिवानी न्यायालयात दावा क्र.३४३/१९९९ हा दाखल केला होता. त्याचा निकाल सन २००० साली मनपा शिक्षण विभागाच्या बाजुने होऊन शिक्षण विभागास व्याजासह सदर बँकेने र.रु.४,५७,३५,०८८/- इतकी रक्कम अदा केल्याचा हुकुम केलेला होता. सदर बँक डबघाईस गेल्याने बँकेचा परवाना २५.०९.२००० रोजी रद्द झाला. त्यानंतर फाईनल डीक्री करुन बँकेच्या मिळकती जप्त करण्यांत येऊन त्यावर शिक्षण विभागाचा बोजा चढविण्यांत यावा, व जप्त केलेल्या मिळकती शिक्षण विभागातर्फे लिलावास काढण्यास मा.न्यायालयाने दि.६.१०.२००५ रोजी परवानगी दिली. सदर मिळकतींचा लिलाव करण्यात आला परंतु सदर लिलावात कोणीही प्रतिसाद दिला नाही.

बँकेने सुलानाम्याचा प्रस्ताव शिक्षण विभागास सादर केलेला असुन बँक निकालात हुकुम झालेल्या प्रमाणे र.रु.४,५७,३५,०८८/- शिक्षण विभागास देण्यास तयार आहे. तरी आजमितीस बँकेची डबघाईची परिस्थिती लक्षात घेता सदरची रक्कम मनपा शिक्षण विभागाकडे जमा करणेबाबत योग्य तो निर्णय घेणेकामीचा निर्णय घेण्यांत यावा हि विनंती.

आपला

( दिनकर धर्माजी पाटील )
सदस्य, नामनपा, नाशिक

534 १२७


# श्री. गणेश बबनराव गिते

सभापती, स्थायी समिती : नाशिक महानगरपालिका, नाशिक
नगरसेवक : प्रभाग क्र. १

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक.
फोन : ०२५३-२५७५१२४
ई-मेल : nmcstandingcommittee@gmail.com

✲ संचालक : नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नाशिक ✲ संचालक : नाशिक मर्चंटस् को-ऑप. (नामको) बँक
✲ सदस्य : नाशिक जिल्हा नियोजन समिती

संपर्क कार्यालय : 'श्री विठ्ठल', सत्यम रो-बंगलो, कलानगर, पोकार कॉलनी, दिंडोरी रोड, म्हसरुळ,
नाशिक-४२२ ००४. मोबा. नं.: ९७६७५८२१४९, ९६३७७११९९९


जा.क्र.: प्रति,

दिनांक : ११ /०६/ २०२०

मा.आयुक्त सो,
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

शिक्षण विभाग
आयुक्त कार्यालय
नाशिक महानगरपालिका
दि. ११/०६/२०
आयुक्त

विषय-: नाशिक महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षकांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम परत मिळविणेबाबत...

संदर्भ-: मा.दिनकर धर्माजी पाटील सदस्य यांचे दि.११.०६.२०२० चे पत्र

महोदय,

नाशिक महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील प्राथमिक शिक्षकांची सन १९८९ ते १९९५ या कालावधीतील भविष्य निर्वाह निधीची मुदत ठेव म्हणुन र.रु.३,९१,४९,१२८/- इतकी रक्कम प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेमध्ये गुंतविलेली होती.

परंतु तद्नंतर सदरची बँक ही डबघाईत गेल्याने शिक्षण विभागाने बँकेच्या मिळकती गहान ठेवुन घेतल्या. त्यानंतर दिवानी न्यायालयात दावा क्र.३४३/१९९९ हा दाखल केला होता. त्याचा निकाल सन २००० साली मनपा शिक्षण विभागाच्या बाजुने होऊन शिक्षण विभागास व्याजासह सदर बँकेने र.रु.४,५७,३५,०८८/- इतकी रक्कम अदा केल्याचा हुकुम केलेला होता. सदर बँक डबघाईस गेल्याने बँकेचा परवाना २५.०९.२००० रोजी रद्द झाला.

बँकेने सुलानाम्याचा प्रस्ताव शिक्षण विभागास सादर केलेला असुन बँक निकालात हुकुम झालेल्या प्रमाणे र.रु.४,५७,३५,०८८/- शिक्षण विभागास देण्यास तयार आहे. तरी आजमितीस बँकेची डबघाईची परिस्थिती लक्षात घेता सदरची रक्कम मनपा शिक्षण विभागाकडे जमा करणेबाबतची नस्ती स्थायी समितीस सादर करणेबाबत संबंधितांना आदेश होणेस विनंती.

आपला नम्र,

( गणेश बबनराव गिते )
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**नाशिक महानगरपालिका,नाशिक.**

DDR 1965/4 138

DDR/49 Section Order

# जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नासिक यांचे समोर

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६0 चे कलम ४९ अन्वये दाखल केलेला अर्ज

जा.क्र.२८६ वि.२/ प्रा.शि. पत./
क.४९ / आदेश / २०१२-१३.
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नासिक
यांचे कार्यालय सहकार संकुल नॅशनल ऊर्दु
हायस्कुल जवळ सारडा सर्कल नाशिक.
दि.१०/५/२०१३

व्यवस्थापक
दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि. नासिक
शरणपूर रोड, टिळकवाडी, नाशिक. — अर्जदार

विरूध्द

प्रशासन अधिकारी
नासिक महानगर पालिका शिक्षण मंडळ नाशिक — प्रतिवादी
जुनी पंडीत कॉलनी, नाशिक.

DIST. DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक NASIK

अर्जदार, व्यवस्थापक दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि. नासिक यांनी प्रशासन अधिकारी नाशिक महानगर पालिका शिक्षण मंडळ यांचे विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६0 चे कल अन्वये दिनांक २५.0१.२0११ रोजी रक्कम रू.४0,५१,२५७ त्यावरील व्याज रू.१,३२,१५,७१५/- असे एकुण रू.१,७२,६६,९७३/- व त्यावरील व्याज प्रतिवादी यांचे कडुन मिळविण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

अर्जदार संस्थेने दि.२५.0१.२0११ रोजीचे अर्जान्वये निदर्शनास आणुन दिले आहे की अर्जदार संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६0 व नियम १९६१ मधिल तरतुदीनुसार नोदविलेली पतसंस्था आहे आणि नाशिक महानगर पालिका शिक्षण मंडळाचे कर्मचारी त्यांचे पतसस्थेचे सभासद असुन सदर पतसंस्थने नाशिक महानगर पालिका शिक्षण मंडळाच्या कर्मचा-यांना कर्ज दिले आहे तसेच माहे सप्टेंबर १९९७ पुर्वी पासुन प्रतिवादी यांचे कर्मचा-यांना अर्जदार कर्ज देत आले आहे आणि त्याची वसुली प्रतिवादी यांनी करून त्याचा भरणा अर्जदार पतसंस्थेकडे केलेला आहे परंतु प्रस्तुत अर्जा च्या ॲनेक्श्चर-ए मध्ये नमुद केल्याप्रमाणे माहे संप्टेबर १९९७ पासुन प्रतिवादी

शिक्षण मंडळाने त्यांच्या सेवकांकडून अर्जदार संस्थेने दिलेल्या कर्जाची वसुली केली परंतु त्यांचा भरणा मात्र प्रतिवादी यांनी अर्जदार संस्थेकडे केलेला नाही त्यामुळे अर्जदार यांनी कर्जाची एकुण रक्कम रू.४०,५१,२५८/- व त्यावरील दिडपट दराने व्याज मिळावे याचे वसुली साठी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ४९ अन्वये प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जात माहे सप्टेंबर १९९७ पासून ते डिसेंबर २०१० पावतोची शिल्लक येणे रक्कम रू.४०,५१,२५८/- व कलम ४९ अन्वये दिडपट व्याजची रक्कम रू.१,३२,१५,७१५/- असे एकुण रू.१,७२,६६,९७३/- ची मागणी केली आहे. तसेच सदरचे अर्जा सोबत प्रत्येक महिन्यांच्या मागणी रक्कमा ह्या सदर अर्जा सोबतच्या ॲनेक्श्चर-ए मध्ये नमुद केल्या आहेत. प्रतिवादी शिक्षण मंडळाने जो जबाब दिला आहे त्यात ॲनेक्श्चर-ए मध्ये नमुद केलेल्या रकमा देणे लागत नाही असे नमुद केलेले नाही. पतसंस्थेने त्यांचे व्यवस्थापक श्री. श्रीरंग नाना गिते यांचे प्रतिज्ञा पत्र दि.१९/११/२०११ रोजी दाखल केले आहे. व त्यात देखील सदर एकुण रक्कम रू.१,७२,६६,९७३/- ही प्रतिवादी यांचे कडून कशा प्रकारे येणे आहे याची सविस्तर विगतवारी नमूद केली आहे.

प्रतिवादी यांना या अर्जाची नोटीस मिळालेली असुन त्यांनी सदर अर्जात हजर होऊन त्यांचा दि. ०८.०८.२०११ रोजी जबाब दाखल केला असुन सदर जबाबामध्ये अर्जदार पतसंस्थेच्या अर्जातील कोणतीही बाब प्रतिवादी यांनी नाकारलेली नाही तसेच प्रतिवादी यांनी अर्जदार पतसंस्थेकडून प्रॉ. फंडाची मुदत ठेव म्हणून ठेवण्यात आलेली रक्कम अर्जदार संस्थेने अदा केलेली नाही आणि त्यामुळे दिवाणी दावा क्र.३९३/९९ दाखल केला व त्यात आदेश झाल्यानंतर स्पेशल दरखास्त नंबर ३९/२००७ दाखल केली व त्याची व्याजासह होणारी रक्कम येणे बाकी आहे असे नमुद केले आहे प्रतिवादी यांचा जबाब विचारात घेता त्यांना अर्जदार संस्थेला देणे असल्याचे दिसुन येते परंतू प्रतिवादी यांना अर्जदार यांचे कडून काही रकमा घेणे आहे. आणि त्यामुळे कपात केलेल्या रकमा अर्जदार पतसंस्थेस परत दिलेल्या नाही परंतु प्रतिवादी यांनी त्यांचे कर्मचा-यांचे पगारातून सदर रकमा वसूल केल्या असल्याचे निदर्शनास येते व त्याबाबत प्रतिवादी यांनी यांच्या जा.क्र.२७७ दि.०८.०८.२०११ चे जबाबात त्यांनी शिक्षकांच्या पगारातून रक्कम कपात केली आहे व सदर रक्कम

शिक्षण मंडळाने अर्जदार पतसंस्थेस दिलेली नाही असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. अर्जदार यांचा अर्ज दाखल झाल्यानंतर खाली नमूद केलेल्या तारखांना नोटीस बजावन्यात आली असुन त्याप्रमाणे कामकाज झालेले आहे.

१ दिनांक २५/०१/२०११ रोजी कलम ४९ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

२ दिनांक १८/०७/२०११ रोजी अर्जदार व प्रतिवादी यांनाअर्जाच्या सुनावणी कमी उपस्थति राहण्याच्या सुचना दिलेल्या आहे. प्रतिवादी यांनी जबाबासाठी मुदत मागीतली आहे.

३ दिनांक ०८/०८/२०११ रोजी सुनावणी तहकुब.

४ दिनांक २९/०८/२०११ अर्जदार संस्थेच्या वतीने श्री. गिते व ॲड. एस.डी.तांबत हजर प्रतिवादी यांचा जबाब दाखल सुनावणी कामकाज व युक्तीवाद झाला आहे.

५ दिनांक २७/०९/२०११ रोजीची सुनावणी तहकुब.

६ दिनांक २२/११/२०११ रोजी अर्जदार संस्थेने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे त्यांची प्रत प्रतिवादी यांना देण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

७ दिनांक २२/१२/२०११ रोजी सुनावणी पुर्ण अर्जदार हजर प्रतिवादी गैरहजर आहेत. ऊपरोक्त प्रमाणे प्राप्त अर्जावर वेळोवेळी नोटीस पाठवून अर्जदार व प्रतिवादी यांना संधी देण्यात येऊन सुनावणी देण्यात आली आहे.

अर्जासोबत दाखल झालेले ॲनेक्श्चर- बी १ ते बी ६६ पहाता असे दिसून येते की अर्जदार सहकारी संस्थेने प्रतिवादी यांचे कडून दरमहा त्यांचे कर्मचा-यांच्या पगारातून कपात करावयाची कपात चलने पाठविलेली आहेत व या चलनांप्रमाणे प्रतिवादी यांचे अधीपत्त्याखालील शिक्षकांकडून प्रतिवादी यांनी रक्कमा कपात केल्या आहेत परंतू त्या अर्जदार पतसंस्थेकडे जमा केलेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तसेच सदर बाब प्रतिवादी यांनी सुनावणी वेळी नाकारलेली नाही. तसेच सदर रक्कमा कपात केल्या बद्दल व अर्जदार यांना जमा न दिल्या बद्दल श्री. गिते व्यवस्थापक यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्रात नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ४९ प्रमाणे सदर रक्कम अर्जदार संस्थेला त्या सभासदाकडून येणे असलेली रक्कम दरमहाचे पगारातून कापून घेऊन सदर रक्कम त्याच दिवशी अर्जदार पतसंस्थेला देण्याचे कलम

DIST. DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक NASIK

४९ अन्वये बधंनकारक आहे परंतु प्रतिवादी यांनी त्यांचे कर्मचारी (जे सदर पतसंस्थेचे सभासद/कर्जदार आहेत) त्यांचे पगारातुन कपात केलेली रक्कम रू.४०,५१,२५८/- अदा केलेली नाही.

तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ४९ (२) मध्ये नमुद केले आहे की अशा करारपत्राची प्रत मिळल्यावर संस्थेने तशी लेखी मागणी केली असता आणि [जोपर्यंत संस्थेला प्रदेय म्हणून करारापत्राच्या प्रतीत दर्शविलेली एकुण रक्कम कापुन घेऊन ती संस्थेला देण्यात येत नाही तो पर्यत] मालक अशा करारपत्रानुसार रक्कम कापुन घेईल आणि अशा रीतीने कापुन घेतलेली रक्कम ही जणु ज्या दिवशी तो ती रक्कम देईल त्या दिवशी वेतन प्रदान अधिनियम १९३६ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे त्याने देणे असलेल्या वेतनाचा भाग आहे असे समजुन संस्थेकडे भरील.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमचे १९६० कलम ४९ (३) मध्ये स्पष्ट नमुद केले आहे की जर अशा कर्मचा-यांचे पगारातून कापुन घेतलेल्या रक्कमांचा संस्थेकडे भरणा केला नसेल त्या प्रकरणी अशा रक्कमा संस्थेला जमा दिनांकाला देय होत्या त्या दिनांकाला सुरू होणा-या व संस्थेला रक्कमा प्रत्यक्ष भरणा केल्याच्या दिनांक संपण्याच्या मुदतीत संस्था सदस्याला जेवढया दराने व्याज आकारते त्याचे दिडपट दराने त्यावरील व्याज देण्यास मालक व्यक्तीशः जबाबदार असेल अशी तरतुद आहे. त्यानुसार संस्थेने मुद्दल रक्कम रू.४०,५१,२५८/- व त्यावरील दिडपट व्याज रक्कम रू.१,३२,१५,७१५/- अशी एकुण रक्कम रू.१,७२,६६,९७३/- मागणी केलेली आहे.

परंतु अशी कोणतीही रक्कम प्रतिवादी यांनी अर्जदार संस्थेस दिली असल्याचे निदर्शनास आलेले नाही उलट सुणावणी वेळी प्रतिवादी अगर त्यांचे प्रतिनिधी यांनीं भरणा केल्याचा उल्लेख अगर लेखी खुलासा केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी संस्थेने मागणी केलेल्या रक्कमा सदर संस्थेचे व सभासदांचे आर्थिक हित व कायदेशिर हक्क व सहकार कायदयातील तरतुदीनुसार योग्य मागणी असल्याने सदरच्या रक्कमा देणे आवश्यक आहे.

प्रतिवादी यांनी त्यांचे जबाबात दाखल केलेला दिवानी दावा क्र.३९३/९९ व स्पेशल दरखास्त दाखल केल्याचा उल्लेख केलेला आहे. त्याचा व या अर्जात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ अन्वये मागणी रक्कमाचा संबध येत नाही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ प्रमाणे मालकाने कर्मचा-यांचे पगारातून कपात केलेल्या रक्कमा सहकारी

संस्थेस दिल्या किंवा नाही हे पाहाण्याचे व दिलेल्या नसतील तर दिडपट व्याज आकारण्याचे अधिकार निबंधक यांना आहे. आणि वर नमुद केल्या प्रमाणे प्रतिवादी यांनी त्यांचे कर्मचा-यांचे पगारातून ॲनेक्श्चर-ए मधिल रक्कमा वसुल करूनही अर्जदार पतसंस्थेस अदा केलेल्या नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सदर दाव्यात दाखल झालेली कागदपत्रे अर्जदार संस्थेचे व्यवस्थापक श्री. गिते यांचे प्रतिज्ञापत्र प्रतिवादी यांचे जबाब व झालेली सुनावणी या सर्व बाबी लक्षात घेता मी या निष्कर्षा प्रत पाहोचलो आहे की प्रतिवादी यांनी अर्जदार संस्थेच्या सभासद असलेल्या कर्मचा-यांचे पगारातून वसुल केलेली एकुण रक्कम रू.४0,५१,२५८/- व त्यावर दिडपट दराने व्याज प्रतिवादी यांनी अर्जदार संस्थेस अदा करणे कामी मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

DIST. DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक NASIK

## -ः: आदेश ः:-

मी बाजीराव शिंदे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नासिक, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६0 चे कलम ४९ अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार आदेश देतो की प्रसाशन अधिकारी नाशिक महानगर पालिका शिक्षण मंडळ, नाशिक यांनी दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि. नासिक या पतसंस्थेस प्रतिवादी यांनी कर्मचा-यांचे पगारातून दरमहा वसुल केलेली रक्कम रू.४0,५१,२५८/- व त्यावर दिडपट दराने व्याजाची रक्कम रू.१,३२,१५,७१५/- असे एकूण रूपये १,७२,६६,९७३/- एक महिन्याचे आत अदा करावे. तसेच सदर रू.४0,५१,२५८/- वर दि.0१/0१/२0११ ते संपुर्ण रक्कम परतफेड होई पावेतो दिडपट व्याज दराने व्याज प्रतिवादी यांनी अर्जदार पतसंस्थेस अदा करावे.

त्याच प्रमाणे अर्जदार यांनी प्रतिवादी यांचेकडून वर नमुद केलेली रक्कम रू.१,७२,६६,९७३/- व रक्कम वसुल होई पावेतोची दिडपट दराने होणारे व्याज यांची वसुली महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ मधिल तरतुदीस अनुसरून जमिन महसुलाची बाकी म्हणून वसुल करण्याचे रिती प्रमाणे ती प्रतिवादी यांचे कडून वसुल करावी अथवा अर्जदार यांनी या आदेशाची बजावणी त्यांचे कडील ज्या अधिका-यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६0 चे कलम १५६ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम

१०७ अन्वये अधिकार प्राप्त झाले आहे त्यांचे मार्फत वसुली दाखल्याची अमंलबजावणी करून वसुल करण्यात यावी आणि यासाठी स्वतंत्र अर्ज या कार्यालयाकडे करण्याची जरूरी नाही. हा आदेश व वसुली दाखला आज दिनांक १०/५/२०१३ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिला आहे.

दिनांक : १०/५/२०१३
स्थळ : नासिक.

DIST DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक NASIK

जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, नाशिक.

प्रत महितीसाठी रवाना
मा. आयुक्त,
नाशिक महानगर पालिका,
नाशिक.

अ.क.      /२०११

**नाशिक येथील मे.जिल्हा उपनिबंधक साहेब,सहकारी संस्था,नाशिक यांचे कोर्टात**

मॅनेजर

दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या.नाशिक      अर्जदार

विरुध्द

प्रशासन अधिकारी,

नाशिक महानगरपालिका शिक्षण मंडळ, नाशिक      सामनेवाले

याकामी सामनेवाले यांचेतर्फे जबाब व लेखी युक्तीवाद देणेत येतो तो येणेप्रमाणे:-

१) अर्जदार यांनी आपले कोर्टात दाखल केलेला अर्ज एकदम चूकीचा बेकायदेशीर असा असुन अर्जदार यांना सदरचा अर्ज दाखल करण्याचा काहीएक हक्क व अधिकार नाही.

२) अर्जदार ही पतसंस्था होण्यापूर्वी बँक होती. परंतू अर्जदार हिच्या अनागोंदी कारभारामुळे अर्जदार बँकेचे लायसन्स रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने रद्द केले. त्यानंतर महतप्रयासाने अर्जदारास पतसंस्थेचा दर्जा मिळाला त्यावेळी अर्जदार बँक होती. त्यावेळी सामनेवाले यांनी सन १९८९, १९९,१९९४,१९९५ या साली अर्जदार त्यावेळी बँक असतांना सामनेवाले यांनी त्यांचेकडे एकूण २६ फिक्स डिपॉझिटच्या रकमा रक्कम रुपये ३,९१,४९,१२८/- ठेवलेल्या होत्या. अर्जदाराचे अनागोंदी कारभारामुळे सामनेवाले यांना त्यांच्या फिक्स डिपॉझिटच्या रकमा अर्जदार हे मुदत संपल्यानंतरही परत करु शकले नाहीत. त्यामुळे अर्जदार यांना सामनेवाले यांनी दि.१९/४/१९९९ रोजी ॲड.एस.जी. सोनवणे, नाशिक यांचेमार्फत नोटीस पाठवून सामनेवाले यांच्या फिक्स डिपॉझिटची रक्कम परत मिळणेबाबत नोटीस पाठविली होती. त्याही अगोदर सामनेवाले यांनी अर्जदार यांचेकडे वेळोवेळी फिक्स डिपॉझिटचे रकमांची तोंडी व लेखी मागणी केलेली आहे. परंतू अर्जदार यांची फिक्स डिपॉझिटची रक्कम रुपये ३,९१,४९,१२८/- ही रक्कम देणेची परिस्थिती नव्हती. त्यामुळे सामनेवाले यांनी दि.१९/४/१९९९ रोजी ॲड.एस.जी. सोनवणे यांचेमार्फत पाठविलेल्या नोटीसीमध्ये पान नं.५ वर स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे की,"<u>प्राथमिक शिक्षक बँकेकडे दि.२८/२/१९९८ रोजी येणे असलेली रक्कम</u>

रुपये ३,९१,४९,१२८/- यावर दि.३१/३/१९९९ अखरे द.सा.द.शे.१५ टक्के प्रमाणे व्याज रक्कम रुपये ६३,६१,७३३/- अशी एकूण रक्कम रुपये ४,५५,१०,८६१/-अशी सदर बँकेकडे येणे आहे. त्यापैकी शिक्षकाच्या पगारातून कपातीमुळे जमा झालेली रक्कम रु.२४,६६,०७२/- वजा जाता प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेकडे रक्कम रुपये ४,३०,४४,७८९/- येणे बाकी आहे.'' अशा प्रकारची नोटीस अर्जदार यांना सामनेवाले यांनी दि.१९/४/१९९९ रोजी वकीलामार्फत दिलेली होती व सामनेवाले यांची फिक्स डिपॉझिटची रक्कम दिली नाही. म्हणजेच अर्जदार जी रक्कम या अर्जाद्वारे मागणी करीत आहे त्या कपातीच्या रकमांची वळती सामनेवाले यांनी सन १९९९ रोजीच केलेली असलेमुळे सामनेवाले यांचेकडे कुठलीही कपातीची रक्कमच अर्जदार संस्थेची शिल्लक नसलेमुळे मुळातच सदरचा अर्ज दाखल करणेचा अधिकार अर्जदार यांना नाही.

३) सदरचे नोटीसीनंतरही अर्जदार यांनी सामनेवाले यांच्या रकमा नोटीसीनंतर २ महिन्याच्या मुदतीनंतरही दिल्या नाही. त्यामुळे सामनेवाले यांनी अर्जदार यांचेविरुध्द सदरच्या फिक्स डिपॉझिटच्या रकमा परत मिळणेकामी दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर, नाशिक यांचे कोर्टात स्पे.मु.नं.३४३/१९९९ दाखल केला होता. सदरचे दाव्यातील कलम ५ मध्येही स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे की, पगाराचे कपातीतून जमा झालेली रक्कम रुपये २४,६६,०७२/- ही फिक्स डिपॉझिटचे रकमेपोटी वळती करुन घेतलेली आहे. सदरची रक्कम वजा करुन राहीलेल्या रकमेचा दावा सामनेवाले यांनी मे.कोर्टात रक्कम वसुलीकरीता दाखल केला. स्पे.मु.नं.३४३/९९ या दाव्यात अर्जदार हे हजर झालेले होते. तसेच सदरचे दाव्याकामी कायदेशीर बाजू मांडणेकामी अर्जदार यांनी ॲड. आर.पी.पगार यांचीही नियुक्ती केली होती. त्यावेळी अर्जदार यांनी पगाराची रक्कम वळती केली याबाबत कुठलीही हरकत घेतली नाही. त्यानंतर स्पे.मु.नं.३४३/९९ या दाव्याचा गुणवत्तेवर निकाल मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर नाशिक यांनी दिनांक ३०/८/२००० रोजी दिला व सामनेवाले यांची पगाराचे कपातीतून वजा जाता शिल्लक राहीलेली रक्कम रु.४,५७,३५,०८८/- इतकी रक्कम व दिनांक ०१/०८/१९९९ पासून १५ टक्के प्रमाणे व्याज असा हुकुम केला. म्हणजेच दिवाणी दाव्यातही पगारातून कपात केलेली रक्कम रु.२४,६६,०७२/- ही वळती केलेली आहे याची पूर्णपणे माहिती

153



असुनही व दिवाणी दाव्यात तसेच सामनेवाले यांनी दिनांक १९/४/१९९९ रोजी पाठविलेल्या नोटीसीमध्ये पगार कपातीची रक्कम वळती केल्याची माहिती असतांनाही तब्बल १७ वर्षांनी अर्जदाराला जाग आली व पगार कपातीतून वजा केलेली रक्कम परत मिळणेबाबत सदरचा बेकायदेशीर अर्ज मे.कोर्टापुढे दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज हा मुळातच कायदेशीर नसल्यामुळे व अर्जदार यांनी सत्य परिस्थिती लपवून ठेवल्यामुळे रद्द होणेस पात्र आहे. तसेच अर्जदार हे मे.कोर्टापुढे खोटया आशयाचे व बेकायदेशीर अर्ज व प्रतिज्ञापत्र दाखल करुन मे.कोर्टाची दिशाभूल करत आहेत व ठेवीदाराच्या ठेवींची रक्कम देण्यास जाणून बुजून टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे अर्जदार संस्थेवर संचालकांचा अंकुश नाही हे सिध्द होते. त्यामुळे अर्जदार संस्थेवर खरे तर सभासदांना न्याय मिळणेसाठी व हक्काची रक्कम परत मिळणेसाठी सरकारी अधिकारी (प्रशासक) यांची नियुक्ती होणे आवश्यक व गरजेचे आहे.

४) सामनेवाले यांनी अर्जदार यांचेवर दाखल केलेला स्पे.मु.नं.३४३/९९ याची मे.दिवाणी न्यायाधिश साहेब,वरिष्ठ स्तर यांनी दिनांक ३०/८/२००० रोजी हुकुम करुनही अर्जदार यांनी सामनेवाले यांची रक्कम रुपये ४,५७,३५,०८८/- व दिनांक १/८/१९९९ पासून सदर रकमेवर १५ टक्के प्रमाणे व्याज दिले नाही. त्यामुळे सामनेवाले यांनी अर्जदार यांचेविरुध्द दाव्यातील हुकुमाप्रमाणे रक्कम वसुल करुन मिळणेकामी दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात स्पे.दरखास्त नं. ३९/२००७ दाखल केलेली आहे. अर्जदार यांनी दिनांक ३०/८/२००० रोजी मे. दिवाणी न्यायालयाने हुकुम केल्यानंतरही आजपर्यंत सामनेवाले यांना काहीएक रक्कम दिलेली नाही. म्हणजेच अर्जदार हे दिवाणी कोर्टाचे हुकुमालाही जुमानत नाही. त्यामुळे आज ऑक्टोबर २०१६ अखेर दिवाणी कोर्टाचे हुकुमाप्रमाणे सामनेवाले यांची अर्जदाराकडे रक्कम रु.१६,३५,०२,९३९/- इतकी रक्कम निघते. सदरची रक्कम कायदेशीरपणे व कोर्टाने दिलेल्या हुकुमाप्रमाणे निघत असतांनाही अर्जदाराची सदरची रक्कम देणेची दानत नाही. याशिवाय खोटे अर्ज मे.कोर्टापुढे सादर करुन बेकादेशीर मागणी करीत आहेत व कोर्टाचा वेळी वाया घालवत आहेत. खरेतर अशा संस्थेविरुध्द मे. कोर्टाने कायदेशीर कारवाई करणे अपेक्षीत आहे व तशी कारवाई अर्जदार संस्थेवर करणेत यावी.

५) मुळातच अर्जदार संस्थेने दिलेला अर्ज व दिलेले प्रतिज्ञापत्र हे चूकीचे आहे. पगारातून कपात केलेली रक्कम दिवाणी दावा करतांना वळती केलेली आहे याची संपूर्ण माहिती अर्जदार संस्थेला आहे. अर्जदार संस्थेचे मॅनेजर यांना सदर अर्जात मागणी केलेली रक्कम ही स्पे.मु.नं.३४३/९९ मध्ये वळती केलेली आहे याची माहिती असुनही सदरचा खोटा व बेकायदेशीर अर्ज २ वेळा मे.कोर्टात दाखल केला. पहिल्या वेळी सामनेवाले यांनी सदरचे अर्जात सविस्तर जबाब दाखल केलेला नव्हता. त्यामुळे पूर्वीचे कोर्टाने दिनांक १०/५/२०१३ रोजी हुकुम केलेला होता. त्यावर सामनेवाले यांनी विभागीय सहनिबंधक साहेब, सहकारी संस्था, नाशिक विभाग नाशिक यांचेकडे रिव्हीजन अर्ज नं. ११४/२०१३ दाखल केला. मा.विभागीय सहनिबंधक साहेब, सहकारी संस्था, नाशिक यांनी सामनेवाले यांचा अर्ज मंजुर करुन दिनांक १०/५/२०१३ रोजीचा हुकुम रद्द ठरविलेला आहे व नव्याने सदरचे अर्जाची चौकशी करणेबाबत आदेश पारीत केलेले आहे. त्यानुसार सदरचे अर्जास सामनेवाले हे जबाब व लेखी युक्तीवाद सादर करीत आहेत.

६) **<u>सबब मे.कोर्टास विनंती की</u>**,

वरील सर्व कारणांचा विचार होऊन अर्जदार यांचा अर्ज वरील सर्व कारणांचा विचार होऊन अर्जदार यांचा अर्ज बेकायदेशीर, खोटा असलेमुळे रद्द करणेत यावा. तसेच मे.कोर्टाला खोटी माहिती व प्रतिज्ञापत्र सादर केल्याबाब्रत अर्जदार संस्थेवर व त्यांचे अधिकारी पदाधिकारी यांचेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० प्रमाणे कारवाई करणेत यावी व सदरचे अर्जासाठी सामनेवाले यांना विनाकारण मे.कोर्टात यावे लागले. तसेच वकील देणे, इतर खर्च करणेस भाग पाडले. त्यामुळे अर्जदार यांचेकडून सामनेवाले यांना कॉम्पेन्सेटरी कॉस्ट म्हणून रक्कम रुपये १,००,०००/- देणेचा आदेश व्हावा ही विनंती.

हा जबाब व लेखी युक्तीवाद.

नाशिक दि.२७/१०/२०१६

नाशिक महानगरपालिका शिक्षण मंडळ, नाशिक
तर्फे अधिकृत प्रतिनिधी

व्ही.के.सानप
ॲडव्होकेट सामनेवालेकरीता

# जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नासिक यांचे समोर

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ अन्वये दाखल केलेला अर्ज

जा.क्र.९८७६ वि.२/ प्रा.शि. पत./
क.४९ / आदेश / २०१२-१३.
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नासिक
यांचे कार्यालय सहकार संकुल नॅशनल ऊर्दु
हायस्कुल जवळ सारडा सर्कल नाशिक.
दि. १० /५/२०१३

व्यवस्थापक
दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि. नासिक
शरणपूर रोड, टिळकवाडी, नाशिक. अर्जदार

विरूध्द

प्रशासन अधिकारी
नासिक महानगर पालिका शिक्षण मंडळ नाशिक प्रतिवादी
जुनी पंडीत कॉलनी, नाशिक.

DIST. DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES NASIK जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक

अर्जदार, व्यवस्थापक दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि. नासिक यांनी प्रशासन अधिकारी नाशिक महानगर पालिका शिक्षण मंडळ नाशिक यांचे विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ अन्वये दिनांक २५.0१.२0११ रोजी रक्कम रू.४0,५१,२५८/- व त्यावरील व्याज रू.१,३२,१५,७१५/- असे एकुण रू.१,७२,६६,९७३/- व त्यावरील व्याज प्रतिवादी यांचे कडुन मिळविण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

अर्जदार संस्थेने दि.२५.0१.२0११ रोजीचे अर्जान्वये निदर्शनास आणुन दिले आहे की अर्जदार संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६0 व नियम १९६१ मधिल तरतुदीनुसार नोदविलेली पतसंस्था आहे आणि नाशिक महानगर पालिका शिक्षण मंडळाचे कर्मचारी त्यांचे पतसस्थेचे सभासद असुन सदर पतसंस्थने नाशिक महानगर पालिका शिक्षण मंडळाच्या कर्मचा-यांना कर्ज दिले आहे तसेच माहे सप्टेबंर १९९७ पुर्वी पासुन प्रतिवादी यांचे कर्मचा-यांना अर्जदार कर्ज देत आले आहे आणि त्याची वसुली प्रतिवादी यांनी करून त्याचा भरणा अर्जदार पतसंस्थेकडे केलेला आहे परंतु प्रस्तुत अर्जा च्या ॲनेक्श्चर-ए मध्ये नमुद केल्याप्रमाणे माहे संप्टेबर १९९७ पासुन प्रतिवादी

शिक्षण मंडळाने त्यांच्या सेवकांकडून अर्जदार संस्थेने दिलेल्या कर्जाची वसुली केली परंतु त्यांचा भरणा मात्र प्रतिवादी यांनी अर्जदार संस्थेकडे केलेला नाही त्यामुळे अर्जदार यांनी कर्जाची एकुण रक्कम रू.४०,५१,२५८/- व त्यावरील दिडपट दराने व्याज मिळावे याचे वसुली साठी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ४९ अन्वये प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जात माहे सप्टेंबर १९९७ पासून ते डिसेंबर २०१० पावतोची शिल्लक येणे रक्कम रू.४०,५१,२५८/- व कलम ४९ अन्वये दिडपट व्याजची रक्कम रू.१,३२,१५,७१५/- असे एकुण रू.१,७२,६६,९७३/- ची मागणी केली आहे. तसेच सदरचे अर्जा सोबत प्रत्येक महिन्यांच्या मागणी रक्कमा ह्या सदर अर्जा सोबतच्या ॲनेक्श्चर-ए मध्ये नमुद केल्या आहेत. प्रतिवादी शिक्षण मंडळाने जो जबाब दिला आहे त्यात ॲनेक्श्चर-ए मध्ये नमुद केलेल्या रकमा देणे लागत नाही असे नमुद केलेले नाही. पतसंस्थेने त्यांचे व्यवस्थापक श्री. श्रीरंग नाना गिते यांचे प्रतिज्ञा पत्र दि.१९/११/२०११ रोजी दाखल केले आहे. व त्यात देखील सदर एकुण रक्कम रू.१,७२,६६,९७३/- ही प्रतिवादी यांचे कडून कशा प्रकारे येणे आहे याची सविस्तर विगतवारी नमूद केली आहे.

प्रतिवादी यांना या अर्जाची नोटीस मिळालेली असुन त्यांनी सदर अर्जात हजर होऊन त्यांचा दि. ०८.०८.२०११ रोजी जबाब दाखल केला असुन सदर जबाबामध्ये अर्जदार पतसंस्थेच्या अर्जातील कोणतीही बाब प्रतिवादी यांनी नाकारलेली नाही तसेच प्रतिवादी यांनी अर्जदार पतसंस्थेकडून प्रॉ. फंडाची मुदत ठेव म्हणून ठेवण्यात आलेली रक्कम अर्जदार संस्थेने अदा केलेली नाही आणि त्यामुळे दिवाणी दावा क्र.३९३/९९ दाखल केला व त्यात आदेश झाल्यानंतर स्पेशल दरखास्त नंबर ३९/२००७ दाखल केली व त्याची व्याजासह होणारी रक्कम येणे बाकी आहे असे नमुद केले आहे प्रतिवादी यांचा जबाब विचारात घेता त्यांना अर्जदार संस्थेला देणे असल्याचे दिसुन येते परंतू प्रतिवादी यांना अर्जदार यांचे कडून काही रकमा घेणे आहे. आणि त्यामुळे कपात केलेल्या रकमा अर्जदार पतसंस्थेस परत दिलेल्या नाही परंतु प्रतिवादी यांनी त्यांचे कर्मचाऱ्यांचे पगारातून सदर रकमा वसूल केल्या असल्याचे निदर्शनास येते व त्याबाबत प्रतिवादी यांनी यांच्या जा.क्र.२७७ दि.०८.०८.२०११ चे जबाबात त्यांनी शिक्षकांच्या पगारातून रक्कम कपात केली आहे व सदर रक्कम

शिक्षण मंडळाने अर्जदार पतसंस्थेस दिलेली नाही असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. अर्जदार यांचा अर्ज दाखल झाल्यानंतर खाली नमूद केलेल्या तारखांना नोटीस बजावन्यात आली असुन त्याप्रमाणे कामकाज झालेले आहे.

१ दिनांक २५/०१/२०११ रोजी कलम ४९ अन्वये अर्ज दाखल केला आहे.
२ दिनांक १८/०७/२०११ रोजी अर्जदार व प्रतिवादी यांनाअर्जाच्या सुनावणी कमी उपस्थति राहण्याच्या सुचना दिलेल्या आहे. प्रतिवादी यांनी जबाबासाठी मुदत मागीतली आहे.
३ दिनांक ०८/०८/२०११ रोजी सुनावणी तहकुब.
४ दिनांक २९/०८/२०११ अर्जदार संस्थेच्या वतीने श्री. गिते व ॲड. एस.डी.तांबत हजर प्रतिवादी यांचा जबाब दाखल सुनावणी कामकाज व युक्तीवाद झाला आहे.
५ दिनांक २७/०९/२०११ रोजीची सुनावणी तहकुब.
६ दिनांक २२/११/२०११ रोजी अर्जदार संस्थेने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे त्यांची प्रत प्रतिवादी यांना देण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.
७ दिनांक २२/१२/२०११ रोजी सुनावणी पुर्ण अर्जदार हजर प्रतिवादी गैरहजर आहेत. ऊपरोक्त प्रमाणे प्राप्त अर्जावर वेळोवेळी नोटीस पाठवून अर्जदार व प्रतिवादी यांना संधी देण्यात येऊन सुनावणी देण्यात आली आहे.

अर्जासोबत दाखल झालेले ॲनेक्श्चर- बी १ ते बी ६६ पहाता असे दिसून येते की अर्जदार सहकारी संस्थेने प्रतिवादी यांचे कडून दरमहा त्यांचे कर्मचा-यांच्या पगारातून कपात करावयाची कपात चलने पाठविलेली आहेत व या चलनांप्रमाणे प्रतिवादी यांचे अधीपत्त्याखालील शिक्षकांकडून प्रतिवादी यांनी रक्कमा कपात केल्या आहेत परंतू त्या अर्जदार पतसंस्थेकडे जमा केलेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तसेच सदर बाब प्रतिवादी यांनी सुनावणी वेळी नाकारलेली नाही. तसेच सदर रक्कमा कपात केल्या बद्दल व अर्जदार यांना जमा न दिल्या बद्दल श्री. गिते व्यवस्थापक यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्रात नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ४९ प्रमाणे सदर रक्कम अर्जदार संस्थेला त्या सभासदाकडून येणे असलेली रक्कम दरमहाचे पगारातून कापून घेऊन सदर रक्कम त्याच दिवशी अर्जदार पतसंस्थेला देण्याचे कलम

४९ अन्वये बधंनकारक आहे परंतु प्रतिवादी यांनी त्यांचे कर्मचारी (जे सदर पतसंस्थेचे सभासद/कर्जदार आहेत) त्यांचे पगारातुन कपात केलेली रक्कम रू.४0,५१,२५८/- अदा केलेली नाही.

तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६0चे कलम ४९ (२) मध्ये नमुद केले आहे की अशा करारपत्राची प्रत मिळल्यावर संस्थेने तशी लेखी मागणी केली असता आणि [जोपर्यंत संस्थेला प्रदेय म्हणून करारापत्राच्या प्रतीत दर्शविलेली एकुण रक्कम कापुन घेऊन ती संस्थेला देण्यात येत नाही तो पर्यंत] मालक अशा करारपत्रानुसार रक्कम कापुन घेईल आणि अशा रीतीने कापुन घेतलेली रक्कम ही जणु ज्या दिवशी तो ती रक्कम देईल त्या दिवशी वेतन प्रदान अधिनियम १९३६ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे त्याने देणे असलेल्या वेतनाचा भाग आहे असे समजुन संस्थेकडे भरील.

DIST. DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था
नाशिक
NASIK

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमचे १९६0 कलम ४९ (३) मध्ये स्पष्ट नमुद केले आहे की जर अशा कर्मचा-यांचे पगारातून कापुन घेतलेल्या रक्कमांचा संस्थेकडे भरणा केला नसेल त्या प्रकरणी अशा रक्कमा संस्थेला जमा दिनांकाला देय होत्या त्या दिनांकाला सुरू होणा-या व संस्थेला रक्कमा प्रत्यक्ष भरणा केल्याच्या दिनांक संपण्याच्या मुदतीत संस्था सदस्याला जेवढया दराने व्याज आकारते त्याचे दिडपट दराने त्यावरील व्याज देण्यास मालक व्यक्तीशः जबाबदार असेल अशी तरतुद आहे. त्यानुसार संस्थेने मुद्दल रक्कम रू.४0,५१,२५८/- व त्यावरील दिडपट व्याज रक्कम रू.१,३२,१५,७१५/- अशी एकुण रक्कम रू.१,७२,६६,९७३/- मागणी केलेली आहे.

परंतु अशी कोणतीही रक्कम प्रतिवादी यांनी अर्जदार संस्थेस दिली असल्याचे निदर्शनास आलेले नाही उलट सुणावणी वेळी प्रतिवादी अगर त्यांचे प्रतिनिधी यांनी भरणा केल्याचा उल्लेख अगर लेखी खुलासा केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी संस्थेने मागणी केलेल्या रक्कमा सदर संस्थेचे व सभासदांचे आर्थिक हित व कायदेशिर हक्क व सहकार कायदयातील तरतुदीनुसार योग्य मागणी असल्याने सदरच्या रक्कमा देणे आवश्यक आहे.

प्रतिवादी यांनी त्यांचे जबाबात दाखल केलेला दिवानी दावा क्र.३९३/९९ व स्पेशल दरखास्त दाखल केल्याचा उल्लेख केलेला आहे. त्याचा व या अर्जात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६0 चे कलम ४९ अन्वये मागणी रक्कमाचा संबध येत नाही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६0 चे कलम ४९ प्रमाणे मालकाने कर्मचा-यांचे पगारातून कपात केलेल्या रक्कमा सहकारी

संस्थेस दिल्या किंवा नाही हे पाहाण्याचे व दिलेल्या नसतील तर दिडपट व्याज आकारण्याचे अधिकार निबंधक यांना आहे. आणि वर नमुद केल्या प्रमाणे प्रतिवादी यांनी त्यांचे कर्मचा-यांचे पगारातून ॲनेक्श्चर-ए मधिल रक्कमा वसुल करूनही अर्जदार पतसंस्थेस अदा केलेल्या नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सदर दाव्यात दाखल झालेली कागदपत्रे अर्जदार संस्थेचे व्यवस्थापक श्री. गिते यांचे प्रतिज्ञापत्र प्रतिवादी यांचे जबाब व झालेली सुनावणी या सर्व बाबी लक्षात घेता मी या निष्कर्षा प्रत पाहोचलो आहे की प्रतिवादी यांनी अर्जदार संस्थेच्या सभासद असलेल्या कर्मचा-यांचे पगारातून वसुल केलेली एकुण रक्कम रू.४०,५१,२५८/- व त्यावर दिडपट दराने व्याज प्रतिवादी यांनी अर्जदार संस्थेस अदा करणे कामी मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## -ះ आदेश ះ-

मी बाजीराव शिंदे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नासिक, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६0 चे कलम ४९ अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार आदेश देतो की प्रसाशन अधिकारी नाशिक महानगर पालिका शिक्षण मंडळ, नाशिक यांनी दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि. नासिक या पतसंस्थेस प्रतिवादी यांनी कर्मचा-यांचे पगारातून दरमहा वसुल केलेली रक्कम रू.४0,५१,२५८/- व त्यावर दिडपट दराने व्याजाची रक्कम रू.१,३२,१५,७१५/- असे एकूण रूपये १,७२,६६,९७३/- एक महिन्याचे आत अदा करावे. तसेच सदर रू.४0,५१,२५८/- वर दि.0१/0१/२0११ ते संपुर्ण रक्कम परतफेड होई पावेतो दिडपट व्याज दराने व्याज प्रतिवादी यांनी अर्जदार पतसंस्थेस अदा करावे.

त्याच प्रमाणे अर्जदार यांनी प्रतिवादी यांचेकडून वर नमुद केलेली रक्कम रू.१,७२,६६,९७३/- व रक्कम वसुल होई पावेतोची दिडपट दराने होणारे व्याज यांची वसुली महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ मधिल तरतुदीस अनुसरून जमिन महसुलाची बाकी म्हणून वसुल करण्याचे रिती प्रमाणे ती प्रतिवादी यांचे कडून वसुल करावी अथवा अर्जदार यांनी या आदेशाची बजावणी त्यांचे कडील ज्या अधिका-यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६0 चे कलम १५६ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम

१०७ अन्वये अधिकार प्राप्त झाले आहे त्यांचे मार्फत वसुली दाखल्याची अमंलबजावणी करून वसुल करण्यात यावी आणि यासाठी स्वतंत्र अर्ज या कार्यालयाकडे करण्याची जरूरी नाही. हा आदेश व वसुली दाखला आज दिनांक १०/५/२०१३ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिला आहे.

दिनांक : १० /५/२०१३
स्थळ : नासिक.

जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, नाशिक.

प्रत महितीसाठी रवाना
मा. आयुक्त,
नाशिक महानगर पालिका,
नाशिक.

170

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ अन्वये नोटीस

718 जा.क्र. वि.४/दिप्राशिसहपत/कलम ४९/आदेश/सन २०१७
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,नाशिक यांचे कार्यालय
सहकार संकुल सारडा सर्कल,नॅशनल ऊर्दु हायस्कुलजवळ
नाशिक. दिनांक ०८/०२/२०१७

वाचावेः- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९
२) व्यवस्थापक, दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि.नाशिक यांचेकडील दिनांक २४/०१/२०११ रोजीचा दावा.
३) या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.१८७६/वि.२/प्रा.शि.पत./क.४९/आदेश/२०१३ दिनांक १०/५/२०१३
४) मा.विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,नाशिक विभाग नाशिक यांचे कार्यालयाकडील आदेश जा.क्र.RGN-II/R.A.No.R-114 OF 2013 OF 2016/3123, दिनांक १९/५/२०१६.
५) या कार्यालयाकडील नोटीस जा.क्र.वि-४/दिप्राशिसहपत/वे.कपात/क.४९/२०१६, दिनांक २८/६/२०१६

DIST. DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक NASIK

दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि.नाशिक (यापुढे प्रस्तुत संस्था संबोधण्यात येईल) ही, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ (यापुढे अधिनियम व नियम असे संबोधण्यात येईल) मधील तरतुदीनुसार नोंदविण्यात आलेली सहकारी पतसंस्था असुन शासनाचे आदेश, परिपत्रके, कायद्यातील तरतुदी व आदर्श उपविधीचे पालन करणे संस्थेस बंधनकारक आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ नुसार शिक्षक सभासदांचे मालक म्हणुन प्रतिवादी संस्थेने वेळोवेळी मागणीपत्र पाठविल्यानंतर उक्त नमुद शिक्षक सेवकांचे पगारातुन कर्ज व तद्नुषंगिक सर्व रक्कमांची कपात करुन देणे आपणांवर बंधनकारक आहे.आणि.,

वाचावे क्रमांक २ अन्वये व्यवस्थापक, दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि.नाशिक यांनी या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ अन्वये दावा दाखल केलेला होता.त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणीचे कामकाज होऊन वाचाचे क्र.३ अन्वये या कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ अन्वये आदेश पारीत केलेला होता. सदर आदेशाविरुध्द प्रशासन अधिकारी,

नाशिक महानगर पालिका शिक्षण मंडळ नाशिक यांनी मा.विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था, नाशिक विभाग नाशिक यांचे कार्यालयाकडे कलम १५४ अन्वये अपील दाखल केलेले होते.सदर अपीलाचे कामकाज होऊन दिनांक १९/५/२०१६ रोजी मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,नाशिक विभाग नाशिक यांनी आदेश पारीत केलेला आहे.सदर आदेशात प्रशासन अधिकारी, नाशिक महानगर पालिका शिक्षण मंडळ नाशिक यांचे अपील अंशतः मान्य केलेले असून सदर प्रकरणी पुन्हा नव्याने सुनावणी घेऊन नवीन आदेश पारीत करणेबाबत आदेशित केलेले आहे.

२/-

महानगरपालिका शिक्षण मंडळ नाशिक
शासकीय/शालेय
- 1 MAR 2017
आवक क्र. 229८ 9/3/170
क्र.स. व.स. का.अधि. प्र.शा.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ अन्वये कार्यवाही करणेपुर्वी नैसर्गिक न्यायतत्तवाने त्यांना वाचावे क्र.५ चे नोटीसीन्वये त्यांना त्यांचे म्हणणे मांडणेसाठी सुनावणी देण्यात आली.सदर नोटीसीच्या अनुषंगाने या कार्यालयात दि.१८/७/२०१६, दि.२५/७/२०१६, दि.८/८/२०१६, दि.२२/८/२०१६, दि.१९/९/२०१६ व दि.२५/१०/२०१६ रोजी सुनावणी ठेवण्यांत आली. सदर सुनावणीस अर्जदार संस्थेच्या वतीने श्री गिते व प्रतिवादी हे उपस्थित होते.

**अर्जदार यांनी सुनावणीच्या वेळी त्यांचे लेखी म्हणणे व तोंडी युक्तीवाद पुढील प्रमाणे केला.**

अर्जदार संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार नोंदविलेली पतसंस्था आहे. आणि नाशिक महानगर पालिका शिक्षण मंडळाचे कर्मचारी त्यांचे पतसंस्थेचे सभासद असुन सदर पतसंस्थेने नाशिक महानगर पालिका शिक्षण मंडळाच्या कर्मचा-यांना अर्जदार कर्ज दिले आहे. तसेच माहे सप्टेंबर १९९७ पुर्वी पासुन प्रतिवादी यांचे कर्मचा-यांना अर्जदार कर्ज देत आहे आणि त्याची वसुली प्रतिवादी त्यांनी करुन त्याचा भरणा अर्जदार पतसंस्थेकडे केलेला आहे. परंतु प्रस्तुत अर्जाच्या ॲनेक्श्चर - ए मध्ये नमुद केल्याप्रमाणे माहे सप्टेंबर १९९७ पासुन प्रतिवादी शिक्षण मंडळाने त्यांच्या सेवकांकडुन अर्जदार संस्थेने दिलेल्या कर्जाची वसुली केली परंतु त्यांचा भरणा मात्र प्रतिवादी यांनी अर्जदार संस्थेकडे केलेला नाही. त्यामुळे अर्जदार यांनी कर्जाची रक्कम रु.४०,५१,२५८/- व त्यावरील दिडपट दराने व्याज मिळावे याचे वसुली साठी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ४९ अन्वये प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जात माहे सप्टेंबर १९९७ पासुन ते डिसेंबर २०१० पावतोची शिल्लक येणे रक्कम रु ४०,५१,२५८/- व कलम ४९ अन्वये दिडपट व्याजाची रक्कम रु. १,३२,१५,७१५/- असे एकुण १,७२,६६,९७३/- ची मागणी केली आहे. तसेच सदरचे अर्जासोबत प्रत्येक महिन्यांच्या मागणी रक्कमा ह्या सदर अर्जासोबतच्या ॲनेक्श्चर-ए मध्ये नमुद केल्या आहेत. प्रतिवादी शिक्षण मंडळाने जो जबाब दिला आहे त्यात ॲनेक्श्चर - ए मध्ये नमुद केलेल्या रक्कमा देणे लागत नाही असे नमुद केलेले नाही. पतसंस्थेने त्यांचे व्यवस्थापक श्री. श्रीरंग नाना गिते यांचे प्रतिज्ञा पत्र दि.१९/११/२०११ रोजी दाखल केले आहे. व त्यात देखील सदर एकुण रक्कम रु.१,७२,६६,९७३/- ही प्रतिवादी यांचे कडुन कशा प्रकारे येणे आहे याची सविस्तर विगतवारी नमुद केली आहे.

**प्रतिवादी यांनी त्यांचे लेखी म्हणणे खालील प्रमाणे सादर केले.**

प्रतिवादी यांना या अर्जाची नोटीस मिळालेली असुन त्यांना लेखी म्हणने सादर करणेस अनेक संधी दिलेल्या आहेत त्यांनी सुनावणी वेळी लेखी म्हणने सादर केलेले नाही. प्रतिवादी यांनी सुनावणीचे कामकाज संपल्यानंतर उशीराने त्यांचे म्हणने सादर केले आहे. त्यामध्ये नमुद केलेनुसार अर्जदार संस्था बॅंक असतांना प्रतिवादि यांनी त्यांचेकडे एकुण २६ फिक्स डिपॉझीटच्या रक्कम रु ३९१४९१२८/-

ठेवलेल्या होत्या. अर्जदाराचे अनागोंदी कारभारामुळे प्रतिवाद यांना त्यांच्या फिक्स डिपॉझीटच्या रक्कमा अर्जदार हे मुदत संपल्यानंतरही परत करु शकलेले नाही.त्यामुळे अर्जदार यांना प्रतिवादी यांनी दि.१९/४/१९९९ रोजी ॲड.एस.जी.सोनवणे नाशिक यांचे मार्फत सदर रक्कमा परत मिळणेस नोटीस पाठविली होती. परंतु अर्जदार यांची फिक्स डिपॉझीटची रक्कम रु ३९१४९१२८/- ही रक्कम देण्याची परिस्थिती नव्हती. प्रतिवादी यांची फिक्स डिपॉझीटची रक्कम परत केलेली नाही. म्हणजेच अर्जदार जी रक्कम अर्जाव्दारे मागणी करीत आहे त्या कपातीच्या रक्कमांची वळती सन १९९१ रोजीच केलेली असल्यामुळे प्रतिवादी यांचेकडे कुठलीही कपातीची रक्कम शिल्लक नाही. प्रतिवादी यांनी अर्जदार यांचेविरुध्द सदर रक्कमा मिळणेकामी मे.दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठस्तर, नाशिक यांचे कोर्टात स्पे.मु.न.३४३/१९९९ दाखल केला होता. सदरच्या दाव्यातील कलम ५ मध्ये स्पष्टपणे उल्लेख केला आहे की, पगाराच्या कपातीतुन जमा झालेली रक्कम रु २४,६६,०७२/- ही रक्कम फिक्स डिपॉझीटचे रक्कमेपोटी वळती करुन घेतलेली आहे. सदरची रक्कम वजा करुन राहिलेल्या रक्कमेचा दावा प्रतिवादी यांनी मे.कोर्टात रक्कम वसुली करिता दाखल केला आहे. या दाव्याचा गुणवत्तेवर निकाल मे.दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर,नाशिक यांनी दि.३०/८/२००० रोजी दिला व प्रतिवादी यांची पगाराच्या कपातीतुन वजा जाता शिल्लक राहिलेली रक्कम रु ४,५७,३५,०८८/- इतकी रक्कम व दि १/८/१९९९ पासुन १५ टक्के प्रमाणे व्याज असा हकुम केला. म्हणजेच दिवणी दाव्यातही पगारातुन कपात केलेली रक्कम रु २४,६६,०७२/- ही वळती केलेली आहे. सदर रक्कम वळती केलेली असल्याची माहिती असतांनाही तब्बल १७ वर्षांनी अर्जदार यांनी सदर रक्कम परत मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे.

मे.दिवाणी न्यायाधिश,वरिष्ठ स्तर,नाशिक यांनी दि ३०/८/२००० रोजी दाव्याचा हुकुम करुनही रु ४५७३५०८८/- इतकी रक्कम व दि १/८/१९९९ पासुन १५ टक्के प्रमाणे व्याज दिलेले नाही. सदर दाव्यातील हकुमाप्रमाणे रक्कम वसुल करुन मिळणेकामी दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात स्पेशल दरखास्त नं.३९/२००७ दाखल केली आहे. त्यामुळे ऑक्टोबर २०१६ अखेर दिवाणी कोर्टाचे हकुमाप्रमाणे त्यांची अर्जदाराकडे रक्कम रु.१६,३५,०२,९३९/-इतकी रक्कम निघते.वरील सर्व कारणांचा विचार होवुन अर्जदार यांचा अर्ज बेकायदेशीर व खोटा असल्यामुळे रद्द करण्यांत यावा अशी विनंती केली.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ प्रमाणे सदर रक्कम अर्जदार संस्थेला त्या सभासदाकडुन येणे असलेली रक्कम दरमहाचे पगारातुन कापुन घेऊन सदर रक्कम त्याच दिवशी अर्जदार पतसंस्थेला देण्याचे कलम ४९ अन्वये बंधनकारक आहे.परंतु प्रतिवादी यांनी त्यांचे कर्मचारी (जे सदर पतसंस्थेचे सभासद/कर्जदार आहेत) त्यांचे पगारातुन कपात केलेली रक्कम रु.४०,५१,२५८/- अदा केलेली नाही.

तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ (२) मध्ये नमुद केले आहे की अशा करारपत्राची प्रत मिळाल्यावर संस्थेने तशी लेखी मागणी केली असता आणि (जोपर्यंत संस्थेला प्रदेय म्हणुन करारपत्राच्या प्रतीत दर्शविलेली एकुण रक्कम कापुन घेऊन ती संस्थेला देण्यात येत नाही तो पर्यंत) मालक अशा करारपत्रानुसार रक्कम कापुन घेईल आणि अशा रीतीने कापुन घेतलेली रक्कम ही अशा त्या दिवशी तो ती रक्कम देईल त्या दिवशी वेतन प्रदान अधिनियम १९३६ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे त्यांने देणे असलेल्या वेतनाचा भाग आहे असे समजुन संस्थेकडे भरील.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाचे १९६० वे कलम ४९ (३) मध्ये स्पष्ट नमुद केले आहे की जर अशा कर्मचा-यांचे पगारातुन कापुन घेतलेल्या रक्कमांचा संस्थेकडे भरणा केला नसेल त्या प्रकरणी अशा रक्कमा संस्थेला जमा दिनांकाला देय होत्या त्या दिनांकाला सुरु होणा-या व संस्थेला रक्कमा प्रत्यक्ष भरणा केल्याच्या दिनांक संपण्याच्या मुदतील संस्था सदस्याला जेवढया दराने व्याज आकारते त्याचे दिडपट दराने त्यावरील व्याज देण्यास मालक व्यक्तीशः जबाबदार असेल अशी तरतुद आहे. त्यानुसार संस्थेने मुद्रदल रक्कम रु.४०,५१,२५८/- व त्यावरील दिडपट व्याज रक्कम रु.१,३२,१५,७१५/- अशी एकुण रक्कम रु. १,७२,६६,९७३/- मागणी केलेली आहे.

परंतु अशी कोणतीही रक्कम प्रतिवादी यांनी अर्जदार संस्थेस दिली असल्याचे निदर्शनास आलेले नाही उलट सुनावणी वेळी प्रतिवादी अगर त्यांचे प्रतिनिधी यांनी भरणा केल्याचा उल्लेख अगर लेखी खुलासा केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी संस्थेने मागणी केलेल्या रक्कमा सदर संस्थेचे व सभासदांचे आर्थिक हित व कायदेशिर हक्क व सहकार कायद्यातील तरतुदीनुसार योग्य मागणी असल्याने सदरच्या रक्कमा देणे आवश्यक आहे.

प्रतिवादी यांनी त्यांचे लेखी खुलाशामध्ये नमुद केलेला दिवानी दावा क्र. ३९६/९९ व स्पेशल दरखास्त दाखल केल्याचा उल्लेख केलेला आहे. त्याचा व या अर्जात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ अन्वये मागणी रक्कमांचा संबंध येत नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ प्रमाणे मालकाने कर्मचा-यांचे पगारातुन कपात केलेल्या रक्कमा सहकारी संस्थेस दिल्या किंवा नाही हे पाहण्याचे व दिलेल्या नसतील तर दिडपट व्याज आकरण्याचे अधिकार निबंधक यांना आहे. आणि वर नमुद केल्या प्रमाणे प्रतिवादी यांनी त्यांचे कर्मचा-यांचे पगारातुन ॲनेक्श्चर - ए मधील रक्कमा वसुल करुनही अर्जदार पतसंस्थेस अदा केलेल्या नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सदर दाव्यात दाखल झालेली कागदपत्रे अर्जदार संस्थेचे व्यवस्थापक श्री.गिते यांचे प्रतिज्ञापत्र प्रतिवादी यांचे जबाब व झालेली सुनावणी या सर्व बाबी लक्षात घेता मी या निष्कर्षा प्रत पोहोचलो आहे की प्रतिवादी यांनी अर्जदार संस्थेच्या सभासद असलेल्या कर्मचा-यांचे पगारातुन वसुल केलेली एकुण रक्कम रु. ४०,५१,२५८/- व त्यावर दिडपट दराने व्याज प्रतिवादी यांनी अर्जदार संस्थेस अदा करणे कामी, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

५/-

-: **आदेश** :-

मी निलकंठ करे, जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, नाशिक, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार आदेश देतो की प्रशासन अधिकारी नाशिक महानगर पालिका शिक्षण मंडळ, नाशिक यांनी दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि. नाशिक या पतसंस्थेस प्रतिवादी यांनी कर्मचा-यांचे पगारातुन दरमहा वसुल केलेली रक्कम रु. ४०,५१,२५८/- व त्यावर दिडपट दराने व्याजाची रक्कम रु. १,३२,१५,७१५/- असे एकुण १,७२,६६,९७३/- एक महिन्याचे आत अदा करावे. तसेच रु. ४०,५१,२५८/- वर दिनांक ०१/०१/२०११ ते संपुर्ण रक्कम परतफेड होई पावेतो दिडपट व्याज दराने व्याज प्रतिवादी यांनी अर्जदार पतसंस्थेस अदा करावे.

त्याच प्रमाणे अर्जदार यांनी प्रतिवादी यांचेकडुन वर नमुद केलेली रक्कम रु. १,७२,६६,९७३/- व रक्कम वसुल होई पावेतोची दिडपट दाराने होणारे व्याज यांची वसुली महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ मधील तरतुदीस अनुसरुन जमिन महसुलाची बाकी म्हणुन वसुल करण्याचे रिती प्रमाणे ती प्रतिवादी यांचे कडुन वसुल करावी अथवा अर्जदार यांनी या आदेशाची बजावणी त्यांचे कडील ज्या अधिका-यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये अधिकार प्राप्त झाले आहे. त्यांचे मार्फत वसुली दाखल्याची अंमलबजावणी करुन वसुल करण्यात यावी आणि यासाठी स्वतंत्र अर्ज या कार्यालयाकडे करण्याची जरुरत नाही. हा आदेश व वसुली दाखला आज दिनांक०८ /०२/२०१७ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिला असे.

DIST. DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक NASIK

( निलकंठ करे )
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक

प्रति :-

१) प्रशासन अधिकारी,नाशिक महानगर पालिका शिक्षण मंडळ नाशिक.जुनी पंडीत कॉलनी गोदावरी बॅंकेजवळ,नाशिक

२) मॅनेजर,दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था लि.नाशिक

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

मा.विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,नाशिक विभाग नाशिक

जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक

[illegible]

[illegible]

9422106927




Revision Application No. /2017

**BEFORE THE DIVSIONAL JOINT REGISTRAR COOPERATIVE SOCIETIES, NASHIK DIVISION, NASHIK**

**The Administrator Officer**
**School Board of Nashik Municipal Corporation** } **Applicant**
Old Pandit Colony, Sharanpur Road, Nashik

V/s.

1) **The Prathmik Shikshak Sahakari Patsanstha Ltd. Nashik**
Suyojit Sankul, Nearby Lokmat Office,
Opp.Rajiv Gandhi Bhavan, Sharanpur Road,
Nashik

2) **The Deputy Registrar, Cooperative Societies Nashik District Nashik**
Sahakar Sankul, Near National Urdu
High School,Sarda Circle, Nashik-1
} **Respondents**

**REVISION APPLICATION U/s.154 OF THE MAHARASHTRA COOPERATIVE SOCIETIES ACT 1960 AGAINST THE ORDER DATED 09/02/2017 ISSUED U/S.49 OF THE M.C.S. ACT.**

On behalf of the applicant, it is most respectfully submitted as follows:-

1) The Respondent No.2 by his order u/s.49 of the Maharashtra Co-operative Societies Act directed the applicant to pay Rs. 40,51,258/- as principle interest of Rs.1,32,15,715/- total amount of Rs.1,72,66,973/-. The order is passed by the Respondent No.2 alleging that the amount of Rs.40,51,258/- deducted from the salary of the members of the Respondent No.1 society.

2) It is pertinent to note that, the earlier order for the same amount was passed by the Respondent No.2 on 10/5/2013. The said order has been challenge by the present applicant by filing Revision Application No.R-114/2013 which was heard and decided on 19/5/2016.The Divisional Joint Registrar, Cooperative Societies, Nashik Division Nashik has set aside the earlier order on 19/5/2016 and matter was remanded for fresh trial. The Respondent No.2 has issued the impugned order dated 9/2/2017 without considering the order of remand and the observation made in the order dtd.19/5/2016. The Respondent No.2 District Deputy Registrar, C.S. Nashik has not applied his mind properly and the impugned order dtd.9/2/2017 is issued which is totally illegal, improper and unjust.

3) Being aggrieved by the said order the present revision application is submitted on the following amongst other grounds.

**GROUNDS OF REVISION**

a) The order and decision of the respondent No.1 dated 09/02/2017 is illegal, improper and unjust.

b) The Respondent No.2 has not considered the provisions of Sec.49 properly and correctly.

c) It is pertinent to note that the amount of Rs.40,51,258/- is not lying with the Applicant. It is also important to note that the applicant has filed Special Civil Suit No.343/1999 against the Respondent No.1 for recovery of the amount of Rs.4,57,35,088/- and the suit has been decreed against the applicant on 30/8/2000. In that suit Rs.24,66,072/- was adjusted towards the amount due from the Respondent No.1 by giving credit of Rs.40,51,258/- and considering the recovery the remaining amount is claimed in the suit. The said position was explained to the Respondent No.2 but he has totally ignored the facts and impugned order is passed against the present applicant.

d) It is pertinent to note that the present applicant has filed Spl. Darkhast No.39/2007 in which claim of Rs.4,57,35,088/- and interest of Rs.5,01,96,276/- total amount of Rs. 9,59,31,364/-. The Respondent No.1 has not given any recovery towards the Special Darkhast. The Respondent No.1 has also not given true and proper information to the District Deputy Registrar, C.S.Nashik while claiming the amount in the application.

e) The order dtd.09/02/2017 is secured by the Respondent No. 1 from the Respondent No.2 with false representation and giving false information and concealing the true facts.

f) It is pertinent to note that the Advocate of Respondent No.1 has given application in the Civil Judge Senior Division Nashik on 20/3/2013 to adjust towards the amount recoverable from the Respondent No.1. The Respondent No.

1 has also concealed the fact while making representation to the District Deputy Registrar Nashik.

g) It is pertinent to note that the Respondent No.1 is not willing to pay Rs.9,59,31,364/- and future interest @ 15 % as per the decree dated 30/8/2000. The Respondent No.1 is not entitled to claim any amount from the applicant as nothing due and payable to the Respondent No.1.

h) The Respondent No.2 has not properly appreciated the facts of the case and law of the point.

i) There is clear-cut violation of the principles of natural justice.

j) It is important to note that the amount claimed by the Respondent No.1 Rs.40,51,258/- is not lying with the applicant and as such the interest at 1.5 times claimed and charged is not proper and correct.

k) The Respondent No.2 has ignore School Board of Nashik Municipal Corporation is public body and the Administrative Officer is Government Officer (Gazetted Officer Class II) and they have acted in the interest of the School Board and as such no order could have been passed against such officer without giving fair and proper opportunity.

l) The Respondent No.2 has drawn improper and unwarranted inferences in the impugned order dtd.09/02/2017.

m) Respondent No.2 has not properly perused the record and given wrong findings that the requisition by the Respondent No.1.

3) The impugned order is dated 09/02/2017 which was communicated to the present applicant on 01/03/2017 and as such the present Revision Application filed today is within limitation.

4) The necessary court fee stamp of Rs.100/- is affixed to this revision application.

5) **It is therefore prayed that,**

a) The order dated 09/02/2017 issued by the Respondent No.2 may please be quashed and set aside.

b) That during the pendency of the revision application, the operation of the order dtd.09/02/2017 may be stayed.

c) The cost of this revision application may please be awarded to the applicant and against the respondent No.1.

d) Any other suitable order as deem fit in the interest of justice may please be passed in favour of the applicant.

Nashik

Date : 13/04/2017

Advocate for the Applicant

शिक्षणाधिकारी
नाशिक महानगरपालिका शिक्षण विभाग
नाशिक

Revision Application No. /2017

**BEFORE THE DIVSIONAL JOINT REGISTRAR COOPERATIVE SOCIETIES, NASHIK DIVISION, NASHIK**

**The Administrator Officer**
**School Board of Nashik Municipal Corporation** } **Applicant**

**V/s.**

**1) The Prathmik Shikshak Sahakari**
**Patsanstha Ltd. Nashik & others** } **Respondents**

**APPLICATION FOR STAY.**

On behalf of the Applicant, it is most respectfully submitted as under :-

1) The applicant has filed this Revision Application against the order District Deputy Registrar, Nashik issued under Section 49 of the M.C.S. Act 1960 against the applicant on 09/02/2017. The order shows that principal amount of Rs.1,72,66,973/-.

2) It is pertinent to note that, the earlier order for the same amount was passed by the Respondent No.2 on 10/5/2013. The said order has been challenge by the present applicant by filing Revision Application No.R-114/2013 which was heard and decided on 19/5/2016. The Divisional Joint Registrar, Cooperative Societies, Nashik Division Nashik has set aside the earlier order on 19/5/2016 and matter was remanded for fresh trial. The Respondent No.2 has issued the impugned order dated 9/2/2017 without considering the order of remand and the observation made in the order dtd.19/5/2016. The Respondent No.2 District Deputy Registrar, C.S. Nashik has not applied his mind properly and the impugned order dtd.9/2/2017 is issued which is totally illegal, improper and unjust.

3) The Applicant has strong Prima-facie case and the applicant bonafidely believe that he will succeed in this Revision Application.

4) It is therefore prayed that, the stay to the execution and operation of the impugned order dated 09/02/2017 may please be granted.

Nashik.

Date : /04/2017

Advocate for Applicant

शिक्षणाधिकारी
नाशिक महानगरपालिका शिक्षण विभाग
नाशिक

NMC|EDU|IW4|2020|331

(184)

# नाशिक महानगरपालिका,नाशिक

आयुक्त कार्यालय,
जा.क्र. ७५३/९०५/शिक्षण विभाग
दि. २८/06/2020

प्रति,
मा.नगरसचिव
नाशिक महानगरपालिका,
नाशिक.

विषय:- प्राथमिक शिक्षक पतसंस्थेकडुन मनपा शिक्षण विभाग प्राथमिक शिक्षकांची भविष्य निर्वाह निधीतील मुदतठेव ठेवलेली रक्कम परत मिळणे बाबत..

संदर्भ :-1) मा.श्री.गणेश बबनराव गिते,सभापती स्थायी समिती, नाशिक महानगरपालिका नाशिक यांचे दिनांक 11/06/2020 चे पत्र

उपरोक्त विषयान्वये, सन 1989 ते 1995 दरम्यान वेळोवेळी तत्कालीन शिक्षण मंडळाने मनपा शिक्षण विभागाचे प्राथमिक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी वर्गणी एकूण रक्कम रु.3,91,49,128/- मुदत ठेव म्हणुन दि.प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि.नाशिक येथे ठेवण्यात आली होती. सदरच्या मुदतठेवी देय झाल्यांनतरही शिक्षक बँकेने मुदत ठेवीची रक्कम अदा केली नाही. त्यामुळे शिक्षण मडळाने दि.08/05/1998 रोजी शिक्षक बँकेच्या मिळकती शिक्षण मंडळा कडे गहानखताव्दारे गहाण ठेवुन घेतल्या व सन 1999 मध्ये शिक्षक बँके विरुध्द नाशिक येथील दिवाणी न्यायालयात दावा क्र.343/1999 दाखल केला होता. त्याचा निकाल दि.30/08/2000 रोजी शिक्षण विभागाच्या बाजुने होवुन सदर मुदत ठेवी रकमेवर द.सा.द.शे.15 टक्के व्याजदराने देण्याचा आदेश देण्यात आला. त्याप्रमाणे मा.न्यायालयाने दिनांक 06/10/2005 रोजी र.रु.4,57,35,088/- ( अक्षरी रक्कम रुपये चार कोटी सत्तावण्ण लक्ष पस्तीस हजार अठठयांशी मात्र) शिक्षण विभागास अदा करणेचे आदेश दिले.

सदर बँक डबघाईस गेल्याने बँकेचा बँकिंग परवाना दि.25/09/2000 रोजी रद्द झाला व मे.ग्राहक तक्रार निवारण मंच नाशिक यांनी सदर बँकेस त्यांचे ठेवीदारांना त्यांची मुद्दल रक्कम देणे बाबत आदेशित केले होते त्यामुळे त्यावेळी पतसंस्था रक्कम देऊ शकली नाही. त्यामुळे फायनल डिक्री क्र.1/2001 दाखल करुन बँकेच्या मिळकती जप्त करण्यात आल्या व जप्त केलेल्या मिळकतींवर शिक्षण विभागाचा बोजा चढविण्यात आला. जप्त केलेल्या मिळकती शिक्षण विभागातर्फे लिलावास काढण्यास मा.न्यायालयाने दि.06/10/2005 रोजी परवानगी दिली.

त्यानुसार आदेशाच्या अंमलबजावणी कामी दरखास्त न.39/2007 दाखल करुन खालील मिळकतींच्या लिलाव प्रक्रिया करणेस परवानगी मागितली.

1) तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी मौजे नाशिक बोहोरपटटी येथिल सीटी सर्व्हे न.1280 म्युन्सिपल घर न.904 यासी क्षेत्र 168.00 चौ.मी. त्यावरील एकुण 4 मजले बांधीव मिळकत इमारत यासी सर्व बांधिव क्षेत्र 1351.42 चौ.फु. म्हणजेच 125.55 चौ.मी.त्यात एक भाडेकरु यास दरमहा

रु.240/- प्रतीमाह भाडयाने दिलेल्या तळमजल्यावर एक दुकानाचे भाडेकरु आहेत.

2) तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका येवला पैकी मौजे येवला येथील सिटी सर्व्हे न.4612 यासी क्षेत्र 55.50 चौ.मी. 597.40 चौ फुट

3) तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नांदगाव पैकी मौजे नांदगाव येथील सीटी सर्व्हे न.2 /अ सीटी सर्व्हे नं.3172

4) तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका चांदवड येथील सीटी सर्व्हे न.426/ब यासी ग्रामपंचायत घर ना.117 यासी क्षेत्र 96.00 चौ.मी.

5) वरील मिळकत शिक्षक बँकेने शिक्षण मंडळास गहाण म्हणुन दिलेली आहे.व सदर गहाण खतास आचार्य दोंदे विदयार्थी भुवन न्यास .नाशिक नोदणी क्र. पी टी आर क्र. ई- 374 नाशिक ता.17.121976 या विश्वस्त संस्थेचे विश्वस्त म्हणुन संमती देणार आहे. तसे आचार्य दोंदे भुवन विदयार्थी न्यास नाशिक कार्यकारी मंडळाने सदर रकमेची जबाबदारी साठी संमतीदार राहण्याचे ठरविले होते. संमतीदार या नात्याने या न्यासाची मिळकत म्हणजेच सिटी सर्व्हे न. 6762 फायनल प्लॉट न.219 क्षेत्र 4801.00 चौ. मी. आणि त्यावरील बांधकामाची मिळकत जामीन आहे.

त्या अनुषंगाने मा.न्यायालयाच्या परवानगीने अनुक्रमे दिनांक 2804/2014 व दिनांक 17/06/2016 रोजी नाशिक येथिल बोहोरपटटी येथिल मिळकतीचा लिलाव करुन रक्कम वसुल करण्याबाबत प्रयत्न केले होते. परंतु लिलाव प्रक्रियेस कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही.

नाशिक येथिल बोहोरपटटी तसेच येवला,चांदवड,मनमाड येथिल मिळकतींचे मुल्यांकन काढले असता चारही मिळकतीचे मुल्यांकन फक्त र.रु.1,44,00,000/- असे आहे.

त्यामुळे मे.दिवाणी न्यायाधिश,वरीष्ठ स्तर नाशिक यांचे कोर्टात दि.13/02/2009 रोजी आचार्य दोंदे विदयार्थी वस्ती गृह ही मिळकत जप्त करुन मागितली होती.व सदरच्या अर्जावर मे.दिवाणी न्यायाधिश,वरीष्ठ स्तर यांनी दि.16/04/2009 रोजी हुकुम करुन सदरचे मिळकतीचे शिक्षण विभागाकडे रजिष्ठर गहाणखत करुन दिलेले नसल्यामुळे मिळकत जप्त करुन मागता येणार नाही.असा हुकुम केलेला आहे.

त्यामुळे शिक्षण विभागा तर्फे सदर दाव्याचे कामकाज पहाणारे ॲड.श्री. व्हि.के.सानप यांचे दिनांक 24/11/2016 व अनुक्रमे दि.09/10/2018 रोजी अभिप्राय मागविला असता न्यायालयाने दिनांक 10/08/2000 रोजी दिलेला निर्णय योग्य असुन र.रु.4,57,35,088/-(अक्षरी रक्कम रुपये चार कोटी सत्तावण्ण लक्ष पस्तीस हजार अठठ्यांशी मात्र ) शिक्षण विभागाने स्विकारावी.त्यात तडजोड करु नये असा अभिप्राय दिला.तसेच पत्र क्र JS&c/MUMBAI/NMC/131 /2017 अन्वये दिनांक 13/04/2017 रोजी ई मेल व्दारे मनपाचे मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड.जे.शेखर यांचाही अभिप्राय प्राप्त झाला. त्यांच्या अभिप्रायात सदर दाव्याचे शिक्षण विभागा मार्फत काम बघणारे ॲड.श्री. व्हि.के.सानप यांचा अभिप्राय योग्य असल्याचे कळविले आहे.

तसेच मा. अतिरीक्त आयुक्त सो यानी दिनांक 13/12/2019 रोजी आदेशित केल्यानुसार मनपा पॅनल वरील कायदेतज्ञ ॲड श्री.समिर जोशी यांचा अभिप्राय दि.20/01/2020 रोजी शिक्षण विभागास प्राप्त झाला. सदर अभिप्रायात त्यांनी असे नमुद केले कि, नाशिक महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असुन यातील पैसा हा जनतेचा पैसा असतो. अशाच प्रकारे यापुर्वी ही नाशिक महानगरपालिकेने त्यांच्या कडील मोठी रक्कम श्रीराम बँक व इतर बँकामध्ये,वित्तीय संस्थामध्ये गुंतविल्या व या संस्था डबघाईला गेल्यामुळे नाशिक मनपाचे आजही मोठया प्रमाणत नुकसान झालेले आहे. त्यामळे नस्तीत नमुद नोंदणीकृत गहाण खतातील मिळकती विक्री करुनही 4 कोटी 57 लक्ष एवढी मोठी रक्कम वसुल होणार की नाही ही बाब विचारात घ्यावी.नस्तीतील लेखापरीक्षण विभागाच्या शे-या प्रमाणे सदरची वसुली रक्कम काही कोटीत असु शकते.परंतु वास्तविक पणे व व्यावहारीकदृष्या प्रस्तावाबाबतचा विचार करणे आवश्यक आहे.सदरच्या स्पेशल दरखास्त न.39/2007 मध्ये समझोता करावयाचा असल्यास मुददल व त्यावरील काही काळाचे व्याज म्हणजेच मे.कोर्टाने दि.06/10/2005 रोजी पारीत केलेल्या आदेशा प्रमाणे र.रु.4,57,35,088/- ऐवढया रकमेच्या खाली समझोता करणे योग्य होणार नाही. असे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसत असल्यामुळे वर नमुद केलेली रक्कम अथवा त्यापेक्षा जास्त रक्कम आपसात बैठक घेऊन चर्चा करुन मान्य करावी व मान्य झालेल्या रकमेबाबचा समझोता हा मे.कोर्टातील स्पेशल दरखास्त न.39/2007मध्ये करण्यात यावा जेणे करुन सर्व कायदेशिर बाबींची पुर्तता पुर्ण होईल. मे.कोर्टात या प्रमाणे सुलेहनामा दाखल झाल्या नंतर व त्याप्रमाणे ठरलेली रक्कम मिळाल्या नंतर संबधित गहाणखतातील मिळकती या गहाणमुक्त करण्यात याव्यात असे नमुद करण्यात आले आहे.

तथापी निकाल लागल्याच्या दि.30/08/2000 पासुन निकालात नमुद र.रु.4,57,35,088/- या रकमेवरील दि.31/05/2020 रोजी पर्यंत व्याजाची परिगणना केली असता र.रु. 18,11,75,122 /-इतकी होते.त्याअनुषंगाने र.रु.18,11,75,122/- इतकी रक्कम स्विकारावी असे विभागाचे मत आहे.तरी रक्कम रु.18,11,75,122/- स्विकारावी किंवा र.रु.4,57,35,088/- स्विकारावी या निर्णयास्तव स्थायी समितीवर सादर

शिक्षणाधिकारी (प्र)
मनपा शिक्षण विभाग, नाशिक

अतिरिक्त आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

महानगरपालिका सचिवालय
मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. ९३५० दि. २९/६/२०२०
जा.क्र. सभा क्र. : ०४

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

(१८४)

## स्थायी समिती ठराव

विषय क्र. : ९४२ ठराव क्र. : ९४२ दिनांक : ०९/ ०७ /२०२०

**संदर्भ :-मा.आयुक्त सो.यांचेकडील जा.क्र.नस/शिक्षण विभाग/१०५/२०२० दिनांक २६.०६.२०२० चे पत्र.**

**१)मा.हेमंत दिनेश शेट्टी व मा.प्रा.शरद चिंतामण मोरे सदस्य स्थायी समिती यांची उपसुचना.**

प्राथमिक शिक्षक पतसंस्थेकडुन मनपा शिक्षण विभाग प्राथमिक शिक्षकांची भविष्य निर्वाह निधीतील मुदतठेव ठेवलेली रक्कम परत मिळणे बाबतचे विषयान्वये, सन १९८९ ते १९९५ दरम्यान वेळोवेळी तत्कालीन शिक्षण मंडळाने मनपा शिक्षण विभागाचे प्राथमिक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी वर्गणी एकूण रक्कम रु.३,९१,४९,१२८/- मुदत ठेव म्हणुन दि.प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि.नाशिक येथे ठेवण्यात आली होती. सदरच्या मुदतठेवी देय झाल्यांनतरही शिक्षक बँकेने मुदत ठेवीची रक्कम अदा केली नाही. त्यामुळे शिक्षण मडळाने दि.०८/०५/१९९८ रोजी शिक्षक बँकेच्या मिळकती शिक्षण मंडळा कडे गहानखताव्दारे गहाण ठेवुन घेतल्या व सन १९९९ मध्ये शिक्षक बँके विरुध्द नाशिक येथील दिवाणी न्यायालयात दावा क्र.३४३/१९९९ दाखल केला होता. त्याचा निकाल दि.३०/०८/२००० रोजी शिक्षण विभागाच्या बाजुने होवुन सदर मुदत ठेवी रकमेवर द.सा.द.शे.१५ टक्के व्याजदराने देण्याचा आदेश देण्यात आला. त्याप्रमाणे मा.न्यायालयाने दिनांक ०६/१०/२००५ रोजी र.रु.४,५७,३५,०८८/- ( अक्षरी रक्कम रुपये चार कोटी सत्तावण्ण लक्ष पस्तीस हजार अठठयांशी मात्र) शिक्षण विभागास अदा करणेचे आदेश दिले.

सदर बँक डबघाईस गेल्याने बँकेचा बँकींग परवाना दि.२५/०९/२००० रोजी रदद झाला व मे.ग्राहक तक्रार निवारण मंच नाशिक यांनी सदर बँकेस त्यांचे ठेवीदारंाना त्यांची मुददल रक्कम देणे बाबत आदेशित केले होते. त्यामुळे त्यावेळी पतसंस्था रक्कम देऊ शकली नाही. त्यामुळे फायनल डिक्री क्र.१/२००१ दाखल करुन बँकेच्या मिळकती जप्त करण्यात आल्या व जप्त केलेल्या मिळकतींवर शिक्षण विभागाचा बोजा चढविण्यात आला. जप्त केलेल्या मिळकती शिक्षण विभागातर्फे लिलावास काढण्यास मा.न्यायालयाने दि.०६/१०/२००५ रोजी परवानगी दिली.

त्यानुसार आदेशाच्या अंमलबजावणी कामी दरखास्त न.३९/२००७ दाखल करुन खालील मिळकतींच्या लिलाव प्रक्रिया करणेस परवानगी मागितली.

१) तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पौकी मौजे नाशिक बोहोरपटटी येथिल सीटी सर्व्हे न.१२८० म्युन्सिपल घर न.९०४ यासी क्षेत्र १६८.०० चौ.मी. त्यावरील एकुण ४ मजले बांधीव मिळकत इमारत यासी सर्व बांधिव क्षेत्र १३५१.४२ चौ. फु. म्हणजेच १२५.५५ चौ.मी.त्यात एक भाडेकरु यास दरमहा रु.२४०/- प्रतीमाह भाडयाने दिलेल्या तळमजल्यावर एक दुकानाचे भाडेकरु आहेत.

२) तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका येवला पैकी मौजे येवला येथील सिटी सर्व्हे नं. ४६१२ यासी क्षेत्र ५५.५० चौ.मी. ५९७.४० चौ फुट

३) तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नांदगाव पौकी मौजे नांदगाव येथील सीटी सर्व्हे नं. २ /अ सीटी सर्व्हे नं. ३१७२

४) तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका चांदवड येथील सीटी सर्व्हे नं. ४२६/ब यासी ग्रामपंचायत घर ना.११७ यासी क्षेत्र ९६.०० चौ मी.

४

५) वरील मिळकत शिक्षक बँकेने शिक्षण मंडळास गहाण म्हणुन दिलेली आहे.व सदर गहाण खतास आचार्य दोंदे विदयार्थी भवन न्यास नाशिक नोंदणी क्र. पी टी आर क्र. ई- ३७४ नाशिक ता.१७.१२१९७६ या विश्वस्त संस्थेचे विश्वस्त म्हणुन संमती देणार आहे. तसे आचार्य दोदे भुवन विदयार्थी न्यास नाशिक कार्यकारी मंडळाने सदर रकमेची जबाबदारी साठी संमतीदार राहण्याचे ठरविले होते. संमतीदार या नात्याने या न्यासाची मिळकत म्हणजेच सिटी सव्हे न. ६७६२ फायनल प्लॉट नं. २१९ क्षेत्र ४८०१.०० चौ. मी. आणि त्यावरील बांधकामाची मिळकत जामीन आहे.

त्या अनुषंगाने मा.न्यायालयाच्या परवानगीने अनुक्रमे दिनांक २८/०४/२०१४ व दिनांक १७/०६/२०१६ रोजी नाशिक येथिल बोहोरपटटी येथिल मिळकतीचा लिलाव करुन रक्कम वसुल करण्याबाबत प्रयत्न केले होते. परंतु लिलाव प्रक्रियेस कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही.

नाशिक येथिल बोहोरपट्टी तसेच येवला,चांदवड,मनमाड येथिल मिळकतींचे मुल्यांकन काढले असता चारही मिळकतीचे मुल्यांकन फक्त र.रु.१,४४,००,०००/- असे आहे.

त्यामुळे मे. दिवाणी न्यायाधिश, वरीष्ठ स्तर नाशिक यांचे कोर्टात दि.१३/०२/२००९ रोजी आचार्य दोंदे विदयार्थी वस्ती गृह ही मिळकत जप्त करुन मागितली होती.व सदरच्या अर्जावर मे.दिवाणी न्यायाधिश, वरीष्ठ स्तर यांनी दि.१६/०४/२००९ रोजी हुकुम करुन सदरचे मिळकतीचे शिक्षण विभागाकडे रजिष्ठर गहाणखत करुन दिलेले नसल्यामुळे मिळकत जप्त करुन मागता येणार नाही. असा हुकुम केलेला आहे.

त्यामुळे शिक्षण विभागा तर्फे सदर दाव्याचे कामकाज पहाणारे ॲड.श्री. व्हि.के.सानप यांचे दिनांक २४/११/२०१६ व अनुक्रमे दि.०९/१०/२०१८ रोजी अभिप्राय मागविला असता न्यायालयाने दिनांक १०/०८/२००० रोजी दिलेला निर्णय योग्य असुन र.रु.४,५७,३५,०८८/-(अक्षरी रक्कम रुपये चार कोटी सत्तावण्ण लक्ष पस्तीस हजार अठठयांशी मात्र ) शिक्षण विभागाने स्विकारावी.त्यात तडजोड करु नये असा अभिप्राय दिला.तसेच पत्र क्र JS&c/MUMBAI/NMC/१३१ /२०१७ अन्वये दिनांक १३/०४/२०१७ रोजी ई मेल व्दारे मनपाचे मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड.जे.शेखर यांचाही अभिप्राय प्राप्त झाला. त्यांच्या अभिप्रायात सदर दाव्याचे शिक्षण विभागा मार्फत काम बघणारे अँड श्री. व्हि.के.सानप यांचा अभिप्राय योग्य असल्याचे कळविले आहे.

तसेच मा. अतिरीक्त आयुक्त सो. यानी दिनांक १३/१२/२०१९ रोजी आदेशित केल्यानुसार मनपा पॅनल वरील कायदेतज्ञ ॲड श्री.समिर जोशी यांचा अभिप्राय दि.२०/०१/२०२० रोजी शिक्षण विभागास प्राप्त झाला. सदर अभिप्रायात त्यांनी असे नमुद केले कि, नाशिक महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असुन यातील पैसा हा जनतेचा पैसा असतो. अशाच प्रकारे यापुर्वी ही नाशिक महानगरपालिकेने त्यांच्या कडील मोठी रक्कम श्रीराम बँक व इतर बँकामध्ये, वित्तीय संस्थामध्ये गुंतविल्या व या संस्था डबघाईला गेल्यामुळे नाशिक मनपाचे आजही मोठया प्रमाणत नुकसान झालेले आहे. त्यामळे नस्तीत नमुद नोंदणीकृत गहाण खतातील मिळकती विक्री करुनही ४ कोटी ५७ लक्ष एवढी मोठी रक्कम वसुल होणार की नाही ही बाब विचारात घ्यावी. नस्तीतील लेखापरीक्षण विभागाच्या शे-या प्रमाणे सदरची वसुली रक्कम काही कोटीत असु शकते.परंतु वास्तविकपणे व व्यावहारीकदृष्या प्रस्तावाबाबतचा विचार करणे आवश्यक आहे. सदरच्या स्पेशल दरखास्त न.३९/२००७ मध्ये समझोता

करावयाचा असल्यास मुददल व त्यावरील काही काळाचे व्याज म्हणजेच मे. कोर्टाने दि.०६/१०/२००५ रोजी पारीत केलेल्या आदेशा प्रमाणे र.रु.४,५७,३५,०८८/- ऐवढया रकमेच्या खाली समझोता करणे योग्य होणार नाही. असे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसत असल्यामुळे वर नमुद केलेली रक्कम अथवा त्यापेक्षा जास्त रक्कम आपसात बैठक घेऊन चर्चा करुन मान्य करावी. व मान्य झालेल्या रकमेबाबचा समझोता हा मे.कोर्टातील स्पेशल दरखास्त न.३९/२००७मध्ये करण्यात यावा जेणे करुन सर्व कायदेशिर बाबींची पुर्तता पुर्ण होईल. मे.कोर्टात या प्रमाणे सुलेहनामा दाखल झाल्या नंतर व त्याप्रमाणे ठरलेली रक्कम मिळाल्या नंतर संबधित गहाणखतातील मिळकती या गहाणमुक्त करण्यात याव्यात असे नमुद करण्यात आले आहे.

तथापी निकाल लागल्याच्या दि.३०/०८/२००० पासुन निकालात नमुद र.रु.४,५७,३५,०८८/- या रकमेवरील दि.३१/०५/२०२० रोजी पर्यंत व्याजाची परिगणना केली असता र.रु. १८,११,७५,१२२ /- इतकी होते.त्याअनुषंगाने र.रु.१८,११,७५,१२२/- इतकी रक्कम स्विकारावी असे विभागाचे मत आहे. तरी रक्कम रु.१८,११,७५,१२२/- स्विकारावी किंवा र.रु.४,५७,३५,०८८/- स्विकारावी या निर्णयास्तव मा. आयुक्त सो.यांनी स्थायी समितीवर डॉकेट सादर केले आहे.

सबब मा.आयुक्त सो.यांनी मांडलेली वस्तुस्थिती व मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देश झालेला हुकूमनामा यांचा विचार करुन खालील बाबींवरती सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने केलेल्या खुलाश्यासह मनपाच्या आर्थिक हिताचा निर्णय मा.स्थायी समितीच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय देण्यांत येत आहे.

दावा क्र.३४३/१९९९ या मध्ये फायनल डिक्री क्र.४/२००१ नुसार दि.६.१०.२००५ रोजी हुकूमनामा झालेला आहे. त्यामध्ये गहाणखत केलेली प्रॉपर्टी विक्री करावी व र.रु.४,५७,३५,०८८/-इतकी रक्कम वसुल करावी, जोपर्यंत रक्कम मिळत नाही तोपर्यंत १५ टक्के व्याज घ्यावे. दावा दाखल केल्याने दि.०१.०८.१९९९ पासुन परंतु गहाणखत केलेल्या प्रॉपर्टीची किंमत आजचा बाजारभावाची तुलना केली तर र.रु.१,४४,००,०००/-इतक्या रक्कमेपेक्षा जास्त होत नाही.

मा.शिक्षण अधिकारी सो.यांनी दि.१३.०२.२००९ रोजी आचार्य दोंदे भवन हि मिळकत जमा करुन त्याची विक्री करण्यास मंजुरी मिळावी अशी विनंती मा.न्यायालयात केली होती परंतु मा.न्यायालयाने ती फेटाळलेली आहे. यामध्ये कोर्टाने म्हटले आहे कि आचार्य दोंदे भुवन जामिनदार आहे बँकेच्या कुठल्याही आर्थिक व्यवहारामध्ये हस्तक्षेप नाही आणि कुठलेली गहाणखत धर्मदाय आयुक्तांच्या पुर्व परवानगी शिवाय करता येत नाही त्यामुळे मनपाने केलेली मागणी फेटाळलेली आहे.

मात्र या मध्ये पुर्वीच्या गहाणखतामध्ये दिलेल्या सर्व प्रॉपर्टी विक्री करण्यास मंजुरी दिली होती, परंतु सदर प्रॉपर्टी विक्रीस प्रतिसाद मिळाला नाही त्यामुळे महानगरपालिके समोर कुठलाही पर्याय राहिलेला नाही. दुसरीकडे शिक्षक बँकेकडुन मनपा सेवकांकडुन कर्ज घेतलेले होते. त्याबाबत रक्कम मनपाने परस्पर वसुली करुन घेतलयामुळे मा.जिल्हा उपनिबंधक सो यांचेकडे महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ४९ अन्वये शिक्षक बँकेने तक्रार केली त्यामध्ये मा.जिल्हा उपनिबंधक यांचे कार्यालयामार्फत आदेश निर्गमित केलेल्या मुळ रक्कमेवर दिडपट व्याज द्यावे. दि.०१.०१.२०११ पासुन ते आजपावेतो आकारणी करावी त्याची व्हॅल्युएशन केली तर र.रु.१,४२,८०,६८४/- + आजपर्यंतची

आकारणी केली तर र.रु.३,१५,४७,६५७/-इतकी रक्कम होत आहे. एवढी मोठी रक्कम शिक्षक बँकेस देणे योग्य होणार नाही, त्यामुळे या प्रकरणामध्ये अजुन एका न्यायमंच म्हणजे ग्राहक मंचाकडुन सुध्दा शिक्षक पतसंस्थेकडुन ५० टक्के रक्कम सेटलमेंट करावी असे आदेश दि.२५.०९.२००७ रोजी निर्गमित केलेले आहे. शिक्षक बँकेचा परवाना रदद होऊन पतसंस्थेमध्ये रुपांतर झालेले आहे.

त्यामुळे एकंदरीत मनपाचे येणारे पैसे वसुल होण्याच्या दृष्टीने आचार्य दोंदे भुवन या जागेवरती नगररचना विभागाकडे दि.२२.०६.२०१५ रोजी बांधकाम परवानगी साठी आलेला असतांना शिक्षक बँकेशी झालेल्या व्यवहारामध्ये जामिनदार असल्यामुळे मनपाचे पैसे वसुल करण्याची संधी मनपाला प्राप्त झाली आहे.

यामध्ये वेळो-वेळी मिळालेले आदेशाचे पालन करुन मार्ग कसा काढतायेईल त्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे विधीतज्ञ ॲड समीर जोशी यांचा दि.२०.०१.२०२० रोजीचा कायदेशिर अभिप्राय मा.उच्च न्यायालयाचे दुसरे विधीतज्ञ ॲड एम.एल.पाटील यांचा दि.०२.०५.२०२० रोजीचा कायदेशिर अभिप्रायानुसार झालेल्या डिक्री क्र.४/२००१ नुसार र.रु.४,५७,,३५,०८८/-इतकी रक्कम वसुल करणे योग्य होईल असे मत दिलेले आहे.

दावा क्र.३४३/१९९९ व दरखास्त क्र.३९/२००७ या दोघा दाव्यातील समझोता किंवा डिक्री क्र.४/२००१ नुसार र.रु.४,५७,३५,०८८/- इतकी रक्कम वसुल करणे योग्य होईल.

तसेच या प्रकरणामध्ये मनपाची रक्कम वसुल झालेनंतर केलेले गहाणखत क्र.४२२९/१९९९ हे मुक्त करुन मनपाचे असलेले नांव कमी करुन त्यांना संमती पत्र देण्यांत यावे.

दावा क्र.३४३/१९९९ व दरखास्त ३९/२००७ अंतिम सुलेनामा निकाली काढावा. तसेच शिक्षक बँकेकडुन शिक्षण मंडळास वरीलप्रमाणे रक्कम अदा झाल्यानंतर आर्चाय दोंदे भवनच्या संचालक मंडळाने नगररचना विभागाकडे दि.१५.०६.२०१५ रोजी केलेल्या बांधकाम परवानगी बाबत त्यांना कायदेशिर बाबी तपासुन व विकास शुल्क घेवुन ना-हरकत दाखला देण्यांत यावा.

वरील सर्व बाबींचा विचार करता दि.०९.०७.२०२० रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये प्रशासनाने केलेल्या खुलाश्यानुसार तसेच मा.उच्च न्यायालयाचे विधीतज्ञ यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार शिक्षक पतसंस्थेच्या वतीने तथा आचार्य दोंदे भुवनचे संचालक मंडाळाच्या वतीने र.रु.४,५७,३५,०८८/- (र.रु.चार कोटी सत्तावन्न लाख पस्तीस हजार अठयाऐंशी फक्त) इतकी रक्कम नियमानुसार वसुल करणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

महानगरपालिका शिक्षण मंडळ,नाशिक
शासकीय/शालेय
29 JUL 2020
आवक क्र. ९३५०
२९/७/२०२०

नगरसचिव,
नाशिक महानगरपालिका,नाशिक.

महानगरपालिका सचिवालय
मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ.क्र. १३५० दि. २९/६/२०२०
सभा क्र. दि. ०४

# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## स्थायी समिती ठराव

विषय क्र. : ९४२ ठराव क्र. :९४२ दिनांक : ०९/ ०७ /२०२०

---

**संदर्भ :-मा.आयुक्त सो.यांचेकडील जा.क्र.नस/शिक्षण विभाग/१०५/२०२० दिनांक २६.०६.२०२० चे पत्र.**

**१)मा.हेमंत दिनेश शेट्टी व मा.प्रा.शरद चिंतामण मोरे सदस्य स्थायी समिती यांची उपसुचना.**

प्राथमिक शिक्षक पतसंस्थेकडुन मनपा शिक्षण विभाग प्राथमिक शिक्षकांची भविष्य निर्वाह निधीतील मुदतठेव ठेवलेली रक्कम परत मिळणे बाबतचे विषयान्वये, सन १९८९ ते १९९५ दरम्यान वेळोवेळी तत्कालीन शिक्षण मंडळाने मनपा शिक्षण विभागाचे प्राथमिक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी वर्गणी एकूण रक्कम रु.३,९१,४९,१२८/- मुदत ठेव म्हणुन दि.प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि.नाशिक येथे ठेवण्यात आली होती. सदरच्या मुदतठेवी देय झाल्यांनतरही शिक्षक बँकेने मुदत ठेवीची रक्कम अदा केली नाही. त्यामुळे शिक्षण मडळाने दि.०८/०५/१९९८ रोजी शिक्षक बँकेच्या मिळकती शिक्षण मंडळा कडे गहानखताव्दारे गहाण ठेवुन घेतल्या व सन १९९९ मध्ये शिक्षक बँके विरुध्द नाशिक येथील दिवाणी न्यायालयात दावा क्र.३४३/१९९९ दाखल केला होता. त्याचा निकाल दि.३०/०८/२००० रोजी शिक्षण विभागाच्या बाजुने होवुन सदर मुदत ठेवी रकमेवर द.सा.द.शे.१५ टक्के व्याजदराने देण्याचा आदेश देण्यात आला. त्याप्रमाणे मा.न्यायालयाने दिनांक ०६/१०/२००५ रोजी र.रु.४,५७,३५,०८८/- ( अक्षरी रक्कम रुपये चार कोटी सत्तावण्ण लक्ष पस्तीस हजार अठठयांशी मात्र) शिक्षण विभागास अदा करणेचे आदेश दिले.

सदर बँक डबघाईस गेल्याने बँकेचा बँकींग परवाना दि.२५/०९/२००० रोजी रदद झाला व मे.ग्राहक तक्रार निवारण मंच नाशिक यांनी सदर बँकेस त्यांचे ठेवीदारांना त्यांची मुददल रक्कम देणे बाबत आदेशित केले होते. त्यामुळे त्यावेळी पतसंस्था रक्कम देऊ शकली नाही. त्यामुळे फायनल डिक्री क्र.१/२००१ दाखल करुन बँकेच्या मिळकती जप्त करण्यात आल्या व जप्त केलेल्या मिळकतींवर शिक्षण विभागाचा बोजा चढविण्यात आला. जप्त केलेल्या मिळकती शिक्षण विभागातर्फे लिलावास काढण्यास मा.न्यायालयाने दि.०६/१०/२००५ रोजी परवानगी दिली.

त्यानुसार आदेशाच्या अंमलबजावणी कामी दरखास्त न.३९/२००७ दाखल करुन खालील मिळकतींच्या लिलाव प्रक्रिया करणेस परवानगी मागितली.

१) तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पौकी मौजे नाशिक बोहोरपटटी येथिल सीटी सव्हे न.१२८० म्युन्सिपल घर न.९०४ यासी क्षेत्र १६८.०० चौ.मी. त्यावरील एकुण ४ मजले बांधीव मिळकत इमारत यासी सर्व बांधिव क्षेत्र १३५१.४२ चौ. फु. म्हणजेच १२५.५५ चौ.मी.त्यात एक भाडेकरु यास दरमहा रु.२४०/- प्रतीमाह भाडयाने दिलेल्या तळमजल्यावर एक दुकानाचे भाडेकरु आहेत.

२) तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका येवला पैकी मौजे येवला येथील सिटी सर्व्हे नं. ४६१२ यासी क्षेत्र ५५.५० चौ.मी. ५९७.४० चौ फुट

३) तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नांदगाव पौकी मौजे नांदगाव येथील सीटी सर्व्हे नं. २ /अ सीटी सर्व्हे नं. ३१७२

४) तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका चांदवड येथील सीटी सर्व्हे नं. ४२६/ब यासी ग्रामपंचायत घर ना.११७ यासी क्षेत्र ९६.०० चौ मी.

४

५) वरील मिळकत शिक्षक बँकेने शिक्षण मंडळास गहाण म्हणुन दिलेली आहे.व सदर गहाण खतास आचार्य दोंदे विदयार्थी भवन न्यास नाशिक नोंदणी क्र. पी टी आर क्र. ई- ३७४ नाशिक ता.१७.१२१९७६ या विश्वस्त संस्थेचे विश्वस्त म्हणुन संमती देणार आहे. तसे आचार्य दोदे भुवन विदयार्थी न्यास नाशिक कार्यकारी मंडळाने सदर रकमेची जबाबदारी साठी संमतीदार राहण्याचे ठरविले होते. संमतीदार या नात्याने या न्यासाची मिळकत म्हणजेच सिटी सर्व्हे न. ६७६२ फायनल प्लॉट नं. २१९ क्षेत्र ४८०१.०० चौ. मी. आणि त्यावरील बांधकामाची मिळकत जामीन आहे.

त्या अनुषंगाने मा.न्यायालयाच्या परवानगीने अनुक्रमे दिनांक २८/०४/२०१४ व दिनांक १७/०६/२०१६ रोजी नाशिक येथिल बोहोरपटटी येथिल मिळकतीचा लिलाव करुन रक्कम वसुल करण्याबाबत प्रयत्न केले होते. परंतु लिलाव प्रक्रियेस कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही.

नाशिक येथिल बोहोरपट्टी तसेच येवला,चांदवड,मनमाड येथिल मिळकतींचे मुल्यांकन काढले असता चारही मिळकतीचे मुल्यांकन फक्त र.रु.१,४४,००,०००/- असे आहे.

त्यामुळे मे. दिवाणी न्यायाधिश, वरीष्ठ स्तर नाशिक यांचे कोर्टात दि.१३/०२/२००९ रोजी आचार्य दोंदे विदयार्थी वस्ती गृह ही मिळकत जप्त करुन मागितली होती.व सदरच्या अर्जावर मे.दिवाणी न्यायाधिश, वरीष्ठ स्तर यांनी दि.१६/०४/२००९ रोजी हुकुम करुन सदरचे मिळकतीचे शिक्षण विभागाकडे रजिष्ठर गहाणखत करुन दिलेले नसल्यामुळे मिळकत जप्त करुन मागता येणार नाही. असा हुकुम केलेला आहे.

त्यामुळे शिक्षण विभागा तर्फे सदर दाव्याचे कामकाज पहाणारे ॲड.श्री. व्हि.के.सानप यांचे दिनांक २४/११/२०१६ व अनुक्रमे दि.०९/१०/२०१८ रोजी अभिप्राय मागविला असता न्यायालयाने दिनांक १०/०८/२००० रोजी दिलेला निर्णय योग्य असुन र.रु.४,५७,३५,०८८/-(अक्षरी रक्कम रुपये चार कोटी सत्तावण्ण लक्ष पस्तीस हजार अठठयांशी मात्र ) शिक्षण विभागाने स्विकारावी.त्यात तडजोड करु नये असा अभिप्राय दिला.तसेच पत्र क्र JS&c/MUMBAI/NMC/१३१ /२०१७ अन्वये दिनांक १३/०४/२०१७ रोजी ई मेल व्दारे मनपाचे मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड.जे.शेखर यांचाही अभिप्राय प्राप्त झाला. त्यांच्या अभिप्रायात सदर दाव्याचे शिक्षण विभागा मार्फत काम बघणारे अँड श्री. व्हि.के.सानप यांचा अभिप्राय योग्य असल्याचे कळविले आहे.

तसेच मा. अतिरीक्त आयुक्त सो. यानी दिनांक १३/१२/२०१९ रोजी आदेशित केल्यानुसार मनपा पॅनल वरील कायदेतज्ञ ॲड श्री.समिर जोशी यांचा अभिप्राय दि.२०/०१/२०२० रोजी शिक्षण विभागास प्राप्त झाला. सदर अभिप्रायात त्यांनी असे नमुद केले कि, नाशिक महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असुन यातील पैसा हा जनतेचा पैसा असतो. अशाच प्रकारे यापुर्वी ही नाशिक महानगरपालिकेने त्यांच्या कडील मोठी रक्कम श्रीराम बँक व इतर बँकामध्ये, वित्तीय संस्थामध्ये गुंतविल्या व या संस्था डबघाईला गेल्यामुळे नाशिक मनपाचे आजही मोठया प्रमाणत नुकसान झालेले आहे. त्यामळे नस्तीत नमुद नोंदणीकृत गहाण खतातील मिळकती विक्री करुनही ४ कोटी ५७ लक्ष एवढी मोठी रक्कम वसुल होणार की नाही ही बाब विचारात घ्यावी. नस्तीतील लेखापरीक्षण विभागाच्या शे-या प्रमाणे सदरची वसुली रक्कम काही कोटीत असु शकते.परंतु वास्तविकपणे व व्यावहारीकदृष्या प्रस्तावाबाबतचा विचार करणे आवश्यक आहे. सदरच्या स्पेशल दरखास्त न.३९/२००७ मध्ये समझोता

करावयाचा असल्यास मुददल व त्यावरील काही काळाचे व्याज म्हणजेच मे. कोर्टाने दि.०६/१०/२००५ रोजी पारीत केलेल्या आदेशा प्रमाणे र.रु.४,५७,३५,०८८/- ऐवढया रकमेच्या खाली समझोता करणे योग्य होणार नाही. असे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसत असल्यामुळे वर नमुद केलेली रक्कम अथवा त्यापेक्षा जास्त रक्कम आपसात बैठक घेऊन चर्चा करुन मान्य करावी. व मान्य झालेल्या रकमेबाबचा समझोता हा मे.कोर्टातील स्पेशल दरखास्त न.३९/२००७मध्ये करण्यात यावा जेणे करुन सर्व कायदेशिर बाबींची पुर्तता पुर्ण होईल. मे.कोर्टात या प्रमाणे सुलेहनामा दाखल झाल्या नंतर व त्याप्रमाणे ठरलेली रक्कम मिळाल्या नंतर संबधित गहाणखतातील मिळकती या गहाणमुक्त करण्यात याव्यात असे नमुद करण्यात आले आहे.

तथापी निकाल लागल्याच्या दि.३०/०८/२००० पासुन निकालात नमुद र.रु.४,५७,३५,०८८/- या रकमेवरील दि.३१/०५/२०२० रोजी पर्यंत व्याजाची परिगणना केली असता र.रु. १८,११,७५,१२२ /- इतकी होते.त्याअनुषंगाने र.रु.१८,११,७५,१२२/- इतकी रक्कम स्विकारावी असे विभागाचे मत आहे. तरी रक्कम रु.१८,११,७५,१२२/- स्विकारावी किंवा र.रु.४,५७,३५,०८८/- स्विकारावी या निर्णयास्तव मा. आयुक्त सो.यांनी स्थायी समितीवर डॉकेट सादर केले आहे.

सबब मा.आयुक्त सो.यांनी मांडलेली वस्तुस्थिती व मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देश झालेला हुकूमनामा यांचा विचार करुन खालील बाबींवरती सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने केलेल्या खुलाश्यासह मनपाच्या आर्थिक हिताचा निर्णय मा.स्थायी समितीच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय देण्यांत येत आहे.

दावा क्र.३४३/१९९९ या मध्ये फायनल डिक्री क्र.४/२००१ नुसार दि.६.१०.२००५ रोजी हुकूमनामा झालेला आहे. त्यामध्ये गहाणखत केलेली प्रॉपर्टी विक्री करावी व र.रु.४,५७,३५,०८८/-इतकी रक्कम वसुल करावी, जोपर्यंत रक्कम मिळत नाही तोपर्यंत १५ टक्के व्याज घ्यावे. दावा दाखल केल्याने दि.०१.०८.१९९९ पासुन परंतु गहाणखत केलेल्या प्रॉपर्टीची किंमत आजचा बाजारभावाची तुलना केली तर र.रु.१,४४,००,०००/-इतक्या रक्कमेपेक्षा जास्त होत नाही.

मा.शिक्षण अधिकारी सो.यांनी दि.१३.०२.२००९ रोजी आचार्य दोंदे भवन हि मिळकत जमा करुन त्याची विक्री करण्यास मंजुरी मिळावी अशी विनंती मा.न्यायालयात केली होती परंतु मा.न्यायालयाने ती फेटाळलेली आहे. यामध्ये कोर्टाने म्हटले आहे कि आचार्य दोंदे भुवन जामिनदार आहे बँकेच्या कुठल्याही आर्थिक व्यवहारामध्ये हस्तक्षेप नाही आणि कुठलेली गहाणखत धर्मदाय आयुक्तांच्या पुर्व परवानगी शिवाय करता येत नाही त्यामुळे मनपाने केलेली मागणी फेटाळलेली आहे.

मात्र या मध्ये पुर्वीच्या गहाणखतामध्ये दिलेल्या सर्व प्रॉपर्टी विक्री करण्यास मंजुरी दिली होती, परंतु सदर प्रॉपर्टी विक्रीस प्रतिसाद मिळाला नाही त्यामुळे महानगरपालिके समोर कुठलाही पर्याय राहिलेला नाही. दुसरीकडे शिक्षक बँकेकडुन मनपा सेवकांकडुन कर्ज घेतलेले होते. त्याबाबत रक्कम मनपाने परस्पर वसुली करुन घेतलयामुळे मा.जिल्हा उपनिबंधक सो यांचेकडे महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ४९ अन्वये शिक्षक बँकेने तक्रार केली त्यामध्ये मा.जिल्हा उपनिबंधक यांचे कार्यालयामार्फत आदेश निर्गमित केलेल्या मुळ रक्कमेवर दिडपट व्याज द्यावे. दि.०१.०१.२०११ पासुन ते आजपावेतो आकारणी करावी त्याची व्हॅल्युएशन केली तर र.रु.१,४२,८०,६८४/- + आजपर्यंतची

आकारणी केली तर र.रु.३,१५,४७,६५७/-इतकी रक्कम होत आहे. एवढी मोठी रक्कम शिक्षक बँकेस देणे योग्य होणार नाही, त्यामुळे या प्रकरणामध्ये अजुन एका न्यायमंच म्हणजे ग्राहक मंचाकडुन सुध्दा शिक्षक पतसंस्थेकडुन ५० टक्के रक्कम सेटलमेंट करावी असे आदेश दि.२५.०९.२००७ रोजी निर्गमित केलेले आहे. शिक्षक बँकेचा परवाना रदद होऊन पतसंस्थेमध्ये रुपांतर झालेले आहे.

त्यामुळे एकंदरीत मनपाचे येणारे पैसे वसुल होण्याच्या दृष्टीने आचार्य दोंदे भुवन या जागेवरती नगररचना विभागाकडे दि.२२.०६.२०१५ रोजी बांधकाम परवानगी साठी आलेला असतांना शिक्षक बँकेशी झालेल्या व्यवहारामध्ये जामिनदार असल्यामुळे मनपाचे पैसे वसुल करण्याची संधी मनपाला प्राप्त झाली आहे.

यामध्ये वेळो-वेळी मिळालेले आदेशाचे पालन करुन मार्ग कसा काढतायेईल त्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे विधीतज्ञ ॲड समीर जोशी यांचा दि.२०.०१.२०२० रोजीचा कायदेशिर अभिप्राय मा.उच्च न्यायालयाचे दुसरे विधीतज्ञ ॲड एम.एल.पाटील यांचा दि.०२.०५.२०२० रोजीचा कायदेशिर अभिप्रायानुसार झालेल्या डिक्री क्र.४/२००१ नुसार र.रु.४,५७,,३५,०८८/-इतकी रक्कम वसुल करणे योग्य होईल असे मत दिलेले आहे.

दावा क्र.३४३/१९९९ व दरखास्त क्र.३९/२००७ या दोघा दाव्यातील समझोता किंवा डिक्री क्र.४/२००१ नुसार र.रु.४,५७,३५,०८८/- इतकी रक्कम वसुल करणे योग्य होईल.

तसेच या प्रकरणामध्ये मनपाची रक्कम वसुल झालेनंतर केलेले गहाणखत क्र.४२२९/१९९९ हे मुक्त करुन मनपाचे असलेले नांव कमी करुन त्यांना संमती पत्र देण्यांत यावे.

दावा क्र.३४३/१९९९ व दरखास्त ३९/२००७ अंतिम सुलेनामा निकाली काढावा. तसेच शिक्षक बँकेकडुन शिक्षण मंडळास वरीलप्रमाणे रक्कम अदा झाल्यानंतर आर्चाय दोंदे भवनच्या संचालक मंडळाने नगररचना विभागाकडे दि.१५.०६.२०१५ रोजी केलेल्या बांधकाम परवानगी बाबत त्यांना कायदेशिर बाबी तपासुन व विकास शुल्क घेवुन ना-हरकत दाखला देण्यांत यावा.

वरील सर्व बाबींचा विचार करता दि.०९.०७.२०२० रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये प्रशासनाने केलेल्या खुलाश्यानुसार तसेच मा.उच्च न्यायालयाचे विधीतज्ञ यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार शिक्षक पतसंस्थेच्या वतीने तथा आचार्य दोंदे भुवनचे संचालक मंडाळाच्या वतीने र.रु.४,५७,३५,०८८/- (र.रु.चार कोटी सत्तावन्न लाख पस्तीस हजार अठयाऐंशी फक्त) इतकी रक्कम नियमानुसार वसुल करणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

नगरसचिव,
नाशिक महानगरपालिका,नाशिक.

महानगरपालिका शिक्षण मंडळ,नाशिक
शासकीय/शालेय
29 JUL 2020
आवक क्र. १३५०
२९/७/२०२०
व.स. का.अधि.